म. ग्रं. सं. ठाणें
विषय का. व्य
सं. नं. १८८
१८८४

...ाथ

...र मोडक... कीर्तिकर

...के ...सर्जन;

'भक्तिसुधा' आणि 'दिलपसंती'

या कवितासंग्रहांचे कर्ते.

यांनी तयार केला

मुंबईत

...इंदिरा... छापविलें.

७६२ म. ग्रं. सं. ठाणें ७६२

| विषय | लेखक का. र. कीर्तिकर | सन |
|---|---|---|
| का. व्य | | १८८४ |
| संग्रहालय क्रमांक | पुस्तकाचें नांव इंदिरा | |
| १८८ | | |

सं.काव्य 932
ना

# इंदिरा.

हें नवीन काव्य

कान्होबा रणछोडदास कीर्त्तिकर

जिल्हा ठाणें येथील सिव्हल सर्जन;

‘भक्तिसुधा’ आणि ‘विलापलहरी’ या कवितावद्ध

ग्रंथांचे कर्ते

यांनीं तयार करून

मुंबईंत

नेटिव्ह ओपिनियन छापखान्यांत छापविलें.

सन १८८४. शके १८०५.

अर्धं भार्या मनुष्यस्य भार्या श्रेष्ठतमः सखा ॥
भार्या मूलं त्रिवर्गस्य भार्या मूलं तरिष्यतः ॥ १ ॥

महाभारत.—वधुदर्पणांतील उतारा.

# पुस्तकार्पण.

श्रीमन्महाराज सयाजीराव गायकवाड

सेना खासखेल समशेर बहादूर

संस्थान बडोदें, यांप्रत,

सानुमतें अत्यादरें हें काव्य

अर्पण केलें असे.

श्लोक.

विद्यारत्नसुपारख्या, बुध नरा, विद्वन्मणीपालका !
ज्ञानी शुद्ध असोन जो निजजनां, देशी सुखा सेवकां
शूरांचें अभिधान दिव्य कुळिंचें साजे **सयाजी** जया
अर्पी सादर **इंदिरा** नृपवरा ! स्त्रीकारिं काव्यास या !

# विद्वज्जनप्रार्थना.

### आर्या.

रंग नसे मयूरसम, तरि काकें पंख काय टाकावे!
गान नये मयुरसम, अल्परितीं का तरी न त्यां गावें?॥१

बाल हुशार नसे बहु, परि बोलां बोबड्या न तें सोडी;
विद्वज्जन हो माझ्या अल्पमतीची तशीच घ्या गोडी.॥२॥

जरि धांवाया येना, तरि का भ्यावें मुळींच चालाया?
जैसें तैसें रचितों, वाचा साद्यंत आर्य काव्या या. ॥३॥

'भक्तिसुधा' ती रचिली, ईशपरायण मनोगतीनें मीं
कथिल्या 'विलापलहरी' जातां भार्या अखंड सुखधामीं

आतां गातों कैसें स्त्रीपुरुषांचें परस्परांलागीं
साह्य असोनि परस्पर घ्यावें ओझें स्वयें शिरोभागीं॥५॥

### श्लोक.

कान्होबा, रणछोडदाससुत मी कीर्त्तिकरांच्या कुळीं
जन्मा येउन सार्थक स्वतनुचें केलें न वाटे मुळीं;
आहे एकहि आस या मनिं अशी—काव्यें रचोनी स्वयें,
द्यावीं त्यां विनयें सदा कविजनां अर्पोनि हस्तद्वयें. ॥६॥

# शुद्धिपत्र.

| पान. | ओळ. | अशुद्ध. | शुद्ध. |
|---|---|---|---|
| १० | १६ | वृती | वृत्ती |
| ,, | १७ | चिती | चित्तीं. |
| २४ | १७ | होई | होइ |
| ३१ | ९ | कृष्णासंगें | कृष्णसंगें |
| ३२ | ११ | पतिविराहानें | पतिविरहानें |
| ३९ | २१ | वास्तु | वास्तु |
| ४० | १८ | परस्परां | या शब्दाबद्दल 'एकध्वनीं' हा शब्द वाचावा. |
| ५० | १४ | वदतां | वदंता |
| ५३ | ........... | १५४ व्या श्लोकाखालील वृत्त 'दिंडी' असें समजावें. पुढें १५६ व्यापासून 'श्लोक' समजावे. | |
| ५६ | ४ | व्याखानातें | व्याख्यानातें |
| ५८ | १६ | तीं | तें |
| ६४ | १५ | एशा | ऐशा |
| ६५ | शेवटची | सख्यत्वें | सख्यानें |
| ६८ | १३ | शशिकलेची | शशिकलेचि |
| ७१ | ७ | एकोनी | ऐकोनी |
| ८४ | ६ | करी | करि |
| ८४ | शेवटची | नगरिमाजी | नगरीमाजी |

| पान. | ओळ. | अशुद्ध. | शुद्ध. |
|---|---|---|---|
| ९४ | २० | हस्त कीं | हस्तकीं |
| १०० | १७ | बलाविंयेलें | बलाविंयलें |
| ११३ | २ | तवकर मज दे, आलों ठेलों | कर मजशिं दे, आलों ठेलों |
| ,, | १६ | कृद्ध | क्रुद्ध |
| ११० | १२ | नत्रे | नेत्र |
| १५७ | २१ | कामी | कामीं |
| १२८ | १७ | घामीं | धामीं |
| १३२ | ७ | घेऊं, जाणें | घेऊं; जाणें |
| १४९ | ११ | कुणी | कुणि |
| १६५ | १२ | धुवीन | धूवीन |
| ,, | शेवटची | लढतनां | लढतानां |
| १७० | ७ | तद अवतंस | तदवतंस |

हें शुद्धिपत्र तयार करण्यांत मला रा. रा. वासुदेव विनायक पंडित ठाणें हायस्कुलांतील असिस्टंट मास्तर यांहीं मोठ्या आस्थेनें साह्य केलें त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहें. तथापि राहिलेल्या दोषांचा मी सर्व प्रकारें अधिकारी आहें.

क्रमांक ४३२

# इंदिरा.

## मंगलाचरण.

पद. राग केसुरि. ताल—त्रिवट, पंजाबी.

अंजनिसुत हनुमंत.—या चालीवर.

परमवंद्य भगवंत, अनंता, धीदात्या, मज
मतिमंदा । कवन कराया निजवर द्यावा,
रसिक करावें ममछंदा ॥ ध्रु० ॥

प्राकृतभाषासरोवरींच्या, शोधुन सुंदर अर-
विंदां । मधुपासम अति मधुर करावें, संचित
काव्य-सुमकरंदा ॥ १ ॥ परमवंद्य भगवंत ॥

स्त्रीपुरुषांनीं नित्य परस्पर, कथितों केवीं
सुखकंदा । वाढवुनी निज प्रेमलयत्नें, सेवावें
गृहीं स्वानंदा ॥ २ ॥ परमवंद्य भगवंत ॥

इहसंसारीं नर-समुदायें, साधावें त्या स्त्री-
वृंदा । स्त्रीपुरुषांचें ऐक्य असावें, गातों प्रभु
तवपादिं वंदा ॥ ३ ॥ परमवंद्य भगवंत ॥

# संकेतनामक सर्ग पहिला.

दिंड्या.

आर्यभूमीच्या उत्तर प्रदेशीं
क्षत्रियांच्या कुळिं, दिव्य सूर्यवंशीं
चंद्रकेतू जन्मला राजपुत्र
तोचि कवनीं या धरिल करीं सूत्र. १

स्वरुप सुंदर सुकुमार तो कुमार.
शिरीं केशांचा कुरळ दाट भार,
नेत्र चंचल बहु रम्य तेजदार,
स्वयें ज्ञानी गुणि मनाचा उदार. २.

पिता त्याचा अति चतुर सद्विचारी;
माय साध्वी, सकळिकां सौख्यकारी:
बाळ असतां तो, मातृकाळ झाला;
अर्भकाचा प्रतिपाळ नृपें केला. ३.

राजतनयें, माते न देखियेलें,
मातृवात्सल्या नाहिं जाणियेलें;
तयें बाळपणीं भोगिलें वियोगा,
माय अंतरतां, मुके बालभोगां. ४.

पिता होता नृप स्वजनहितीं दक्ष,
प्रजापालनिं जो पुरवि पूर्ण लक्ष,
थोर न्यायें संतोषवी जनाला,
नाम सत्यध्वज शोभलें तयाला. ५.

सं. काव्य
क्र. 932



राजपुत्राचे दोन मित्र साचे
खिलाडू ते प्रिय बहूतां दिसांचे,
एक सौंगाडि कमलाक्ष नामधारी;
दुज्या शशिवदना—त्री प्रेमभारी. ६.

**श्लोक.**

होती दक्षिण देशिं राजतनया सौंदर्यसंपन्नशी,
तातें वाढविली, सुमाय—ममता ज्यांची न कांहीं तिशीं;
विद्या ती चवदाहि जाणत असे, चौसष्ट तैशा कला
बाल्यापासुनि राजपुत्र वर हा होता तिला निश्चिला ७.

प्रेमा ठेवुनिया तिच्यावरि, तयें भार्या तिला मानिलें
सौख्या पावुनिया तिच्या सुमननें, रूपा गुणां वानिलें;
अंतर्यामिं सुमूर्त्ति कोंदुन तिची गेलीं तयाच्या पुरी;
देखीलें कधीं नाहीं तें तिज, परी पूजी वसोनि दुरी ॥८॥

परि नृपतनयेच्या मानसीं काय हेतू
नृपसुत कधिं कांहीं वाळगीनाच्र किंतू;
तिळभर तरि ना त्या वाटली भ्रांति चित्तीं
उपवर वधु वाटे प्राप्त होईल अंतीं ९.

होतां यौवन प्राप्त तें स्वतनया एके दिनीं त्या नृपें
जासूदां करिं रत्नहार वसनें देवोनि सोनें रुपें
मोत्यांचे बहु रम्य हार सुफलें नानापरीचीं बरीं
त्यांतें पाठविलें गृहीं कुमरीच्या आणावया सुंदरी१०.

गेले घेऊन दक्षिणेस वसनें तैसे अलंकारही;
ग्रामा हेर तया बघोन रमले, ठेले नृपाच्या गृहीं.

रत्नें मौक्तिक दिव्यहार वसनें रायापुढें ठेवुनी
कन्या मागितली निरोप अपुल्या राजाज्ञिचा देवुनी ११.

सत्कारें बहु हर्षले सुनगरीं राहोन जासूद ते
सौजन्यें मृदुभाषणें नरपती त्यां तोषवी स्वागतें.
शेला भेट दिली परी न कुमरी हेरांसवें धाडिली
वर्षांची बहु इष्ट सोयरिक ती ऐशी क्षणीं तोडिली १२.

आले ते परतोन सेवक घरीं उद्विग्न रायाप्रती
वृत्तातें कथुनी तदा कळविती भावी सुनेची स्थितीः—
" कन्यातात ह्मणे, मुळींच नचले बालेपुढें आमुचें
केला बाळपणीं करार, परि ना संबंध तीतें रुचे १३.

कल्पांतीं न वरीं कुणाहि पुरुषा, बाला असें ती वदे
मानीना गणिना कुणाहि, कसल्या बोधास ना कान दे."
वृत्ता या विपरीत ऐकुनि सभा कुंठीत झाली सर्वें
आशेनें भरल्या मनीं नृपतिच्या उद्विग्नता उद्भवे १४.

राजा खेद करी, विचार न सुचे, पुत्रापरी नोवरी
आणावी कुठुनी, कधीं, कशि मिळे ही काळजी अंतरीं.
आधीं देऊनियां रुकार मग ती नाकारितो कन्यका,
बाला ऐकत नाहिं तातवचना, राजा असा धन्य का? १५.

"कशी रायें केली ", स्फुरत नृप सत्यध्वज वदे,
अमर्यादा माझी कुमरि-खुळ-नादें बहुमदें ?
करोनी संग्रामा धरुन नवरी आणिन घरीं,
सुताच्या हातीं मी करिन वधुला क्षात्रिय तरी." १६.

## दिंडी.

राजपुत्रें ऐकिला वधुनिरोप,
दुःख झालें बहु, चढे मनीं कोप
ह्मणे स्वमनीं जिंकीन नोवरी ती
मला वरणें नाहींच अन्यरीती. १७.

## श्लोक.

पाहोनी निजतात-मानस-गती झाल्या कुमारें अशी,
केली युक्ति विचार पूर्ण मथुनी ऐका सुपुत्रें कशी;
रायासन्मुख येउनी सुविनयें ठेला उभा लीनसा
बोले "तात! कशा विचारिं बुजतां कां खिन्न हो होतसां?

जरी आज्ञा होई गमन करितों दक्षिणपथा
न जाणों सौंदर्यादिक असति वृत्तांतचि वृथा;
वरावी म्यां कैशी मुळिंच दिठल्यावीण तरुणी?
मला ऐशी मिथ्या रुचत मुळिं ना लग्नसरणी १९.

बघोनी ती मातें जरि न रुचली राजकुमरी
करावें म्या काई? बघुं निजवधूला अधिं तरी
जया जैशी व्हावी, मन मिळतशी शोधुन तयें
वरावी हो भार्या, तरिच युगती दोन हृदयें २०

जाऊं द्यावें त्वरित मजला दिव्य ताता दयाळा!
शोधोनी तत्सदनिं तिजला पाहतों लोकपाळा!
पाहोनियां अवडलि तरी आणितों राजबाळा
जिंकोनी मी वरिन तिजला साधुनी योग्यवेळा २१.

युद्धीं जें जें जित मिळतसे आपणा क्षत्रियांनां
भोगाया तें प्रियतर असे पूर्ण हें जाणतांनां ?
द्या हो आतां त्वरित मजला तात तुह्मी रुकारा
जातों घ्याया करवुनि सर्वें आपुल्या अंगिकारा २२.

मी क्षत्रियांच्या कुळिं पुत्र साचा
योजून युक्ती, मम मानसाचा
हेत प्रयत्नें पुरवीन ताता,
होईल आज्ञा जरि शीघ्र आतां " २३.

उभा होता पार्शी शशिवदन तो राजतनया—
ह्मणे, " संगें नेईं मज परम मित्रा ! करिं दया;
तुझ्यावीणें वाटे युगसम सख्या एक त्रिपडी,
ममायुष्या का मी करुं, वद कशी जाइल घडी" २४.

तें मित्र दूजा, कमलाक्ष, बोले:—
" भ्राती वसे सन्निध राजबाले;
संगें मला ने, तिचि भेट घेऊं
सार्ह्ये तिच्या हें तडि काम नेऊं २५.

पद. राग धनाश्री.——ताल एका.

(क्षणभंगुर ससार—या चालीवर.)

मजला ने आपुल्यासंगें । मित्रा ने आपुल्यासंगें ॥ध्रु.॥
चित्तीं एकचि ह्रय आपणरे, भिन्न जरीं अंगें १ मित्रा
असे प्रवासीं कोणि सहाय्या, विघ्न तरी भंगे २ मि०
लोह न वापरतां जैसें, तुजवीण तसा जंगें ३ मि०
आह्मि न सोडूं तुज, यमुना जशि सोडी ना गंगे" ४ मि. २६

सं. कोश
क्र. 132



श्लोक.

ह्मणे राय तो दीर्घ काढोन वाणी,
ध्वनी ये जसें अब्धि गर्जे किं पाणी;
"नका जाउं कोणी, लढोनी सुयुद्धीं
करीन स्नुषेची स्वयें मीच शुद्धी" २७.

दिंडी.

नेत्र आरक्त हि वर्ण तन्मुखाचा
चढे, अग्नी कीं मूर्त्तिमंत साचा.
वाणि रायाची अंतराळिं गेली,
विसर्जन मग नृपवरें सभा केली २८.

राजपुत्रें नृपवचन आयकीलें,
परी स्वविचारां नाहिं त्यागियेलें;
सभा आटपतां उपवनांत गेला,
भाविभार्येचा बहु विचार केला. २९.

श्लोक.

नेलें तेथ सुरम्य चित्र वधुचें त्या राजपुत्रें सवें,
वैसे ठेवुनि आपुल्यापुढतिं, त्या बोले बहू आर्जवें:-
"साध्वी, कां मजला न तूं वरिशि गे! मोहाब्धि हे इंदिरे!
कां हे वागविशी विचार मजला संसार जें अंतरे? ३०.

वारा मंजुळ वाहतो उपवनीं माधुर्य जें तें वसे
कां गे राजसुते! मनीं, तव मुखीं, माधुर्य तैसें नसे?"

ऐसें भाषण आपणाशिं करि जों, वध्वार्त्तिनें जिंकिला
"येये दक्षिणपंथिं ये, जय मिळे!" व्योमीं ध्वनी ऐकिला ३१

व्योमींचा ध्वनि ऐकुनी स्मित बहू न्याहाळितो अंबरा
मेघाच्छादित चंद्रकोर बघुनी बोले सुधाराधराः—
"हा मेघा, जगजीवनामृतमया! हा चंद्रमा शीतला!
द्या शांती मम आर्त्त मानसिं हृदीं मोहाग्नि हो चेतला" ३२.

## दिंडी.

गृहीं आला तेथोन राजपुत्र,
आपुल्याशीं पाचारुनी स्वमित्र
वृत्त कथिलें, संकेत मानसाचा;
ह्मणे "दावा अजि मित्रभाव साचा ३३.

## पद. ठुंबरी, राग सिंदुरा,—ताल त्रिवट.

( निकनजर मोरामन—या चालीवर. )

अजि इतर नाहीं इष्ट मम मनीं। गड्यांनों।
पाहूं या नृपकन्या ॥
योग्य जरि ती दिसली तरि हरूं। हो तियेला ॥ध्रु० ॥
वधू सतत चित्ति घोळे। दिनराती। मज कांहीं
चैन पडत मुळिंच नाहीं। तळमळतों मी।
विनति एवढि माझी परिसुनि। मजसंगें या ॥ १ ॥
आजि इतर नाहिं" ३४.

## श्लोक.

ऐसें योजुनि पूर्ण चंद्र नभिं तो झाल्या अधीं सौंगडी
आनंदें भरले तिघे उतरले लावोनि बुर्जा शिडी

कुसुमाग्रज
अ... ... १३२



गेले गांवकुसाचिया पलिकडे भीती परी मानसीं
हाहाकार पडोन राजगृहिं कीं येती गडी पाडिसीं ३५.

कडयाच्या बाजूनें, हरित शिखरीं ज्या वन सजे,
नद्या, नाले, जें कीं स्थल सुजल नृत्यें गजव्रजे
दऱ्या, खोऱ्या, शेतें, उगवति जिथें नूतन उतें
असे उल्लंघीले बिकट पथ यत्नें नृपसुतें. ३६.

बुर्जी, किल्ल्या देखतां उच्च उच्चा
राजग्रामा पातले दक्षिणेच्या;
शोधोनीया राजमंदीरमार्ग,
रायापाशीं ठाकले ते त्रिवर्ग ३७.

शब्दीं केलें राजियानें प्रसन्न;
देवोनीयां भोजना मिष्ट अन्न
केलें त्यांचें आदरातिथ्य पूर्ण
लग्नाची ना गोष्ट; ती झालि जीर्ण ३८.

साक्या. राग जोगी—ताल एका.

चवथ्या दिवशीं युवराजानें लग्नाचा अनुवाद
बहुयुक्तिनें केला, ज्याचा रात्रंदिन त्या नाद;
बोले "वद राया। होई कां ना ती मम जाया ३९.
बहुवर्षांच्या जोडाचा कां करिते कुमरि विजोड
बहु काळाचा जडला प्रेमा कां घडवी घडमोड ?
सांगा आजि राया। होई कां ना ती मम जाया" ४०.

श्लोक.

बोले राय गजेंद्र, "सत्य वदतां संकेत केला असे;
बाला वाढविली स्वतंत्र; विधि हा तो मान्य मुग्धे नसे.

कन्या मागतसां, रितीं गमत या, सन्मान राखीतसां;
सांगा काय करूं परी, कवणत्या योजूं उपाया कसा ४१.

जन्मा आलें कुळिं अमुचिया रत्न हें दिव्य थोर
त्यापासोनी गृहिं अवदसा पातलींसे अघोर;
दुर्दैवें तज्जननि सुखदा माउली साध्वि पत्नी
गेली बाळे त्यजुनि; कुमरी वाढवीली स्वयत्नीं ४२.

साकी.

बाल्यापासुनि या तनयेनें, सुख नाहीं मज दिधलें,
भलभलते मनिं विचार आणुनि विरसचि जीवन केलें;
ऐसा कर्माचा । खेळ असे गृहिं साचा ४३.

वाढत होती ममतेविरहित तनया जैं, तिजलागीं
ममताविरहित शिक्षण मिळलें तैं ती झालि विरागी,
आतां मज नकळे । उघडूं केविं तिचे डोळे ४४.

अंजनीगीत. राग माढ—ताल एका.

लग्नाचा म्यां करार केला
तो तिजलागीं अमान्य झाला;
काय करावें या तनयेला
नकळे मज आतां ४५.

बालपणीं आवडती बाळें
तोषविती मृदु प्रेमल बोलें
जरि कां दुःख त्यांतें झालें
चुटका मनिं लागे ४६.

स्त्र-काव्य 932 (932



कष्ट करावे सौख्यालागीं
भार मुलांचा स्वशिरोभागीं
पितरें घ्यावा परि तीं अभागी
बालक जरि बिघडे ४७.

वाढत वालें कधिं कधिं फांटा
फुटुनी धरिती भलत्या वाटा
पितरां जिवीं त्या लागे कांटा
दुहितेपरि माझ्या ४८.

श्लोक.

प्रचंड वाता धरणें न हातीं,
प्रदीप्त उल्का अडणें न पातीं,
तशी सुतेच्या स्थिति मानसाची
झाली विवाह-प्रतिकूल साची ४९.

बहुत मजला लज्जा वाटे, करूं परि काय तें?
सुचत मुळीं ना कांहीं, बाले तिचें खुळ शोभतें;
सकल जगता जिंकोनीयां करीं धरिन स्वयें;
परि न दुहिते ऐशा हातीं मुळीं धरितांचि ये ५०.

वरुनि तुजला आधीं आर्या, जरी मग ही कृति
घडलि असती, होती कैशी तुझी नकळे स्थिती;
मज गमतसे जें झालें तें, बरें, जरि दुःखद;
तुजशिं न मिळे कन्या, जाई तुझें तरि का, वद? ५१.

कमलजा कमलाक्ष-सहोदरी
शशिकला सति तैशिच दूसरी

प्रिय स्वमायसमा तिज रक्षिती
जशि लतांप्रति रक्षितसे क्षिती. ५२.

गणेशापदींच्या जणूं रिद्धिसिद्धी
जयां योजिलें म्यां सुतेची सुबुद्धी-
मती वाढवाया यथायोग्य रीती,
सुते गोष्टि सांगोनि त्या चाळवीती ५३.

श्लोक. ( अथवा, खट होरी. )

द्विसतिया सम प्रौढवयी गुणी
प्रिय सदा बहु ज्यां तनुजा गणी
निशिदिनीं तनयेस समागमें
भ्रमविती अपुल्या मनिंच्या भ्रमें. ५४.

रविस केतु जसा नभिं लोपवी
शशिस राहुकळा थरकांपवी,
द्विविधवा म्हणापरि लागती;
रविशशी तनयेमधिं जूगती ५५.

पतिरहित अशा या पंडिता राजबाळे
शिकविति अवघे हे दुर्मदें वेडचाळे;
अति मन कवळें तें नाशिलें कन्यकेचें,
पढविति जगिं या कीं भिकजिणें त्या स्त्रियांचें ५६

मुलिस जननीतुल्या झाल्या, प्रिया गतभर्तृका;
दयडिलि न बा त्यांहीं संधी सुता शिकतां फुका;
वदति तिज अज्ञानध्वांतीं सतीजन लोपलें;
परिसुनी अशी नित्या वाणी, तिचें मन कोपलें ५७.

म्हणाली दिनीं एक मातें सुता तीः—
'पिता धन्य व्हा स्वीकरा कार्य हातीं
स्त्रियांचें हरा दास्य, त्यांलागिं दावा
असा मार्ग कीं भोगिती त्या स्वजीवा ५८.

रम्या कांचनपूर नाम नगरी जी उत्तरेला वसे
तेथें जाउनि, पूर्ण निश्चय मनीं केला पित्या मीं असे;
शाळा उन्नतिकारणें सतिसुखा स्थापीन आशाभरें,
स्त्रीवृंदा शिकवीन कीं अमुचें दासत्व सारें हरे.' ५९.

ऐशी स्थिती बघुनिया तनया-मनाची
लागे बहू मजशिं काळजि नित्य साची
होऊं नये स्वगृहिं त्या कलहास मूळ
कन्येप्रती दिधलि म्यां नगरी समूळ ६०.

वसे तेथें शाळा; सकल तयिं नारी जमुनिया
सुतेच्या आज्ञेनें, गणुनि तिजलागीं बहुप्रिया
सुविद्याभांडारीं विविध अमृतें पान करिती
हरावें दास्या तें, स्वमनिं अभिमानासि धरिती ६१.

स्वबंधू स्वप्राणासम जरि सुते सर्वहि रिती
तरी स्त्रीग्रामीं त्यां तिळभरही देई स्थळ न ती;
मिळे तेथें कैंचा इतर पुरुषां ठाव नगरीं;
स्त्रियांवीणें बाळा कवण इतरीं संग न करी ६२.

पंजाबी ठुंबरी. राग केसुरी.—ताल त्रिवट.

( गाहो जगपति जगवंदन—या चालीवर )

वरण्या तूजला, देइन तनया
गुतलों वचना, जाचित मनिं या ॥ ध्रु. ॥

परि काय करूं मी, मजला न कळे
काशि वृत्ति मुलीची विवाहिं वळे ॥ १ ॥ वरण्या
तुजला वरिल्या सुखि होईल ती;
गृहिणि न होतां अबले न गती ॥ २ ॥ वरण्या
तरि जा सत्वर जेथ वसे ती
जाउन जिंकी सुचल्या रीती. ॥ ३ ॥ वरण्या
राष्ट्रासन्निध पितयाच्या तत्र
नगरि वसे, तिथ स्त्रीजनवैभव. ॥ ४ ॥ वरण्या ६३.

### श्लोक.

बकुलिचें फुल तें सुकलें जरी ।
मधुरता तयिंची उरते परी
मूल कुलीन तसें चुकलें तरी ।
स्वसुकुलांकुर राहति अंतरीं ६४.

आज्ञापत्र लिहून देइं तुज घे, जाईं सुतेच्या पुरीं
होई साध्य तुला जरीहि तनया सौख्यें तरी तूं वरीं
वाटे ती मजला असाध्य अबला स्वच्छंद हट्टी असे
केले यत्न किती, मिळे तरि तुला आशा मला रे नसे" ६५

परिसुनि नृपयाची उक्ति ऐशी अभद्र
बहुत तनय कोपें क्षोभला जेविं रुद्र;
सकल नगरिमाजी धुंडुनी अश्व तीन
त्वरित नृपकुमारें मेळवीले कुलीन ६६.

अश्वांपाठीं लाधुनी खोगिरांला
योजियेला वाह तें एककाला;

थंडया पारीं रात्र होतां निघाले
जाणूं सीताशुद्धिला राम चाले ६७.

प्रिय सहचर मार्गी चालतां त्या कुमारा
विकलित नृपपुत्रा देति धैर्ये इषारा
रमवित निज मित्रा कांचनासन्न आले
ह्मणति मनिं करावें काय त्या राजबाले ६८.

ज्यां आप नाहीं, पर ना, न स्वार्थ,
ते मित्र दोघे वचना हितार्थ
वाटेंत जातां वदती स्वमित्रा
हिर्मुसल्या कोपित राजपुत्रा ६९

पद. राग परज,—ताळ त्रिवट.

( मग चलत का न कर अटकी—या चालीवर. )

" कशा घोर छंद हा धरिशी । काय मिळेना इतर स्थळीं वधू । श्रम अपार निकरें करिशी ॥ ध्रु० ॥
रूप असें का लागुन गेलें । श्रम अपार निकरें ॥१॥
राजगृहीं अशि वाण कि पडली । श्रम अपार ॥२॥
कुठवरि खुळिच्या नादीं पडण्या । श्रम अपार ॥३॥
जिथ जाशिल तिथ चलुं परि वाटे । श्रम अपार तूं फुका करिशी ॥४॥ कशा घोर छंद हा धरिशी ॥ ७०.

श्लोक.

हिमाचलापासुनि सेतुबंध—
रामेश्वरातें फिरण्यास सिद्ध
असों परी तूं श्रम हे कशाला
करोनियां घालविशी वयाला ? " ७१.

बोले ऐका उत्तरा चंद्रकेतू
"बोलाचा मी जाणतों सर्व हेतू
केली आहे मी परी हो प्रतिज्ञा
मोडीतां ती हास्य होईल सुज्ञां ७२.

जाणां ना का क्षत्रियांचें जिणें तें
बोले तें ना चालल्या व्यर्थ जातें ?
यासाठीं हो जाउनी स्त्रीपुराला
मित्रांनों मी पूरवीतों पणाला." ७३.

बहुत नगरि शोभे रम्य तीरीं नदीच्या;
झुळ झुळ झुळ वाहे नीर मध्यें जियेच्या;
मृदु जलरव देई तोष कर्णेंद्रियातें,
सुखकर दिसतो तो देश सारा सभोंतें. ७४.

ग्रामापाशीं बघुन सुत तो शांतसें एक खेडें
विश्रांतीला करि तिथ उभे आपुले श्रांत घोडे;
गेले सारे बहुत थकुनी दिव्य ते वीर-साचे
उल्हासानें उतरति तिथे तें गृहीं पाटलाचे. ७५.

सामोरा तो नम्र पाटील आला;
हास्यें बोले मिष्ट त्या व्याकुळांला
खायाप्याया अन्नपाणी स्वहातें
देवोनिया तोषवी पूर्ण हेतें. ७६.

पाटील होता नकल्या स्वभावें
ऐकोनि कीं बोल जनें रमावें;
विद्या नसे त्यास मुळींच कांहीं
संतोषवी तो अपुल्या गुणांहीं. ७७.

भोजनोत्तर तिथें मग तांबुला
सेवुनी निघति घेउनि पाटला;
राजपुत्र कथि त्या घडल्यापरी
कोविं येइ तिथ शोधित नोवरी. ७८.

काय पाटील तया परिसा वदे:—
" गाढ ती नृपसुता भरली मदें;
पूर्ण मी वळखितों तनयेप्रती
स्वैर हो बहु असे अभिमानि ती ७९.

सुता माझी जाया नृपकुमरिला सेविति सदा
कधीं त्यांचा झाला तिजकरीं असन्मान नकदा
नव्या येती जेव्हां दुरुनि मुलि शाळेंत शिरण्या
गृहीं या, आधीं त्या उतरति श्रमांलागिं हरण्या ८०.

तयांसंगतीं माझि भार्या सुताती
क्रमानुक्रमें नित्य नेमेंचि जाती
बहु सांगती गोष्टि रूपा गुणाच्या
सुतेच्या श्रमाच्या, भ्रमाच्या, क्रमाच्या ८१.

पंजाबी ठुंबरी. राग केसुरी—ताल त्रिवट.

( गाहो जगपती जगंवंदन—या चालीवर. )

अबलामय जग सारें व्हावें
पुरुषांनीं दुनियेतुनि जावें ॥ ध्रु० ॥
स्त्रीमय होतां जिकडे तिकडे
गृहसौख्याचे होतिल तुकडे ॥ १ अबला०
कोठुनि वंशा होइल वृद्धी ?
विपरीत भली ही नाशक बुद्धि ॥ २ अब०

राष्ट्रीं आलें परचक्र जरी
घेउनि बाळें पळतिल दूरी ॥ ३ अव०
काय स्त्रियांची बुद्धि असे ती
राष्ट्रें कीं त्या चालवुं शकती !"॥४ अव० ८२.

## साक्या.

ऐसें बोलत असतां पाटिल राजतनयमनिं आला
विचार कीं स्त्रीवेष धरोनी पाहवी नगरीं बाला
बोले "पाटिलजी । माझें कार्य करा आजी ८३.

साह्य करा अजि सजवा आम्हां स्त्रीवसनें लेवोनी
जाउनि गांठूं राजबाळिला, येऊं तिज घेवोनी
बुद्धी पुरुषांची । दावूं बलवत्तर साची " ८४.

## श्लोक.

मानावली पाटिलजीस उक्ती;
बोले " असे फारचि योग्य युक्ती;
कां पौरुषा आजचि घालवावें
स्त्रीजातिहातीं अधिकार द्यावे ८५.

चला, उठा, या, सजवूं तुह्मांतें
करोन वेणी फणि हो स्वहातें;
नसोत चोळ्या नहि उच्च साड्या;
त्या स्वच्छ देईन असोत जाड्या. "८६.

अहोरात्र जागोन पोशाक केले
तिघे साडिचोळी स्वयें शुद्ध ल्याले

करीं कांकणें, कुंकू लावोन भाळीं
उषःकाळ होतां निघाले घुत्रेळीं. ८७.

त्रिनोदें महा पाटलें रामराम
करोनी ह्मणाला "तडी न्या सुकाम
हरा गर्व त्या सर्व यत्नें स्त्रियेचा;
नरांमाजि वानील हो धन्य वाचा." ८८.

---

रवि मृदु किरणांनीं लोपवी जें तमाला
सजवि रुचिर रंगें, कांचनी, कांचनाला
समयिं तयिं वहू त्या अंबरीं तोषकारी
पवन सुटुनि खेळे इंद्रियांचा विहारी. ८९.

साक्या

ऐशा सुंदर उषःसमयीं स्त्रीजनस्वातंत्र्यारी
आले, थकले, दमले, श्रमले कांचनपुरिच्या द्वारीं
द्वारावरि दिसला । त्यांहीं ब्रह्मकुमरिचा पुतळा. ९०.

जणुं किं सरस्वती या ज्ञानालयिं रात्रंदिन ती डेली
करीत रक्षण ज्ञानसिंधुचें प्रेक्षित आलीं गेलीं.
शोभे बहु पुतळा । रविच्या किरणांनीं रंगला. ९१.

पद. राग खमाज—ताल एका.

(लचक लचक चलन मोहन—या चालीवर.)

सजुन सुहृद्सहित कुंवर आला । नगराला.
बघुन मुकुलभर विकसित तरुवारिं मनिं धाला, तिथें. ध्रु०
विटपिं विटपिं कोकिल उडति, काढिती मधु स्वराला

सुरभि ऋतुची रुचिर सरणी । बघुन रमुन गेला, तिथें
॥ १ ॥ सजुन सुहृद०

आभरणभर रम्य जलधर । नूतन रविप्रकाशें
सुरंग भरित करिती नृत्य । दिसत सकल रम्य, तिथें
॥ २ ॥ सजुन०

डुलती मयूर, युगलीं कीर करिति क्वापि भुःकार
शोधित सुरस भ्रमर फिरत । शोभति वहु विलासें,
तिथें ॥ ३ ॥ सजुन० ९२.

श्लोक.

स्त्रीवस्त्रभारें श्रम फार झाले,
ऐसे तिघे वाटडिपाशिं आले;
वाटीण कोंडी तिथ घोडियांला
येई धराया बघुनि तयांला ९३.

कोंडी भली वाइल दांडगी ती
धिप्पाड,—बोले परि नम्ररीती;
ऐसी असे कांचनपूर-वृत्तीं
कीं नम्रता नित्य असावि चित्तीं ९४.

कोंडी करी प्रश्न "कुठें ग जातां ?
कोठून का योजुन काम येतां ?
कीं राहण्याला इकडेचि आलां
कीं आपुल्या जाल पुनः घराला ? ९५.

सांगा, तसे मी चरवीन घोडे
बांधोनि पागेत तयांस थोडे

देईन पाणी, थकले बहु हे
ही वाष्प, हा घर्म अपार वाहे " ९६.

### दिंडी.

करी रायाचा तनय उत्तराला:—
" मायबापां, त्यागोनिया घराला
नाम ऐकोनी राजकन्यकेचें
वतन सोडियलें जन्मल्या दिसांचें. ९७.

### श्लोक.

आहे दूरी आमची जन्मभूमी;
येथें आलों राहण्या ज्ञानधामीं;
विद्यासौख्या सेवुं, जाऊन शाळे,
सांगा ऐसें जाउनी राजबाळे "९८.

### साक्या.

कोंडीपाशीं मग चवकाशि ते करिती कोण कशी ती
शिक्षण देई अपुल्या शिष्यां, वागवि कैसे रीती;
वदती " कथ बाई । काय स्वभावी गुरुमाई" ९९.
" कमलजा, शशिकला दोघि या," बोले कोंडी त्यांला
शिक्षण देती; असे कमलजा प्रियतर सर्वत्रांला;
आहे मधुर-मुखी । करिते शिष्यांलागिं सुखी"१००.

### श्लोक.

आपसांत मग ते ठरवीती:—
" आवडे कमलजा बहु रीती

गेलिया तिजकडे नच भीती
ज्ञानपान करुंया तिजहातीं " १०१.

पत्र राजतनये मग लीहितीः—
" चंद्रिका, रदनिका, कमलावती
उत्तरेकडुनि येउं तिघी स्त्रिया
मागतों तुमचिया नगरींत ठ्या १०२.

परिसुनि गृहिं नांवा राजकन्येचिया या
अवडलि कृति तेणें पातलों मुक्त व्हाया;
विनवुं शशिकलेच्या शिक्षणीं राहुनीयां
सुफलित करुं सारा जन्म जो जाइ वायां " १०३.

पत्र बंद करुनी वरि मोहरा
सार्थ लाविति बघा किति साजरा
पंचबाण धरिले मदनें करीं
अंबरास भरिलें दुजिया शरीं १०४.

स्त्रीजगीं जणुं किं ते शर सोडिले;
मूर्त्तिमंत मदनें दृढ व्यापिलें
सायकीं अखिल कांचनपूरिला;
राजपुत्रिवर मार किं योजिला १०५.

## साकी.

मोहरबंद त्या धाडिति पत्रा राजबाळीच्यापाशीं
मग मुखमार्जनविधि आटपुनी प्रार्थिति प्रभुरायाशीं
विनविती "देवाहो!| सहाय्य करा, अजि पावाहो! १०६.

### श्लोक.

बहुरुपी तुजला प्रभु मानिती
बहु तुझ्या करुणें जन त्रानिती
करिं असें रुप कीं नरनारिंचा
कधिंहि भेद कळे न निजांगिंचा १०७.

हे सूत्रधारा सकला जगाच्या !
हें सूत्र हातीं धरिलें सुखाच्या
आशेमुळें वा, तरि तें तडीला
न्यावें दयाळा तुझी थोर लीला " १०८.

हें विश्व नाटक असे, मधिं नाट्यकार
तूं सर्व भूतिं नटशी; परि निर्विकार;
स्त्रीजातिच्याहिपरि मंजुळ होउ वाचा
ह्या नटका नटवि थाट दिसोचि साचा ! १०९.

---

संकेतनामक प्रथम सर्ग समाप्त.

# स्त्रीनगरप्रवेश नामक सर्ग दुसरा.

श्लोक.

उगवतां रवि द्वारपालिका
स्वकरिं आणुनी अंबरांदिकां,
नविन पातळें शुभ्र स्वच्छ तीं
हरित चोळी दे एकेकाप्रती. १.

देउनी तयां बोलली "चला
इंदिरेचिया जाउं भेटिला;
सोडुनी जुनें वस्त्र येथलें
पाहिजे तुह्मां नित्य नेसलें." २.

लेवुनी तिघे, श्वेत अंबरा
स्त्रीजनांसवें बुद्धिसंगरा
चालले तदा भिष्ट भाषणें
इंदिरेचियां भेटि कारणें ३.

इंदिरा नृपसुता-अभिधान
बुद्धितें न जिचिया कधि मान
होई, ती निवळ सर्व पसारा
चालवी स्वमतिनें कुलतारा ४.

शुभ्रसे चिरे, संगमर्वरी
आजुबाजुला मंडपांतरीं
स्वच्छ घोटले पूर्ण रेखिले
विस्मयें बहू त्यांहिं देखिले. ५.

स्त्रीजनें स्वयें बुद्धिच्या बळें
मंडपास त्या हातिं बांधिलें.
चालतो तिथें इंदिरेकडे,
पाहती क्रमा, नित्य जो घडे. ६.

उदयिं त्या दयिता नवयौवना
तरुण प्रौढ वयस्क कुलांगना
उठुनियां करिती प्रभुप्रार्थना
स्मरति भाविक त्या जगज्जीवना ७.

परि वघा किति माद तयां मनीं
अखिल मंजुळ ईश्वरगायनीं
पुरुषवाचक नाम मुळीं नसे
प्रभु किं स्त्रीस्वरुपीं जागें या वसे. ८.

भुपाळी. राग विभास---ताल एका.

( घनःशाम सुंदरा — या चालीवर. )

विश्वजननि, जगदंबे, धात्री ! तुज अवध्या कामिनी
भगिनिमंडळीं विनवुं दयाळे ! यश दे आह्मां जनीं।।धृ०।।
स्त्रीजातीला अबला ह्मणुनी कोणि न त्यांतें गणी;
नरगणांच्या दासत्वांतुनि सोडविं आह्मां क्षणीं.
गर्वें लोभें मदें मत्सरें, पुरुष बहुत अवगुणी
सत्ता करिती आह्मावरि ते, ह्मणविती आमुचे धणी.
सावकार ते होउनि बसले असतां आधीं ऋणी;
नित्य गृहीं काबाड वाहवा, ना तरि दुःखें दुणीं
।। चाल ।। या संसारार्णविं गे हें केलें कैसें जिणें?

परतंत्र ठेविलें आह्मां, स्वतंत्र सौख्याविणें
कलह माजती तेणें, व्यर्थ होति भांडणें
॥ चाल ॥ नरनारींच्याभितरीं नथिं नसे स्वस्थता
मनीं ॥ १ ॥ विश्व जननि० ९

## श्लोक.

स्त्रीवृंदें ही प्रार्थना दीन केली
मित्रांनीं त्या संगतीं आयकीली.
सोडोनी तें मंडपाला निघाले
जाण्योनीयां इंदिरेपाशिं ठेले १०

बैसे एका उच्चशा आसनीं ती,
सौंदर्याची शोभते पूर्ण मूर्ती
चालें बोलें रम्य संतोषदायी
साजे साऱ्या कांचनीं दिव्य आई ११.

पायांपाशीं व्याघ्र निद्रिस्त होते.
दोघे तेथें; इंदिरेनें स्वहातें
बाल्यावस्थेपासुनी वाढवीले
होते, तें ते तीजआधीन झाले १२.

ब्रह्मांड गोल धुंडितां जिस.जोड नाहीं
जी सांठवीं बहुकळा अपुल्या सुदेहीं
स्त्री-उन्नतीविण दुज्या नचि वासनांला
चित्तीं धरी अशि सती भुलवी जगाला १३.

नखशिखान्त दिसे बहु गोजरी .
निजरुपीं तशिही गुणि सुंदरी

त्यजुनि आसन ती मग मावली
जवळि येउन त्यांप्रत पावली. १४.

अभिमुख उभि राहे दिव्य ती इंदिरा हो
नृपसुत मनिं बोले दीर्घ ही काळ राहो
स्मित बहु हृदिं झाला पाहुनी अंगना ती
चिर मुख अनुलक्षी, प्रेम त्या नेत्रपातीं. १५.

साकी.

वाटे राजसुता कीं अपुला टाकुनि द्यावा वेष
कवळुनि ऐशी सती उराशीं सांगावा उद्देश
परि हृद थांब म्हणे। जाई कार्य न तडि तेणें १६.

श्लोक.

बोले राजसुता "महा गुणि तुम्ही, हो धन्य साच्या सती
आलां या नगरींत होइ तुमचा उत्कर्ष तें निश्चिती.
स्वीकारा पथ जो स्वयें निजहितः यत्नें बहू काढिला
सेवा जो बहुतांस मान्य पथ हो, तो पाहिजे वाढला१७.

दिंड्या.

काय तुमच्या गांवच्या स्त्रिया ऐशा
उंच असती कीं ताड माड जैशा ?"
तयीं शशिवदनें उत्तराशिं केलें:—
"राजमंदिरिंहुन हें त्रिकूट आलें." १८.
"असां तुम्ही का राजधामि नारी ?"
नम्र वाणीनें इंदिरा विचारी;

"तरी तुझी जाणतां राजपुत्र ?"
वदे परिसा शशिवदन प्राणमित्रः—१९.
"सकलसद्गुणसंपन्न मोदराशी
शौर्यमूर्त्ती नर सदा जो तुझांशीं
दिव्य ज्योती हृदिं नित्य वागवीतो
अन्य कोणां वरणारना झणे तो" २०.

श्लोक.

परिसुनि नृपकन्या आणि ही काय बोलेः—
"न कधिं वचन ऐसें आमिं या आश्रमीं
पुरुषमुखिं असारी वाक्यमाला सदा ही
निवत असति, येथें काढ़णें इष्ट नाहीं. २१.

आलां येथें वाटतें ह्याविरोनी
ज्ञानेच्छा ती अंतरंगीं भरोनी
ज्ञानाची त्वच्चित्त तें वाट पाही
अज्ञानाची उक्ति भासे सदा ही. २२.

दिंडी.

राजपुत्राचा मुळिं विचार कांहीं
स्पष्ट सांगें मन्मनीं येत नाहीं
स्वप्निं देखिल तो, सर्व कांहिं त्याचें
नाहिं ठाउक, हें वचन असे साचें. २३.

पद राग कांबोद. (प्रबंधाचे चालीवर) ताल—सुरफक्ता
(नमो भक्त सुरतरुलते—या चालीवर)

मनीं इष्ट बहु काल संकेत केला।
वाढतां देह तो दृढ झाला ॥ ध्रु० ॥

अ जें भय स्वातंत्र्य होई शुद्ध तें।
नाहीं करणार मी सत्य वदतें ॥
काय लभाविणें सार्थ नाहीं जिणें?।
व्यर्थ हें बोलणें शोभे खुळ्यां ॥ १ ॥ मनीं इष्ट वहु०
अज्ञान तुह्मि जोंवरी टाकिलें न तोंवरी ।
सर्वांनों तुह्मांप्रती होईल पीडा ॥
दासत्वीं जातसे, जन्म स्त्रीचा दिसे ।
नर मानिति तसे वागवीती ॥ २ ॥मनीं इष्ट २४

दिंडी.

स्त्रिया असती पुरुषांचि खेळणीं तीं
बालकांच्या जणुं बाहुल्या किं हातीं
काळ येईल निश्चित तुह्मांस सांगें
मुक्त होऊं एकल्या ज्ञानमार्गें २५

श्लोक.

सम विषम गृहीं तें पाहिजे हें कशाला ?
सम सम नरनारी कां न तीं आपणाला
समजुनि मनिं देती साह्य तें एकमेकां?
कधिं मग गृहिं तेणें नाहिं येणार धोका.''२६..

हें वाक्य येतां विषतुल्य कानीं
खालीं मुखें घालियलीं तिघांनीं.
वाग्बाण गेले तळिं अंतराच्या
स्त्रीमुक्तिहंत्या नटल्या नरांच्या २७.

एक नारि दिसण्यांत सुभावली
नम्रपायिं पुढती सरसावली;

वाणिनें कथितसे मधुरा सती
स्पष्ट कांचनपुरी नियमास, तीः—२८.

दिंडी.

"तीन वर्षे गृहिं नाहिं जावयाचें
तीन वर्षे नगरींत राहयाचें
तीन वर्षे संसर्ग मुळिं नरांशीं
नये ठेऊं व्यवहार ही घराशीं २९."

श्लोक

नियम अगखि ऐसे अन्य नानाप्रकारी
परिसुनि पटिं नांवें घालती वेषधारी
वदलि सति तयांला, "धीट व्हा नीट वागा
स्वगृहिं करितसां जे सर्व आचार त्यागा ३०.

असोंद्या क्रिया सर्व कालानुसारी.
पहा वर्त्तती केविं येथें सुनारी
असा जैं नव्या, सिद्ध व्हा शुद्ध व्हाया
लतांचेपरी कोंवळ्या हो वळाया ३१.

नका हो स्मरूं गोकुळींच्या व्रताला
नसे कृष्ण येथें न तत्कृष्ण लीला
सदा जानकीसत्व जीवीं धरा हो
तिचें योग्य चारित्र ध्यानांत राहो ३२.

बळें लोभें सीते दशमुख जयीं दुःसह रिती
करी कष्टी, पातिव्रत निज न सोडी तयिं सती

तशा तुह्मी व्हा हो. सकल तुमची वृत्तिहि तशी
न झाल्या होई का कधिंहि तुमची उन्नति, कशी? ३३.

सती सीता साध्वी सकल जगता शिक्षक सदा
धरा निष्ठा ध्यानीं सुहृदिं तिचिया ध्या तुह्मि पदां
महास्त्रां तोंडांची प्रबल नर-दासत्व असुरी
त्वहस्तें हाणाया स्वयिंच तुह्मि व्हा रावण-अरी ३४.

## दिंडी.

सत्यभामा रुक्मिणी राधिका ती
कृष्णासंगें ज्यां पडलि देहभ्रांती
रासरंगें ज्यां मधुर वेणुनादें
पडलि भूल तशा भुलूं नका नादें ३५

पंच पतिंला ज्या एकनिष्ठ पत्नी
साध्वि द्रौपदिनें सेविलें सुयत्नीं
तिची निष्ठा तुह्मि मानसीं धरा हो
कार्यि तुमचें या चित्त तेथिं राहो ३६.

निंद्य राक्षसि पूतना दुराचारी
मनुजहिंसक वा दुर्गंध वीषधारी
रामकालींची शूर्पनखा दंशी
तयां माना तुह्मि तुच्छ सर्व अंशीं ३७.

## श्लोक.

शबरिचें रघुच्या चरणीं जसें
मन असे दृढ शांत सदा तसें,

स्वजनउन्नति हा रघुराज हो
चरणिं त्या तुमचें मन घट्ट हो ३८.

करी कालिका दुष्ट काळासुराला
वधोनी करी तुष्ट साऱ्या नरांला
तशा या वधा त्याचि काळासुरा, तो
तुह्मां बालकांचेपरी वागवीतो ३९.

### साक्या

चिलयामाता देखा कैशी होती निष्टावंत
दिधला आपुला पुत्र पोटिंचा तोषविला तैं संत
सतिनें प्रेमभरें । आपुल्या बुद्धी अनुसरें ४०.

दमयंती नलराजसुजाया पतिविरहानें कैशी
व्याकुल झाली परी वरी ना दुजिया कोणि नराशीं
ऐशा निष्टच्या । सखीनों व्हा तुम्ही साच्या ४१.

### श्लोक.

हिमनगतनयेनें भिल्लिणीच्या स्वरूपें
वनिं निजपति-सत्वा देखियेलें प्रतापें
दृढ बळ तयिं दावी आपुल्या निग्रहाचें
सतत मानिं असो या धैर्य हें पार्वतीचें ४२.

विकलित रथचक्रा संगरीं कैकयीनें
स्वकर परम युक्ती घालुनीयां धिरानें
रणभुमिवर वेगें चालवीलें रथाला
दशरथ पतिराया धन्य ! नेलें यशाला ४३.

देखा दक्ष कशी स्वधर्मअवनीं ती दिव्य तारामती
दुःखें पीडित जो पती *फिरतसे त्याच्यासवें ती सती*
उल्लंघी गिरिकंदरां, मुळिं गणी ना धूप ना आप ती
प्रेमें, दुःख न मानुनी, सुखिं तशी दुःखांत सेवी पती. ४४

लक्ष्मी सती केविं बघा उदार !
वाहे जगाचा शिरिं कारभार.
बोलोत हो चंचल ती असे कीं;
चांचल्ययोगें सुख होइ लोकीं. ४५.

द्वारीं पहा शोभत शारदा ती
साऱ्या जगा ज्ञान-सुबुद्धि-दाती
विद्या-प्रसाराप्रति कारणी जी
ज्ञानामृता सर्व जगास पाजी. ४६.

कृष्णाकुमारी किति सौम्यवृत्ती !
आज्ञा पित्याची समुळीं सनीती
पाळोन दावी जगता सुबाळी
कीं स्त्री न भी मृत्युस कोणि काळीं ४७.

बघा ती अहिल्या सती इंदुरींची
तळीं बांधवोनी गृहींचीं दुरींचीं
महा अन्नछत्रें स्वधर्मानुसारें
स्वयें स्थापुनी तोषवी दीन सारे ४८.

अशा या स्त्रिया थोर साध्वी प्रतापी
पुराणीं कवी-संत-योगी-कलापीं
सुखें वर्णिती त्यां इथें मूर्त्तिमंत
बघा; नित्य व्हा तुह्मि तेवीं अनंत ४९.

## साकी.

[मच्या उत्तेजनार्थ पुतळे त्यांचे जागोजागीं
:भारले, फलप्राप्ती त्याची होवो तुह्मांलागीं
न्याहळा हे पुतळे | आपुले सुखवा हो डोळे ५०.

## दिंडी.

असें बोलुन त्यां दावि अंगुलीनें
जिथें होता मांडिला कमलजेनें
वर्ग अपुला; तिथ जा तिघांस सांगे.
दिली दासी; ते जाति तिच्यासंगें. ५१

## श्लोक.

वर्गीं आले; देखिली त्यांहिं कांता
शिष्यां शोभे दिव्य जी सेव्य माता
राहे ऊभी घेउनी ग्रंथ हातीं
आनंदोर्मी दावुनी नेत्रपातीं. ५२.

बाजू एका पालण्यामाजि बाळ
नामें होतें मंजुळा; हालचाल
नाहीं कांहीं; स्वस्थ निद्रिस्त होतें,
वाटे विश्वीं अन्य नोहे सभोतें. ५३.

अहा ! बालकांनींच निद्रासुखाचा
महानंद घ्यावा; न त्यांतें भवाचा
वृथा हा पसारा कदा दुःख देई;
सदा मानसीं बाल संतोषि राही. ५४.

वर्गी होत्या बैसल्या जागजागीं
विद्यार्थी तें ज्ञान-संप्राप्तिलागीं;
कोणी मागें, कोणि त्या अग्रभागीं;
तेथें तेही बैसले कंपितांगी. ५५.

कमलजा तिथें दृष्टि फेंकुनी
नविन आलियां पाहि रोंखुनी
कमलजेस तद्बंधु पाहुनी
बहुत हर्ष तैं जाहला मनीं ५६.

विनय हो किती डोळियामधीं,
जणुंकिं शोभते मूर्त्तिमंत धी !
"भगिनि!" तैं हळू काढि तो ध्वनी–
ध्वनि अयोग्य हा त्या क्षणीं, जनीं; ५७.

"स्वरुप हो किती" बोलला शशी–
वदन, "रम्य हें! कांति शुभ्रशी!"
"बस उगा" वदे राजपुत्र त्या,
"फजिति पाहिजे का अजाणत्या ?" ५८

कोत्रिं आयका कमलजा गुरू
पाठ नित्यचा मग करी सुरूः—
"ज्ञानभुक्त ज्या मज तुम्ही दिसां
मुक्ति जों मिळे तंव इथें वसा. ५९.

जगतिं हो पहा का गती असे;
बळ जयीं तयीं श्रेष्ठता वसे;
सबळ व्हा, तरी ये यश असा
मनिं अशा धरा सृष्टिच्या क्रमा. ६०.

देखा स्त्रियांनां जन वागवीती
नाना प्रदेशीं अजि कोण रीती;
ते चीनदेशी तुरकी दुराणी
अफगाण, सिंधी, बलुची, इराणी; ६१.

केसा स्वयें बांधुनियां झनाना
कोंडी मुसल्मान वधूंस नाना;
देखे तयां नित्य कुशाग्र-दृष्टी
संदेह पोटीं, मुखिं गालि-वृष्टी. ६२.

कशा बाला प्रौढा विगतधव होतांचि युवती
अशां हिंदू लोकीं अखिल अपुलें आयु मुकती
सती बोलोनी स्त्रीदहन करिती निष्ठुर किती !
स्त्रिया सोसूनी ही भयंकर दशा हाय वदती. ६३.

शरीरा, सौंदर्या, वपनविधि विच्छिन्न करितो
पती जातां पत्नी-भवसुख सदा सर्व हरितो;
भ्रताराच्या केशाग्रनि कवण संबंध नकळे.
किती क्रूरा-दृष्टी! नर-मन कदा ना हळहळे. ६४.

जरी एक भार्या मरे त्या नराची
दहा दीस झाले न तों अन्य याची
स्मशानीं दुजेची करी चौकशी तो
इथें एक पत्नीचिता पेट घेतो ६५.

असे काय ऐशा नरापोटिं माया
तुळावें यमाशीं अशा कां नरा या
वराया स्वयें जो दुजी पत्नि पाहे
न जाणे स्त्रियां कोंवि वैधव्य साहे ६६.

‘ कुलीन ’ स्वयें आपणातें कित्येक
जगीं बोलवीती; स्त्रियांतें अनेक,
वरोनी रहाती! हृदात्रे विशाल !
सहस्त्र स्त्रिया तद्धृदीं मावतील ! ६७.

कुलीनत्व का हें ? मलीनत्व साचें;
असे पत्निचें पाप; तैसें वराचें.
जसा वाहती ते शिरीं केशभार
स्त्रिया मावती तेविं गेहीं अपार ! ६८.

बिचाऱ्या गुलामापरी दीनवाण्या
गृहाभीतरीं सेविती अन्नपाण्या.
जसा द्वारिं तो श्वान मार्जार बैसे
गृहामागल्या द्वारिं स्त्री-श्वान तैसें ! ६९.

स्त्रियांनीं रांधावें, भरुनि घट ते स्वच्छ उदकें
वहावे स्कंधाचेउपरि जरि तो प्राणहि थके
दळोनी कांडोनी, निसुनि टिपुनी धीर धरुनी
खपावें ऐसेंही निशिदिनिं जिवा त्रास करुनी ७०.

धन्यालागीं कांहीं अवडलि कृती ना कधिं जरी
शिव्या लत्ता घ्याव्या करुनि इतुकें त्याहि उपरी !
मुलांचे काढावे श्रमुनि दमुनी कष्ट सकळ
कुमार्गें तीं जातां बहुत तिज लागे हळहळ ! ७१.

हें विश्व कैसें उदयास आलें
निर्माण कीं दैवगतीच झालें
कीं सर्व मायावि असे पसारा
होऊन गेला निमिषांत सारा, ७२.

कीं ब्रह्म आधीं बनलें स्वयंभू
खज्योति वायू पय सात स्वर्भू
झालीं उपस्थीन अनुक्रमानें
कीं कालिं एका घडलीं विधीनें, ७३.

एका अति क्षुद्र किं अल्प बिंदू—
पासोन उत्पत्ति मिळून इंदू
तारे नभीं भास्कर दिव्य ज्योती
सृष्टिक्रमा संतत चालवीती, ७४.

## दिंडी.

कसा मानव तो क्षुद्र अणुठायीं
बनुन जन्माला दिव्य देह येई
कसा घटुनी तो रोमरंध्र पिंड
वंश पितरांचा वाढवी उदंड; ७५.

काय रंगांनीं माखिले, किं वेषी
असति पूर्वज ते, कोण, कशा देशीं,
काय खाती पिति, कुठें, कशा रीती,
काय हिंडुनि वनिं झोंप तेथ घेती, ७६.

## श्लोक.

कंदमूल करितात किं सेवन,
पाचितान्न रसयुक्त किं भोजन,
वल्कलें करिति वा परिधान तीं,
व्याघ्र-रीस-मृगचर्म किं नेसती ''—७७.

अशी पूर्वजांची स्थिती वर्णियेली
मुखें गोडशा श्रोतियां सांगियेली.
स्त्रिया सर्व साद्यंत तें आयकीती;
किती वागती वार्गं त्या योग्य रीती! ७८.

नाहीं कोणी काढिला शब्द तोंडीं.
ऐशी स्त्रीच्या शांतता पूर्ण हाडीं
व्याख्यानाच्या शेवटीं हें भविष्ये
साध्वी बोले, कीं तिला सर्व दृश्यः–७९.

" जेथें तेथें स्वामि होतील दोन
जेथें तेथें दोन जाती मिळोन
एका मानें एकवृत्ती सुचित्तें
दोन्ही एका चालवीतील सत्ते. ८०.

ज्ञानाचीया वृद्धिलागीं हि तेवीं
दोन्ही एका कारणीं सुस्वभावीं
लागोनी उत्कर्ष तीं पावतील,
सत्कार्यीं तें आयुला लावतील. ८१.

चित्रयोग, मनमोहक गायन,
नृत्य, नाटक, मृदंग सुवादन,
धातुशोध, तरुयोग रसायण
वस्तुधर्मविवेचन, तक्षण, ८२.

वास्तु शिल्पकला सुकला दुज्या
आह्मि जाणत आजवरी न ज्या
जीं अजी असती अबले गुढें.
दोन्हि जाति शिकतील तयां पुढें. ८३.

येई काळ जयीं स्त्रिया जिथ तिथें होतील त्याही कत्री;
सृष्टीला सुख देतिल स्वमतिनें काव्यें रचोनी नवीं;
सौंदर्या कथितील त्या जगतिंच्या, मांडोनियां गायन;
ऐशा स्त्री-कविंचें अशा नगरिं या आह्मी करूं पालन". ८४

## दिंडी.

पुरें होतां व्याख्यान, कमलजेनें
तिघां केली खुण बहू नम्रतेनें;
सर्व विद्यार्थी आपआपुलाल्या
नित्यकार्याला जावया निघाल्या. ८५.

तिघे गेले तिजपाशिं नारिवेषी,
तयां बोले ती, " बुद्धि तुह्मां खाशी
असे सुचली कीं एथ तुह्मी आलां
तुच्छ मानोनी पुरुष-मोह-जालां". ८६

## श्लोक.

बोलोनि ऐसें निघतांचि जाया
ती आपुल्या ओळखि बंधुराया.
" हा बांधवा!"—"हे भगिनी!"—असें तीं
परस्परां बोलुन ओळखीती. ८७.

"तूं काय येथें करितोसि बाळा ?"
बोले सती मारुनि हात भाळा.
"हा वेष, हे कोण, कुठें निघाले ?
कीं लांडगे मेष-कळापिं आले! ८८.

हे ईश्वरा! हा अबला-जगाला
घाला विनाशी आजि केविं आला!
या कृत्रिमानें विलयास जाऊं."
बंधू वदे, "तेविं घडों न देऊं" ८९.

"नाहीं देखियला," वदे भगिनि "तो द्वारावरी लेख का?
'येई स्त्रीजगतामधीं पुरुष जो प्राणा मुके तो फुका;'"
बोले बंधु सुशांत तें भगिनिला "का स्त्रीजनांहातुनी
झाली आजवरी असे कृति अशी, गेलां जरी मातुनी?९०

बोलावें तुम्हिं हो, दटावुनि उगा, अंगीं मुळीं ना बळ
ऐशा भ्याड असां तुह्मी किं, अबला हें नाम हो केवळ
तुह्मां योग्य दिसे." तदा भगिनिनें केलें तया उत्तर
आवेशें चढवोनियां भ्रुकुटिला, काढोनि उच्च स्वरः—९१.

दिंडी.

"नसे थट्टा ही, सत्य मीच बोलें;
जरी आजवरी बोलु तें नकेलें,
परी घडुनी येईल सर्व आतां,
धैर्य आलें बळ आमुचिया हातां. ९२.

राजतनयेच्या जाउंनको वाटे;
तिच्यामार्गी रे असति बिकट कांटे.
उगें साझ्यानें बसवणार नाहीं;
वृत्त कळवाया तिजशिं जाइं पाहीं. ९३.

श्लोक.

का अग्निशीं कोण कधींहि खेळे?
का तेल पाण्यांत कदापि मेळे?

का शस्त्रधारेवर तीक्ष्ण कोणी ?
डेवी वळें अंधपणें स्वपाणी ? ९४.

का गोरियामाजि मिळेल काळें ?
बाजू कडयाच्या कुणि काय लोळे ?
वाटे तुह्मां ही अवघीच थट्टा;
लावीतसां हीं स्वकुळास बट्टा. ९५.

भासे मातें करणि तुझि कीं व्यर्थ आलासि येथें;
जा, रे, जा तूं परतुन गृहीं योग्यमार्गें कि जेथें
शौर्या ज्ञाना सकलहि तुझ्या स्तुत्य हेतू मिळेल.
प्राणा येथें मुकशिल फुका काय तेणें फळेल ? ९६.

पद. रागिणी भैरवी,—ताल त्रिवट.

योजुनि का इथ आलां ? । भ्रात्या ! ॥ ध्रु० ॥
धारियलें कां, या वसनातें । धीट कसे अजि
झालां ! । भ्रात्या० ॥ १ ॥
घेतअसां शिरिं, दुर्घट कार्या । नुमजे काय
तुह्मांला ? । भ्रात्या० ॥ २ ॥
काय ह्मणावें, ऐशा तुझिया । वद रे पुरुषा-
र्थाला ? । भ्रात्या० ॥ ३ ॥" ९७.

साकी.

बोले तयिं तो भगिनिस बंधू कोपित बहु होवोनी,
"कैसें गेलें वात्सल्य तुझें विलया अजि पावोनी ?
झाला विस्मित तो । भगिनिस आवेशें वदतोः—९८.

## श्लोक.

"तर मग भगिनी तूं प्राण माझा ग घेई;
तनुचि करुनि रक्षा ती पुरीं भूभिडाई,
पुरशिल जिथ ती तें लेख तूं गे लिही हाः—
'भगिनिकरविं आला मृत्यु या बंधु-देहा' "९९.

## साकी.

ऐकुनि तें त्या शशिवदनानें वाद असा मित्राचा
म्हटलें, "वाणी कमलजेचि ही, ऐकुनि धालों साचा
बोले गोड किती! । उमटले शब्द हिचे चित्तीं १००.

पाहिलि ऐशी साध्वी नयनीं झालों मी कृतकृत्य !
विचार हीचे गहन किती हे ! ज्ञान हिचें बहु स्तुत्य !
मृत्यू अजि येतां । देइन प्राण तया आतां" १०१.

## श्लोक.

आतां पुढें येउन चंद्रकेतू
संपूर्ण सांगे तिजला स्वहेतूः—
"गे आवडे नित्य सुसत्यवाचा,
ऐकें तरी या कल मानसाचा १०२.

देहीं या तूं देख गे राजपुत्रा !
ज्यालागीं त्या इंदिरे दिव्य पात्रा
होतें जन्मापासुनी योजियेलें;
येणें तीच्या भेटिलागींच केलें. १०३.

तुझा देशबंधू इथें हा पहागे!—
जयाचे मनीं इंदिरा नित्य जागे.

इथें ती वसे, वाटलें येथ यावें;
नयावें तरी भेटि कोठेंचि जावें ?" १०४.

वदे तीः—"स्वदेशास नेणेचि देहो;
असे देशबंधू मला कोठचा हो?
वसे ग्राम माझा, इथें सर्व कांहीं;
जगन्मातृसेवेंत मी येथ राहीं. १०५.

तिचा देश तो देश माझा असावा,
तिचा धर्म तो धर्म म्यां आचरावा,
तिचें कर्म जाणोन चित्तीं धरावें,
तिला वंद्य मानोन येथें रहावें; १०६.

संकेता करुनी अशा दृढ मनें अङ्गेरिला ग्राम मीं;
व्हाया साह्य सुकार्मिं राजतनये आयुष्य येथें क्रमीं;
होत्यें जी अबला स्वयें बदलुनी गेलें असें मी पुरी
झाल्यें पूर्णपणें स्वतंत्र नुमजे आतां जुनी वैखरी १०७.

लग्नाची मुळिं गोष्ट इष्ट इकडे ग्रामीं नसे आमुच्या
येथें सर्व कुमारिका गतधवा जाळ्यांस संसारिंच्या
त्यागोनी सुखद स्वतंत्रपण तें स्वच्छंद सेवीतसों
वार्त्ता काढुंनको विवाहविधिची ती तुच्छ मानीतसों१०८

वचन दिधलें आहे म्यां हें, तिचें व्रत साधिन
तनमन तिच्या कार्या आर्या! दिलें तिजआधिन
बहुदृढ नरश्रेष्ठा निष्ठा असे तिचि कामिं या
त्वचुन नगरी भासे कैसें न हें तुज कामिया ? १०९.

## दिंडी

अतःपर हो मी धणिण माझि नाहीं
नसे अधिकार मुलींच हातिं कांहीं;
जरी मारिल ती जिवें राजवाळी,
पडे मरणें हो भाग तये काळीं. ११०.

सांगवेना जरि कळे तिला वृत्त
पुरुष आल्याचें, क्षोभुनी किं चित्त
जिवें मारिल वा तुम्हां हांकुनीया
हद्दपार करिल मंदिरांतुनी या. १११.

मुखावाटे मम एक शब्द आला
तुम्हांविषयीं कीं भडकतील ज्वाला,
उगी राहें तों सर्व असे शोभा;
वृत्त कळतां पावेल राज्ञि क्षोभा. ११२.

## आर्या

का ना ठावें तुजला, नाहीं स्त्री ही असेचि वाघीण
कळतां कोण तुम्ही हें तुमचे जातील हो गमे प्राण ११३.

द्वारावरच्या लेखा सोज्वळ पाहुन कसे इथें शिरतां?
मारूं पुरुषां ह्मणती कां प्राण तुम्ही उगाच अंतरतां ११४.

जा बंधो! मित्रांसम निज कळण्याआधिं शीघ्र पळ काढीं
आलां तैसे परता पडतां काळाचिया फुका दाढीं ११५.

वर करण्यालागीं हो मानस नाहीं कदा तिचा होणें
जरि इच्छित नघडे हें, वाटे मातें प्रशस्त तव जाणें" ११६.

## श्लोक.

बोले राजकुमार तैं, "नमतसे ह्मणीं जरी तें लिहा
मारूं त्या पुरुषास जो इथ शिरे,—मानूं न हो लेख हा.
प्राज्ञा काय असे जरी ह्मणतसां प्राणास घेऊं स्वयें ?
वीरांशीं पडतांच गांठ समजे कीं त्यांशिं भांडुं नये ११७

जैसा शेतकरी उभा करितसे शेतामधीं बाहुला
हालेना, नचले, नशक्ति करिं ही, नाहीं दृढी पाउलां;
राहे जोंवरि तो उभा, भिवत्ति तैं ढोरां गुरां, पाखरां
भ्यावें भ्याडजनें तसें धमकिला, यावें न या मंदिरा! ११८

आह्मी युद्ध करूं, न भ्याड जन गे मारूं किं युद्धीं मरूं
जिंकोनी कृतकृत्य होउं जागिं या, कीं भांडतानां हरूं
कांहीं ही घडलें तथापि तुमच्या विध्वंस होईल तो
कार्याचा अवघ्या, तुम्हां न यश ये जोंकाल आम्ही जितों."

बोले तैं तीः—"जेविं वाटे करावें
जाल्यें आतां काय होई पहावें;
भीती वाटे, काय होईल अंतीं.
कैसे आलां उग्र या व्याघ्रदंतीं! १२०

तदा नृपकुमार तो कमलजेस, बोले "सती!
अगे, कमलजा प्रिया असशि काय गे तूंच ती?
पिता ममपितामहा रणिं जिचा असे रक्षक
मशीं वळसि तूं जसा वळन दंशिण्या तक्षक! १२१.

तुझ्या कुळिंचि काय ती सरलि पूज्य बुद्धी असे?
तुझ्या हृदयिं तीळही उरलि काय प्रीती नसे?

कशा तरि अशी सखे वदशि वाणि ही दुःसह !
जगास नरुचे असा मनिं धरूं नको आग्रह" १२२.

बोलला पुढें बंधु तो तिलाः—
"नाहिं आठवे काय गे तुला
एकठायिं तीं कैशिं वाढलों?
बाळकें, सुखें कैशिं क्रीडलों? १२३.

एकमेक गे संगतीं ह्य
खेळ खेळलों जे बहु प्रिय
चेंडु सोंगटया तूझीयासवें
खेळलों कसें तुज नाठवे ? १२४.

ज्वरजरादिकें अंग शोषतां
कधिं न भागली जीव कष्टतां,
अजि असे उभी राहिली सती
हरुन भ्यावया प्राण दाति ती ! १२५.

## साकी.

कुरणिं गारशा शांत सकाळीं फिरलों बहुआनंदें;
वनी उपवनीं गुंफुनि पुष्पें ल्यालों जीं स्वच्छंदें
तूं ती भगिनी का । अजि मज धाडिशि यमलोका?"

बोले मग तो निज शशिवदन, "प्राण जोंवरी देहीं
राहे तोंवरि तवचरणीं म्यां लेवुनि स्त्रीवस्त्रें हीं
नित्य इथें राहवें । तुझिया चातुर्या परिसावें!" १२६.

श्लोक.

राजपुत्र तैं वदत तीप्रतीः—
" तूंच्र काय ती कमलजा सती!
लग्न लागतां सजुन नोवरी
जैं ग जावया निघशि सासरीं, १२८.

बोललीस तूं मत्पित्या स्वयें
'सोडिलें तुह्मां आजि निर्दयें
म्यां जरी तरी जाणिजे पुरें
अंतरीं तुह्मां इच्छितें बरें १२९.

बोललीस तैं आमच्या कुणी
गांवचें कुण्या वेळिं, कारणीं,
संकटीं पडे गांविं तूझिया,
साह्य होशि तूं वेळिं त्या तया.' १३०.

साकी.

स्मरुनी भाषण तेंच तुझें गे आलों तुझिया द्वारा
संकटिं पडलों ह्मणशी ऐसें, तरि दे आह्मां थारा
आठविं गे उक्ती। पुरवीं आमुची आसक्ती १३१.

श्लोक.

हरणुलि दिनिं एका सायकें पीडिलेली
पळत तुजशिं आली व्याकुलप्राण झाली,
बघुन रुधिर तीच्या अल्प अंगावरीचें
नयनिं अस्रु गळाले, दुःख जैं तें नसोचें; १३२.

ती आज कोमलहृदी स्वकरें प्रकोपी
गर्वांध बंधुशरिरावर हस्त वोपी;
का बंधुची तनु तुला हरिणीहुनी ती
वाटे उणी? तरि असे अशि कोण नीती? १३३.

होतीस कावि मधुरा, बहु सुस्वभावी!
नाहीं मला कळत कां स्थिति ऐशि व्हावी."
वाग्बाण तीक्ष्ण बहु हे हृदयांतराला
गेले तिच्या, परिसुनी कटु भाषणाला १३४.

## साकी.

मग शशिवदनें भाषण केलें:—"का तूं त्या बाळेची
माता असशी, बहु आवडती इथ जी सर्वत्रांची?"
तैं ती उत्तर दे। प्रेमें गहिंवरलेलि वदे:—१३५.

## श्लोक.

"जळो हा मायेचा भ्रमवित पसारा मृदु मना!
असे वेडी माया, बहु पिडितसे सद्गुणिजनां,
स्वकर्त्तव्यालागीं कधिंहि तरि बाधा करितसे;
वसे प्रीती जेथें कठिण मन होई तिथ कसें! १३६.

परी कां भ्यावें म्यां, सुकृत करण्यालागिं अपुलें?
स्वमाताहातांनीं वलि न चिलया काय दिधलें?
स्वपोटींच्या पिंडाहुन भगिनिला का प्रियतर
असे बंधू लोकीं? उगिच मग कां मी भिउं तर? १३७.

न मत्स्वामीणीची शपथपर सेवा कधिं घडे,
जरी बंधू सोडीं, पुरुष जित हे आजि इकडे;

अहा ! कर्तव्याला स्वजन-ममता बाध करिते !
मला नाहीं आतां सुचत; बघल्यें काय घडतें. १३८.

करावी गमे एक युक्ती क्षणीं या;
भल्या राजपुत्रा ! प्रिया बंधुराया !
कचाटयांतुनी म्यां तुह्मां सोडवावें
तुह्मी, वाटतें, येथुनी शीघ्र जावें १३९.

पद, रागिणी कानडा. ताल त्रिवट.

ख्याल. " राजा दुलारे "—या चालीवर.

आजउयां तुह्मि येथुन जावें मुकाल नातरि प्राणातें
जाल कीं नाहीं तुह्मी बांधवा सांगा साचें आणि मातें॥धृ॥
मंदमती त्या तिघिही होत्या, येत्या ना कधीं कामातें,
ऐसें सांगुन समजावूं त्या कांचनपुरी मानेतें ॥१॥ आज.
जा हो येथुन जिवा वांचवा घालीं माझ्या आणेतें
उठवुं वदतां पळोन गेल्या तिघिही आपुल्या ग्रामातें
॥२॥ आज० १४०

श्लोक.

यावें म्यां तुज मृत्युला भगिनिनें, ऐसें घडे का कदा !
देहाचें नसतांचि भान वदले, वाणी अशी दुःखदा !
हा बंधो ! गृहिंचें मला कुशळ रे तूं सांग आतां प्रिया,
माता केशि असे, कथीं; मन करीं तूं शांत; टाकीं भया' १४१

दाटे तैं हृद कोवळें भगिनिचें पाहोन बंधुमुखा;
प्रेमें नेत्र भरोन अश्रु गळले; पावे मनीं ती सुखा;
हातीं त्या धरिलें, उरीं कवळिलें, आलिंगिलें बंधुला
भेटाभेट जहालि जावें सरिता अंतीं मिळे सिंधुला. १४२.

जैशी ती सरिता नये वळखितां जातांचि रत्नाकरा,
कल्पांतीं जशि काढतां कधिं नये दुग्धांतली शर्करा,
तैसें तें द्वय राहिलें भिडुनियां, तें एकमेकाप्रती
ऐशा या घडिच्या सुखीं गढुनियां दोघें स्वयें चुंबिती. १४३

आनंदाश्रु नयनिं भरुनी प्रेममूर्ती गळाले;
ऐकोनी ती भगिनि गृहिंचें क्षेम संतुष्ट डोले.
बंधूहत्या घडविति अशी बुद्धि सारी पळाली
राजद्रोही बनलि तिचि सत्कार्यनिष्टा जळाली. १४४.

साकी.

ऐशि उभयतां बोलत असतां; एकमेकां तीं प्रेमें,
देखे तिथ ती, शशीकलेची तनया मधुकरि नामें.
बाळी तिंज बोले:—। "घेऊन मायनिरोपा आलें." १४५.

श्लोक.

हंसनवदन जीचें, काय ती कोंवळीशी;
नयन फुलितपुष्पासारखे तेजराशी;
मधुकरिअभिधाना शोभश्री जी कुमारी
उभि तिथ सुकुमारा राहि आनंदकारी. १४६.

पुसे कमलजा तिला, "सकल काय गे भाषण
तुवां वद किं ऐकिलें ? तुज नदेइं मी दूषण"
तदा मधुकरी वदे करुनि अंतरंगा खुलें,
तुह्मां कथितसें खरें, सकल भाषणा ऐकिलें; १४७.

मनांत नव्हतें, परी जायें उभी इथें राहिलें
ध्वनी भयद तूमचे पडत, कर्णि या ग्राहिले

क्षमा मज करावि हो, दिसतसें जरी आग्रही,
घडेल नकदापि कीं करिन गोष्ट षट्कार्णि ही. १४८

नसे बुद्धी माझ्या हृदयिं, नरुचे या मुळिं मना
अशा कीं धाडावें त्रयशुपुरुषां मृत्युसदना.
अहो या वीरश्रीविजयभरल्या दिव्य मनुजां
कसें तें हाणावें? निजबळ असे कोठिल भुजां?" १४९

वदे तैं ती बालिप्रति कमलजा, "हे प्रियसखे!
जरी ऐशी वाणी नसति ग निघाली तवमुखें,
तरी भीती कांहीं हृदयिं नव्हती, वा कधिं नये;
तुझेठायीं आहे परम ममविश्वास सखये १५०

परि तव मज वाटे, मत्सरी द्वाड माता-
म्हणत अजि ग होत्यें-फार का बोलुं आतां;-
दिसशि सकल कामीं शाहणी नित्य जी तूं,
'त्र' न कधिं मुखिं काढीं, जाय तैं सिद्धि हेतू." १५१

बोले बालि तदाः-"चकार मुखिं या येणार ना शब्द तो;
कोणा वर्म न हीं कथील रसना, मीहह जों हा जितो.
आला भूवरि ब्रह्मदेव जरि तो, जिव्हाग्रिं ती शारदा,
वाणी ना निघणार जी वदलिया होई जनां दुःखदा" १५२

कमलजा तदा बोलली तिला;-
"प्रभु समर्थ हो साह्य तो तुला!
सुचवु संकटीं योग्य बुद्धिला;
सकल कार्य हें जाउ सिद्धिला!" १५३.

"नको गे हे साध्वी!" शशिवदन बोले कमलजे
"नको आम्हां त्यागूं, पुरुषगण आह्मी सुरत जे

स्त्रियांठायीं आहों; कळत मुलिंना, स्त्रीजन जरी
मनुष्यां अंधेरी, घडुन कशि येई गत तरी." १५४.

"बरें!" ऐसें मग कमलजा ह्मणाली,
"गोष्टिखालीं ही फार वेळ गेली.
नीट वागा हो, थाट शोभवा तो
जाय सिद्धी ना अन्यमार्गिं हेतो. १५५.

माझी आहे हीच तुह्मांस सांगी,
बोला थोडें; फारशा एक जागीं
कोणासंगें बोलुं तुह्मी नका हो;
जेथें जेथें जाल तैं ऐक्य राहो." १५६

निघाले जायातें, तयिं शशि मुलीतें उचलुनी
सुता घेई प्रेमें कटिं, कमलजेची कवळुनी;
धरी तो बाहूशीं परमसुकुमारा कुमरिला
रमोनी बाळेनें हंसत शशिचा गाल धरिला. १५७

चुंबिलें सुमुख मंजुळिचें तदा,
चुंबिल्याविण अशा सुमुखा कदा
पुरुष राहिल कोण कसा तरी?
चुंबुनी तिज, विनोद बहू करी. १५८

तिघे मग तिथोन ते पुनरपी निघाले सर्वे;
दुपारभर फीरले; तिकडिकाणिं तेथें, नवे
प्रकार बघतां तयां बहुत हर्ष झाला मनीं;
बसोन बहु विस्मयें पठन देखती स्त्रीजनीं. १५९

ऐका तिथें शिक्षण केविं देती;
भूगोल गोलांवर शीकवीती,

वर्तुळ रेषाकृति भूमितीच्या,
शिष्यांप्रती दाविति ज्योतिषाच्या. १६०

महाभारतांतील वाचूनि वेंचे,
स्फुट श्लोक बोधार्थ रामायणाचे,
तसे श्लोक ते रामदासी, मनाचे,
करीती मनोरंजन स्त्रीजनांचें. १६१

समयसूचक भाषणिं ज्या ह्मणी,
चतुर योजिति नित्य सुभाषणीं,
कथुन सांगितलें मग मर्म तें,
सुगम जें गमलें तित्रिया मतें. १६२

राजनीति, इतिहास पुरातन
कालमानगणना भववर्णन
तत्व शारिर ज्योतिष योगही
न्याय, दाय, जयिं चालतसे मही, १६३.

खग नग तरु पुष्पें वाढती कोणरीती,
जलचर पशु यांतें कोण कैशापरी ती
गति जननमृतीची, लाभते जीवनाची,
परिसुनि युवतींच्या तृप्ति होई मनाची. १६४

विद्युत्प्रयोग करुनी मग दावियेले;
केल्या रसायणकृती तयिं दंग डोले
सारी सभा युवतिंची, बघुनी जगींचे
आल्हाददायक असे व्यवसाय साचे. १६५

जें जें शास्त्र असे सुगम्य मनुजां तेंतें तिथें पाहिलें,
जें कांहीं उपलब्ध आजवरि, त्या ज्ञाना तिथें वाहिलें

प्रत्येकीं मन आपुलें युवतिंनीं प्रेमें पुऱ्या आर्त्तीनें;
पाहोनी नर हें तिघेहि रमले; कुंठीत झालीं मनें. १६६

तिघे वृषभ गोठियांतुन सुटोन रात्रौ जसे
फिरोन कुरणीं, तृणें भरिति पोट स्वच्छंदसे,
त्रिवर्ग तसियेपरी, फिरुनि पाठशाळेमधीं
यथेच्छ उपभोगिती विविध भोग ज्ञानांबुधीं.१६७

दिंडी.

चंद्रकेतू मग बोलला, "बघा या
काम चालविती स्वयें सर्व बाया
पूर्ण ज्ञानें, चतुराइनें, सनीती,
बहु प्रेमानें, नरांचिये रीती!" १६८

साकी.

शशिवदनानें उत्तर केलें ऐका राजसुताला:—
"स्थापिलि शाळा काय त्यामधीं पुरुषार्थचि तो झाला?
नाहीं का बाया।शिकविति बाळां गृहिं आया?१६९.

श्लोक.

उच्छिष्ट पात्रें असती स्त्रिया या;
शक्ती नसे शोध नवे कराया;
केलें कुणी कांहिं तयाप्रमाणें
ये त्यां करूं तें बहु शिक्षणानें." १७०.
"धिक्कार मूर्खा तव वल्गनांतें!"
संतप्त बोले कमलाक्ष त्यातें.

"तत्त्वज्ञान वृद्धीस न पावलें का
व्याख्यान हें ऐकुन आजि लेंका?" १७१

"कसा 'नाहीं' बोलूं" शशिवदन बोले. वद भलें!
अरे व्याखानातें परिसुनि खरें ज्ञान दुणलें.
निमेषामाजी मी सकल शिकलों जें कमलजे—
मुखावाटे, तें ना युगिंहि शिकतों, पूर्ण उमजे. १७२

प्रसिद्धां शास्त्रांचें परम अजि तें दैवत जरी
शिरीं माझ्या ओती प्रिय निजकरें शास्त्रहि तरी
मला वाटेना कीं मजशिं मिळतें ज्ञान इतुकें;
कधीं लाभे कोणा, परिसुनि मिळे आजि जितुकें! १७३

परी बघ इथें किती, सुहृदयें कशीं कोमळ,
अशा अवनिं राहुनी नगरिं या कुबुद्धीमळ
पदोपदिं हळूहळू करिति नित्य तीं सेवन;
अभाव नरमैत्रिचा बहुत दूषितो स्त्रीजन. १७४

अरे उपजला असे बहुत लोभ माझ्या मनीं.
दिसे न दुजि सुंदरी प्रिय अशी मला या जनीं.
गमे वरुनि तीजला सकल सौख्य संसारिंचें,
निवांत उपभोगितों, परि न लग्न येथें रुचे. १७५

किती सुरमणीय या दिसति ज्ञानभोक्त्या स्त्रिया !
किती सुगुरुमायि त्या मनविहारि शिष्यप्रिया !
कितीक समयीं मला नटवि थाट हा वाटला
अयोग्य ! गमलें स्त्रियां पुरुष दाखवावा भला. १७६

ऐशी, ही कृति ना परी मुळिंच ये कामास या मंडळीं.
ओढाताण करोन आणवियला स्त्रीचा ध्वनी या गळीं.

प्रार्थिलें नटनायका, कधिं न हीं सोंगें कळावीं स्त्रियां.
स्त्रीवेषीं वसुनी तयांमधिं सदा प्रेक्षीतसावें तयां! १७७

दिंडी.

पुरी होतां ही उक्ति त्या शशीची,
वेळ झाली माध्यान्ह-भोजनाची;
भोजनाच्या मंडपीं येउनीया
जागिं बसली एकेक आपुलीया. १७८

तिथहि एक्या स्थळिं बैसलें त्रिकूट
नाहिं झाली कधिं—होइ कशी?—फूट.
दाट शोभे तो थाट स्त्रीजनांचा,
रंग पाटांचा ताट वाटियांचा. १७९

अन्नदात्याला प्रार्थुनी मुखानें,
एक घोषें मांगल्य गीतगानें,
देव तोषविला; अन्न उष्टियेलें;
षड्रसानें रसनेस तुष्टियेलें. १८०

साकी.

भोजनसमयीं, शशीकलेचे त्रिकुटावरति कटाक्ष
दिसोन आले परी त्रिवर्गें केलें तिथ दुर्लक्ष.
जणुं का वाघिण ती । पाडस रानीं प्रेक्षीती. १८१
भोजन झालें; सेवुन तांबुल, कोणी कोठें जाती,
कोणि उपवनीं, वनीं, फिरुनियां, पाडांतर करिताती;
ऐसें मंडळ तें । हर्षित क्रीडा वनिं करितें. १८२

कोणि पडावीं वसुन नदीवर उल्हासें तरताती;
कोणी चारेवर पडती, कुणि चढती वृक्षावरती.
ऐसे मंडळ तें । हर्षित क्रीडा वनिं करितें. १८३.

कोणी मयुरांसंगें खेळति, उडविति कारंजातें;
स्त्रीवेषी पारि बैसुनि एक्यास्थाळीं बघती मौजेतें
जाती मिसळुन तें । तरी त्यां स्त्रीजन ओळखितें.१८४.

पद. राग, देस. ताल, त्रिवट.

कलिया भीनन जाय—या चालीवर

सुमनें वेंचित जाय, कुमारी, तीनसांज वेळीं।
सुमनें वेंचित जाय ॥ ध्रु०॥
कुसुमें वेंचुनि उभी टाकली। शोभे सुंदर रम्य नार,
प्रेमा मानिं त्या राजकुमारा, उठे नवल तें काय? १
सुमनें० १८५

श्लोक.

सायंकाळ समीप येउन जयीं व्योमीं सतेज ग्रह
सौंदर्यें गगनास शोभविति तीं संपूर्ण चंद्रासह,
अंतःपूरिं प्रवेशती युवति त्या साऱ्या सुवेळीं तया,
प्रार्थाया प्रभु, जागजागिं पडण्या,निद्रा सुखें घ्यावया. १८६

एकवार हो, अन्न सेविती
त्या मितव्ययी; योग्य ही रिती;
अल्प अन्न तें सेविल्या सदा,
या तनूसि ना बाध ये कदा. १८७

ज्ञान वेंचतां श्रांत जाहल्या,
झोंप घ्यावया सर्व चालल्या.
देवराय तो आठवोनिया
मागती:—"करीं माय गे दया! १८८

कार्य जाउंदे सर्व सिद्धिला;
देइं गे बळा, शुद्ध बुद्धिला;
स्त्रीजनांस तूं देइं गे यशा.
स्त्रीजनीं असे झालि दुर्दशा!" १८९

सर्ग दुसरा समाप्त.

# संवाद नामक सर्ग तिसरा.

### श्लोक.

सहस्ररश्मि प्रभवासि आला;
प्रभंजनें बाष्पतुषार गेला;
प्रमोद झाला पशुपक्षियांला,
प्रसन्न ते जाति चरावयाला. १.

कारंजियांचे उडती फवारे;
लता तरू नूतन पुष्पभारें,
शोभा वना देति सुरम्य सारी.
रंगें खुले अंबर तोषकारी. २

### दिंडी.

तिघे होउनियां उषःकालिं जागे,—
( भयें निद्रा त्यां पूर्ण कैंचि लागे?)
ईश प्रार्थुनि मुखमार्जनादि केलें;
पुनरपी ते स्त्रीवसन शुद्ध ल्याले. ३

### श्लोक.

जिथें कारंज्यांचें उडत जल होतें सभवतें,
उभे होते बागेमधिं तिथ तिघे एकवट ते;
तुषारा पाण्याच्या निरखिति बहू ते सुखि मनीं;
तदा आली बाळी मधुकरि तिथें म्लानवदनी. ४

नसे निद्रा डोळीं अखिल तिचिया रात्रभर ती;
तिघां पाहोनीया खळखळ तिचे अश्रु गळती.

भयानें चिंतेनें, सकल तनुला कंप सुटला.
मुखावाटे ये ना ध्वनि मुळिं, असा कंठ सुकला ५.

### साकया.

यत्न करुनि परि मधुकरि बाळी राजकुमारापाशीं
दावरलेली उभी राहिली, लागे धडक उराशीं.
बोले गहिंवरली, । " मित्रा! भ्रांति मला पडली!" ६.

" धांवा धांवा ! " ह्मणे सुबाळी " माता माझी जाणे
कोण असा तुह्मि, काय कारणें झालें तुमचें येणें.
आहें अपराधी । मागें क्षमा करा आधीं. ७

येथुनि जा हो, नगरी सोडा; तुमचें कळलें वर्म;
निजगुह्याचा घडा फोडिला; केलें अनुचित कर्म !
झाल्यें अपराधी । कथितें क्षमा करा आधीं. ८

हातुनि माझ्या गोष्टचि गेली, झाली षट्कर्णी ती;
मित्रद्रोही ऐशि काळिमा, मजवरती हो आली !
आहें अपराधी । तरि हो क्षमा करा आधीं. ९

### दिंडी.

असे मातेची चाल माझिया कीं
जरी कोणी ये नविन नारि-लोकीं,
माय इच्छी तें वागिं तिच्या जावें;
कमलजेला सर्वांनिं ही त्यजावें १०.

### श्लोक.

स्थापिली नगरी जयीं, अवतिलें ते काळिं, कीं इंदिरा
राज्ञी कांचनपूरिची बनुनियां, सव्यापसव्या करा

मन्माता बसवात्रि, ती कमलजा, दोघी समप्रीतिच्या;
आतां ती प्रमुख प्रिया कमलजा झाली मनें राज्ञिच्या ११.

दिंडी.

असा क्रम इथ विपरीत चाललाहे;
नवी येतां जी कमलजेस पाहे,
कमलजेच्या ती वर्गि जातआहे;
हेंचि माते माझिया मुळिं न साहे १२.

श्लोक.

बोले माता, 'येइ जो तेथ जाई;
झाली ती या कांचनीं गोड आई !
मातें कोणी काय नाहीं पुसावें?
होई जें जें पाहुनी तें असावें.' १३.

करिति माझि ती माय दुर्धरा,
कमलजेचिया नित्य मत्सरा;
बसुनि, रात्रिं ती चौकशी करी
कुठुन पातलां या तुम्ही पुरीं १४.

बोले 'कशा या, किति भव्य नारी!
काया तयांची पुरुषप्रकारी.
भारी मला भासति दांडग्या या,
माझ्या नको सन्निध ह्याचि वाया' १५.

स्वदेश भगिनी तिघी, कमलजा असें सांगते;
तिच्या तिजाचि शोभती; मज नको, न मी मागतें;
असें वदलि तें मुखीं पळसवर्ण शुद्धप्रभा
खुलोन, मनिं व्याळ तो भगिनि-द्वेष राहे उभा १६.

म्हणे मजशिं माय ती, 'त्यजितसे असा कासया;
कपोलिं तुज रंग हा; गमत कीं न या गे स्त्रिया;
कशा क्षणिंच गे अशी फिकट होशि सांगें मुली?
असे विदित काय गे कुठुनि हीं इथें पातलीं? १७.

कशा इतुकि लाजशी; वद किं डावकें जें असे.
स्त्रिया असुनि दीसती पुरुषरूपि ऐसें कसें?
असेचि तुज डावकें दिसतसे तुझ्या गे मुखीं—
निघे पुरुष—साच हें—कमलजा तयांची सखी १८.

समागमिं तिघांचिया प्रहर बैसली बोलत.
मुली! मजशिं सांग, गा! असशि काय त्यां जाणत,
कशा लपविशी अगे, कळतसे मला स्पष्ट जें?
नको मजशिं सांगुं तूं--कपट तूज हें ना सजे' १९.

शब्दीं ना वदलें; मुखावरुनि तें आलें कळोनी सर्व
होतें घोळत काय अंतरतळीं—साऱ्यां न जें जाणवे—
ऐशी ज्ञानलता प्रचंड वनिता माता मदीया मला
माझ्या बुद्धिस नाडुनी, हृदयिंचा तें व्याळ तो जाणला.२०

प्रातःकाळिं उठोन ती कळविण्या हें वृत्त त्या इंदिरे
गेलीसे; नकळे मला आजि कसें होई; बहू घाबरें;
सर्वस्वीं बुडली असे कमलजा, झाला तिचा नाश हो;
जा येथून सर्वे, जिवा तुमचिया क्लेशाग्निं पीडा न हो!२१

गेल्याअधीं हो मज पापिणीला
द्या हो क्षमा म्यां अपराध केला.
कैसें तुम्हां या वदनास दावूं?
वाटे किं अग्नी तनुलागिं लावूं' २२.

### दिंडी.

तदा शशिवदनें प्रश्न तिला केला,
हंसत बोले करिं धरुनि सुंदरीलाः—
"काय भाषण गे करिशि मधुकरी हें?
काय केली कृति ऐशि तुझ्या देहें? २३.

नको कांपूं गे; नको गार होऊं.
तुझ्याबदली हे स्वयें प्राण देऊं.
काय ऐसें निस्तेज तुवां व्हावें!
मुखा म्लान तुझ्या आह्मि का पहावें २४.

नको खेद करूं; क्षमा कशा व्हावी?
निरपराध्यां शिक्षा कुणी करावी?
मायसंगें बोलतां म्लान झालें
वदन ह्मणुनी का तुवां पाप केलें? २५.

### श्लोक.

ऐशा या नगरींत गे क्षणभरी आणीक राहूं गमे;
इंद्राच्या भुवनांतरीं मन न हें ऐसें कदा ही रमे;
जाऊं या नगरीस सोडुन तरी पावूं फजीतीप्रती;
वैकुंठीं वसल्या जशी यमपुरी, होईल तैशी गती २६.

शशिकलेचि या विनवणी करूं;
दिवस कांहिं या कृतिस आचरूं.
जरि वळे तरी स्वमनकामना
करि पुरी; नसे किंतु या मना २७.

## दिंडी.

द्रवहि पाषाणा येइ विनवणीनें
काय अंतर तें, द्रवे न वाणीनें ?
कार्य भागा या करावया जातों, "
असें बोलुन शशि शीघ्र तैं निघे तो. २८.

## श्लोक.

कमलाक्ष बोले, "वद केविं, बाले !
सतियांमधीं भांडण काय झालें."
मनिं गोकुळ्या ती वदली सुबालाः—
"बहु भांडणा काळ असेचि झाला. २९.

अहो द्वैत हें आंतुनी फार दीस
असे माजलें; तें दुणे मास मास.
असे माय माझी बहु द्वेषकारी,
तयीं अंत ऐक्यास ये दुर्विकारी. ३०.

अहो भांडणारी असे वारियाशीं,
ह्मणे पूर्ण होता पती मौर्ख्यराशी;
नसे पाहिलें त्यां कधीं बापड्याशीं
बहू सोसतें आइच्या जाचणीशीं. ३१.

इंदिरा तिच्याहातिं वाढली,
माय–राज्ञि–ती जैं निवर्त्तली;
आलि जैं इथें स्वत्सहोदरी
इंदिरेस ती झालि प्रियतरी. ३२

एक्या भावें एक चित्तें सती त्या
सख्यत्वें या ग्रामिं राहात होत्या;

बोलें जें जें एक त्या नित्य दूजी
हो हो बोले सर्व ही कामकाजीं ३३.

कार्याकार्यीं नित्य एका मतानें
चाले सारें, दोघिंच्या त्रियमानें;
मन्माता ती मत्सरी अंतिं बोले,
येतां स्पर्धा वैभवा सर्व नेलें ३४.

वदे माता ऐसें:–' सकल युवतींतें कमलजा
स्ववर्गीं नेवोनी, उपजवि तयां चित्तिं समजा
स्थळीं अन्या जातां बिघडतिल कीं कोमल मनें;
असें चोरीयेलें मन सकळिकांचें कपटिनें. ३५.

कमलजेप्रती ऐशिये रिती
दुरितयुक्त हो, माय माझि ती
परम निष्ठुरा शब्द लाविते;
निजशिं ही निची उक्ति शोभते ३६.

## साकया.

आतां जातें; वेळ जाहला, राहुन येथें, भारी "
ऐसें बोलुन धांवत गेली बाळी चित्तविहारी
जंशिका चिडि उडली। झडकर सुखकरि ती गेली ३७.

कमलाक्ष तिची गति न्याहाळुनि बोले "धन्या बाळा,
वरणें जरि तरि अशिच वरावी सच्छीला, वेल्हाळा.
आहे गोड किती!। शुद्धा केवीं ही चित्तीं. ३८.

मदांध किती ती पहा इंदिरा गर्वामाजि बुडाली !
कमलजाहि ती अशा स्त्रियेची दासी पूर्णचि झाली.
बाळे जोड नसे। मधुकारिसम इथ कोण दिसे?" ३९.

परिसुनि ऐसें राजपुत्र तो बोले निजमित्राला:—
"योग्य तुझा हा विचार मित्रा! मनास माझ्या आला
बाळी गोड असे। ह्मणशी तेंचि यथार्थ असे. ४०.

## श्लोक.

जसें भावें तैसें वदसि कमलाक्षा घडिस या;
जया जैसें वाटे. निवडि वधु तो पारखुनियां.
मला साऱ्यांमाजी प्रियकर गमे राजतनया,
जरी एका नादें भ्रमलि तरि ती ग्राह्य हृदिं या. ४१.

विशाळबुद्धी, चतुरा किती ती!
ऐसा पसारा घडवी स्वहातीं!
स्त्रीउन्नतीची धरि चित्तिं आशा
छेदावया स्त्री-जन-दास्य-पाशां ४२.

शतपंडितां जिंकित जी प्रसंगीं,
शतयोद्धियांचें बळ शौर्य अंगीं;
शतभास्करांचें शिरिं तेज शोभे;
पिडलों अशा सुंदरिचेनि लोभें." ४३.

## दिंडी.

असें बोलत अंगणें सोडियेलें
त्रिवर्गानें; मग गच्चिवरी आले;
संगमरवरि खांबाशिं उभे ठेले,
उत्तरेचा जिथ वायु-वेग चाले. ४४.

गंध केतकिचा, जाइच्या वनींचा,
करी सुटुनी संतोष मानसाचा;

गुलाबांच्या परिमळें व्योम कोंदे
बारमासहि जें पुष्प बागिं नांदे. ४५

### साकी.

शशीवदन तैं आला तेथें, श्रांत बहू झालेला,
हस्तद्वय मस्तकिं ठेवुनियां आळस टाकीयेला.
बोले:—"कठिण घडी। नाहीं शशिकले जोडी ४६.

### दिंडी.

पर्वताचे खोदितां ढीग येती;
येति तोडीतां घोर अरण्यें तीं;
लोह बाहुबळें वळवितांहि येई;
वळेना ही पाषाणरूप बाई. ४७.

### श्लोक.

शशिकलेची त्या भेट घेतली,
अति विनम्र म्यां भीक याचिली,
उघड हें कधीं कृत्य आपुलें
करुंनये असें तीस प्रार्थिलें. ४८.

युक्तिप्रयुक्तीं मधु भाषणानें,
प्रत्येक शब्दीं बहु आर्जवानें
आराधिलें म्यां जणु दैवताला,
कीं हा टळो आजि अघोर घाला. ४९.

तैं शोध केला जन कोण आहों,
कोठें असों जात कुठेंचि राहों,

योजूनिया काय मनांत आलों,
हा वेष कां आपण येथ ल्यालों. ५०

कथिलि सकळ वार्त्ता साग्र, झाली असे जी
परिसुनि निजगुह्या जाहली नाहिं राजी.
मग जायें तव तथा योजुनी प्रश्न केले,
चढवुनि भ्रुकुटीतें, विस्मया दाविर्येलें. ५१.

आवेशानें बोलली हें मला तीः—
'जें जें बोलां, गैर तें सर्वरीती.
स्त्रीमंदीरीं पातलां गैर केलें;
स्वप्राणातें कांटिया लाविर्येलें.' ५२.

उद्देशूनी बोललों द्वारलेखाः—
' उल्लंघीली आह्मि बुद्ध्याच रेखा;
जें त्यायोगें ये घडोनी घडो तें;
पाहूं स्त्रीच्याहातुनी काय होतें ५३.

इथें आह्मी आलों समजुन मनीं पूर्ण,' वदलों,
'बळी द्यावा लागे; ह्मणुनि मरणा पात्र ठरलों;
जिवें आह्मांलागीं जरिहि तुह्मि माराल इकडे,
तरीं कार्याचे हो सकल तुमच्या होती तुकडे.' ५४.

## दिंडी.

'अणिक तुकडे हो काय व्हावयाचे?
दिसे', वदली ती, ' चिन्ह हो भिकेचें
शत्रु शिरले-नर-दिव्य नगरिमाजी
काय तोटा होणार अधिक आजी! ५५.

### श्लोक.

असे काय नाशास आतां उगें तें;
इथें पक्षपातें सदा काम होतें.'
तदा मी वदें:—'हो नको राजबाळे
कळों वृत्त देऊं, स्वयें आयकीलें. ५६.

नको फोडुं गुह्य; सकळ कळल्या राजतनये.
अहो वड्डा मोठा तव कुमरि-नाशास उगि ये,
असोनी ठावें कीं नर असुं, न ती बोलालि परी.
अशी कां पाडावी मुखिं सकळिकांच्या मधुकरी?' ५७.

'तुह्मां काय त्याचें', मला बोलली ती:—
'तयाची मला काळजी सर्वरीतीं.
नसाव्या तुह्मांलागिं पंचाइती या;
स्वधर्मास जाणें, स्वकर्मीं कराया.' ५८.

मग बोललों मी:—'जरि इंदिरेला
अजि हाचि वृत्तांत विदीत झाला,
करुं आह्मि संग्राम वळें स्थळीं या
हरुं इंदिरेला, धरुं जिंकुनीया. ५९.

### साकी.

कितीक जातिल प्राण हरोनी, होइल नाश जनांचा
नगरींच्या गे विध्वंसानें लय होइल कार्याचा;
समजा हेंचि मनीं। हांसें होइल सर्व जनीं.' ६०

### श्लोक.

ती बोलली:—'जें हृच्चें करावें,
संग्रामें, कीं हो कपटें धरावें;

त्या राजबाळीस बळें बरात्रें,
दासीपरी नित्यहि वागवावें. ६१.

परी धर्म माझा न मी त्यागिणार;
घडो जें घडे, इंदिरे सांगणार
तिघांनीं जगीं या किं कापट्य केलें
गृहीं यांप्रती भेदु सामील झाले' ६२.

एकोनी तिचि उक्ति यापरि जरी सारी हि आशा गळे,
सोडीलें मुळिं आर्जवा तरि न म्यां संकेत ही ना ढळे;
जैसें तें पय थेंब थेंब पडुनी पाषण ही खोदितें
काळें जातिल वाटलें हृदिं तिच्या माझे तसे शब्द ते. ६३

ह्मणोनी युक्ती म्यां लढविलि गमे योग्य समयीं;
ह्मणालों 'बाईगे! घडिभर करीं ख्याल हृदयीं;
नको होऊं ऐशी निरवधि उतावीळ युवती;
अगे ऐकें वार्ता, निजमनिं धरीं धीर सुमती. ६४.

भामा सुंदरशा उपस्थित तुवां केलें अधीं या जरी
आरंभीं जरि मुख्य तूं, हळु हळू झालीस गे दूसरी;
आतां झालिस सांगती, तिसरि तूं, त्याहून ही गे लघू,
नीचत्वा किति पावलीस तुज गा ठावें, पुरें हें बघूं. ६५

ऐकें गोष्ट सती! तुला विनवितों, उच्चा पदातें तुला
नेऊं, यत्न करोन आह्मि, जरि तूं, पोटीं स्वयें गोष्टिला
ठेवोनी, अमुचें विवर्ग नगरीं राहूं सुखी देशिल.
मित्रा देवाविं इंदिरा नवरि तूं, तो गे तुला तोषिल. ६६.

बांधोनी तुज देउंगे कुठतरी स्त्रीराष्ट्र विस्तीर्णसें
कीं नाहिं कधिं कोणिं जन्मि अपुल्या पाहियेलेंही असे:

तेथें राज्य अखंड तूं करिशिल, प्राज्ञा कुणाची असे
कीं येवोन कुणे रिती छळिल गे तूंतें कदा राजसे?' ६७.

परिसुनि वचना या माझिया स्तब्ध झाली.
निज फुस दिधली जी ती विचारास आली.
मनन करुनि मातें बोलली शांतवाणी':—
'उजडत मज भेटा, शब्द काढा न कोणां." ६८.

साकी.

शशीकलेच्या भेटीचें हें शशिवदनानें केलें
वृत्त निवेदन, इतुक्यामाजी आमंत्रण तिथ आलें.
दासी उभि राहे । बोले, ' राज्ञि तुम्हां वाहे. ६९.

श्लोक.

उत्तरेकडे पहाड जो वसे
नीर शुद्ध ज्याशिरीं वहातसे
राज्ञि मौज तें निघे पहावया
या तरी तिथें दुपारिं जावया." ७०.

हा निरोप त्या दासि सांगुनी
आंवतीति हो सर्व कामिनी;
नेमल्या स्थळीं, काळिं योजिल्या,
सर्व नारि त्या सिद्ध जाहल्या. ७१.

कुमारें जयीं इंदिरे पाहियेली
अती शुभ्र साडी स्वयें शुद्ध ल्याली,
झणी राहिलें प्रेम ऊभें मनींतें.
प्रिया जाहली जी बहु काल त्यातें. ७२.

मग सर्व अश्वारूढ होउनीयां
सजल्या स्त्रिया त्या निघतात जाया.
शिरिं पर्वताच्या अवघ्या चढाया
करिती तयारी, किति धीट बाया! ७३.

कुणि एकटी जाय, न संगतीला;
कुणि घेउनी चालत मैत्रिणीला;
निज अश्व नेला कुंवरें सकाम
तिजसंगतीं, जी हृदया विराम. ७४.

तिच्यासांगातें त्या परम विनयें राजकुंवरें
तुरंगा ठेवीलें, जवळ तितियाबाजु निकरें;
असा साऱ्या मार्गीं तिजनिकट चाले गजगति;
मनीं इर्षा ही कीं कळवुं तिजला मानसरति. ७५.

वदली तया ती: "तुमच्या सखीला
झिडकारुनी म्यां अवमान केला;
तयिं दुःख वाटे जरिं कां तुम्हांला,
समजा तसा खेद मलाहि झाला." ७६.

दिंडी.

"नाहिं मैत्रिणिचा," कुंवर बोलियेला,
"परी त्याचा अवमान असे झाला,
गोष्ट ज्याची म्यां कथिलि आपणाला,
मागताहे जो आपुल्या कराला. ७७.

### पद जिल्हा झिंजोटी. ताल त्रिवट.

( वस्त्रानें देह सारा—या चालीवर. )

सूर्यवंशीं चंद्रकेतू, कुलभूषण शोभतो,
करग्रहणा योग्य तुझी, मनिं धरी असा लोभ तो.
ग्रामींच्या नारि त्याच्या, आम्हि त्या जाणतों;
जोडपें दोघांचें हें, बहु शोभेल मानितों ॥१॥ ७८.

### श्लोक.

बोले तदा त्याप्रति राजबाला:—
"ही पाहिजे गोष्ट पुनः कशाला?
का हेर आलां मज मागण्यातें
सांगा पुरें कायचि एकदा, तें." ७९.

### दिंडी.

काय बोलावें अशा हो प्रसंगीं?
राजतनयें कीं स्वयें ऐनरंगीं
रूप दाउनि अक्षेप तो वदावा
विवेकानें वा धीर कीं धरावा? ८०.

असे त्याच्या मनिं बहु विचार आले;
गिळत चावत मग इंदिरेस बोले:—
"असे ओळख त्या राजकुमाराची;
गोष्ट जाणें मी लग्न योजिल्याची. ८१

जसा मानी तो, तशा पूर्ण आहां
गर्क होइल तो, देह पाहतां हा!

जरी ऐके आपुल्या मानसाला,
अंत आणी तरि स्वयें तो जिवाला." ८२.

श्लोक.

"गरिब बापडा!" वदत इंदिरा
"म्हणति गे खुळा असलिया नरा;
फुकट नाद तो धरुनियां मनीं
करुनि घेतसे हंसवणें जनीं. ८३.

नसे काय विद्या कलाज्ञान त्यातें ?
कशा गांजवी आपुल्या तो जिवातें?
न कां ज्ञानसंपादनीं काळ घाली?
अगे ज्ञान ये कामिं तें सर्व काळीं. ८४.

न कां शूरवीरांपरी आयु लावी?
असे अंगि जें तें जना शौर्य दावी?
जरी बाइलेच्या पडे नित्य घोरीं
गमे बाइला तो असे निर्विचारी." ८५.

धिक्कारयुक्त वदली:—"तुमजें विवाहा,
ना अर्पिणार कवणा कधिं यास्वि देहा;
कां स्त्रीजनें चुकुनियां निजजीवनातें
द्यावें नरा सकलही भुकुनी सुखातें?" ८६.

तदा वदे तो तिज राजपुत्रः—
"स्त्रिया कधीं होतिल का स्वतंत्र?
प्रचंड हें काम करीं धरीतां
शिरीं असा भार कशास घेतां ? ८७.

अखंड जो मार्ग असे प्रचारीं,
तया तुह्मी पाडितसांचि हारीं ;
जरी असे योग्य विचार सारा ,
कसा तडी जाइल हो पसारा ? ८८.

जरी हें तुह्मांहातुनी होय सारें
बहू युक्तिनें, योग्य बुद्धिप्रकारें,
न जाणों तुम्हांमागुनी ज्या सुनारी
कृती चालवायास येती नरारी, ८९

कसे रीति त्या, कोणच्या बुद्धिमानें
कृती चालवीतील कोण्या मनानें
अजी सांगतां तें न ये हो कुणाला
असो ही तरी काळजी आपणाला. ९०.

जगीं जें बरें सर्व वेंचून घ्यावें,
ह्मणोनी अलभ्याप्रती कां झिजावें ?
महत्कार्य तें कां जरी स्वीकरावें
तरी पूर्ण तें हो स्वयेंची करावें. ९१.

जरी आयु होई पुरें ना तयाला,
तरी योग्य द्यावें करीं तें दुज्याला.
दिसे ना कुणी येथ दूजी अशी कीं
करी आपुल्यापाठिं हें कृत्य लोकीं. ९२.

जसें पाउला वाळुमाजी बघावें,
जसें सागरापृष्ठिं लेखा लिहावें,
ढगावारिया हातिं घेण्या पहावें,
जसें अग्निमाजी तृणा नीवडावें, ९३.

तशि कृती इथ मांडियली असे;
उघड आचरणें इथच्या दिसे;
बघुं पुढें किति हो दिन चालतें
नरसुखावरि जें धरुं खड्ग तें. ९४.

नजाणों हो काळेंकरुन तुमची नूतन कृती
तुह्मांपाठीमागें ह्मणि सकल पावेल लय ती;
अशा कृत्यें वाढे जरिहि तुमची कीर्ति जगतीं
तरी सौख्या देखा कितिक युवती येथ मुकती.९५.

स्त्रियां बहुत जें असे प्रिय, मुकाल सार्‍या तशा—
मुलें, सुखद संपदा, बहुत गोड जीं सारियां
इथें कुठुन वाढती ? पृथिवि काय ती देइल ?
लतातरुवरी फुलें फुलति तीं का येतिल ? ९६.

नहोती लग्नें जें, तिथ उगम बालांस कुठला ?
गृहाच्या सौख्याचा प्रमुखचि झरा एक सुकला.
अहो आयुष्यीं का प्रियतर असे बालकसम—?
हंसावें, खेळावें, इतर वळखी, तें न नियम.९७.

सदा आनंदानें पहुडत असे पाळणीं सुखी;
जसें वाढे तैसें मधुवचन बोले मधुमुखीं;
पडे, रांगे, लोळे, दुडदुड कसें धांवत असे !
कसें हाका मारी जनकजननीतें मधुरसें !!"९८.

ह्मणे राजबाळाः—"पुरे वल्गना या ;
न का लाज वाटे इथें हें वदाया ?
मतीहीन तूं शुद्ध आहेस भासे.
भले मोतिदाणे मुखें येति खासे ! ९९.

भली भीट तूं गे; न कोणीहि दुजी
कदा बोलली गोट, बोलेस तूं जी;
परी सत्य आहे अगे लेंकुरांची
असे आवडी पूर्ण आम्हांस साची. १००

पद जिल्हा झिंजोटी — ताल त्रिवट

(वस्त्रानें देह सारा या चालीवर—)

गोड हीं भारी आम्हां आवडताती बालकें;
निर्मियलीं सौख्यालागीं सुखकर जगत्पालकें
मधुरवचनें ऐकुनि त्यांचीं पितरें अंतरिं तोषिती;
लडिवाळपणा अंत नाहीं, गृहसुख सदा पोषिती. १०१

श्लोक.

करावें तया आवडीलागिं काय ?
नसे आमुचेहातिं कांहीं उपाय.
न कां बालकें हीं स्वयें सिद्ध होती ?—
वनींच्या तृणासारखीं जन्मि येती? १०२.

जरामरण त्यांप्रती भवनदींत बाधा करी;
क्षणांत सुख जातसे जरि तयांस मृत्यू हरी.
अगे सुखद पूर्ण तीं जरिच वांचती लेंकुरें;
अकालिं गत जाहल्या जननिसौख्य कैंचें उरे? १०३

अगे हे विधाते बहू गोड गोळे—
मुलें पाहतां धन्य होतात डोळे—
परी जीरती हे कितीकांस सांग;
किती पुत्रशोकें हदीं होइ आग! १०४.

किती बालकें होति हीं दुःखकारी,
दुराचार त्यां लागतां दुर्विकारी!
कसा आइचा होइ तैं आसभंग!
कसें विंधतें तें तिचें अंतरंग! १०५.

मुलांपायिं लागे किती काळजी ती!
मुलांची असे केवढी घोर भीती!
मुलांपायिं कैसा पतीपत्निमाजी
बखेडा पडे, येइ दोघांस लाजी! १०६.

नको बालकें तीं; नको घोर त्यांचा;
नको दुःखजंजाळ त्या गे नरांचा;
क्रिया आमुची ही असे सौख्यदायी;
जगीं मुक्त होऊं अशा गे उपायीं. १०७.

न गे लौकिकासाठिं हें काम हातीं
धरीलें; नसे आस आह्मांप्रती ती;
असे पेरिलें बीज तें योग्य जागीं;
निघे वृक्ष जो वाढवूं त्याजलागीं. १०८.

कधीं ती फलप्राप्ति होईल होवो;
उभारीयलें कृत्य त्या श्रेय येवो.
मुळारंभिं कोणी तरी पाहिजे तें
श्रमाया, तरी श्रेय यत्नेंहि येतें. १०९.

सहस्र वर्षें जरि वांचलें मी,
चिंता असे काय अशा सुकामीं
माझेंच ना मीं फल पाहियेलें?
आरंभिलें कृत्य, कृतार्थ झालें. ११०.

आयुष्य मी वेंचिन या सुकृत्या;
स्त्रैणांतल्या काढिन मी असत्या;
ज्या आमुच्यामागुन येथ येती,
हें चालवीतील सुयोग्य रीती. १११.

स्त्रियांअंगीं आहे कमतरपणा काय इतुका!
स्वसत्कार्यी आह्मां अणु तरि न येई श्रमत का?
जरी दैवें शक्ती असति दिलि आह्मांस इतुकी,
स्त्रियांच्यास्वातंत्र्याप्रति उलथेतों पृथ्वि अजिकीं." ११२.

ऐकोनि ऐसे रिति भाषणाला,
केलें न तेणें तिज उत्तराला;
संदेह दाटे मनिं राजपुत्रा
कीं कोण जिंकी अशि ही विपात्रा. ११३.

मनोवृत्ती त्याची घडित तिजला सर्व कळली;
तया न्याहाळोनी, सति निजमुखें काय वदली;
अहो ऐका आतां, कशि समयिं त्या योग्य वचना
महा युक्ति लावी निजजनित सत्कार्यअवना:—११४

## दिंडी.

" तुला वाटेल किं काय आह्मि दुष्ट
व्यर्थ झालों त्या नरांवरी रुष्ट;
परी जाणाशि तूं किती भोगुं कष्ट!
असे झालें स्वातंत्र्य सर्व नष्ट! ११५.

देह अर्पूं हा कार्यसिद्धिलागीं;
मारुं डोहाच्या बुडीं अधोभागीं;

नग्न पाषाणावरी चालुं वाट
जरी कार्यांचा सिद्धि जाय थाट. ११६.

श्लोक.

परी कठिण फार हें दिसत कृत्य सारें असे;
क्षणांत परिपूर्ण तें घडुन सर्व येई कसें?
झिजेल जरि जाति गे, सकळ नित्य या नारिंची
स्वतंत्र जगिं होणिया तरि तयांस लागे रुची." ११७.

असें बोलतां कंठ दाटे तियेचा
मुखां दावि हेतू असे जो मनींचा;
गळे नेत्रपातींहुनी अस्रबिंदु,
मुखा शोभवी मेघ तो जेंवि इंदु. ११८.

जातां जातां गोष्टि ऐशा करोनी
आलीं जेथें पर्वताच्या वरोनी
पाषाणाच्या पृष्ठभागीं प्रचंड
नादें मोठ्या कोसळे नीर थंड. ११९.

गड गड गड शब्दें नीर वाहे निरोगी;
थर थर थर कंपे अद्रि तो जागजागीं;
घव घव घव नादें पल्लवीं वायु खेळे;
पट पट पट वारू पातले तेंचि वेळे. १२०.

नाना सुरंगी तट पाणियाचे
देती सुशोभा जिथ नीर नाचे;
अस्थी तिथें पाहुनियां गजाचे
बोले पुनः ती सति शब्द साचेः—१२१.

"जसे शुभ्रास्थी हे दिसत इथ आजी स्वनयनां
तसे या देहाचे दिसतिल पुढें भाग्नि सुजनां,
सदा मृत्यू आणी सकल तनुंनां हीच सुगती,
चुके आह्मां कैशी मरणिं पडतां देह मगती?" १२२.

साकी.

ऐकुन ऐसें राजबाळिचें भाषण नृपतनयानें
उत्तर केलें समयोचितसें, नमोन बहु विनयानें;
चंचळबुद्धी तो। आपुल्या ज्ञाना दाखवितोः— १२३.

श्लोक.

"विधात्यानें केलें अवतुन जसें तेविंच घडे;
जिथें जें योजीलें तिथ तनु तदा ती मृत पडे;
उनापाण्यामाजी पवनसरिं ती जाय गळुनी;
जुनी होई सृष्टी, तनमन तशीं जात बळुनी." १२४.

वदे इंदिरा तैंः—"बहू तूं हुशार!
न ठावा शरीरोन्नतीचा प्रकार;
पुरी तत्वशास्त्रज्ञ तूं भासशी गे!
कुठें जाहलें प्राप्त हें ज्ञान सांगें! १२५.

अगे शीकवीं शास्त्र हें येथ सारें.
इथें सर्व शास्त्रांस नानाप्रकारें
असों देत उत्तेजन प्रेमभावें;
गमे शास्त्र तें येथ तुह्मी पढावें." १२६.

तदा बोलला चंद्रकेतू तियेलाः—
"नसे शारिराचा गुरू पाहियेला".

वेदे इंदिरा तैं:—नको शारिराचा
गुरू येथ आम्हां—प्रयोगी अघाचा! १२७

सजे तो प्रकार प्रतापी नरांतें;
न शोभे कदाही मवाळू स्त्रियांतें;
नरांनींच त्या पातकी शस्त्रघातें
ससे, श्वान, यांतें चिरावें स्वहातें. १२८.

शिरा वाहिन्या स्नायु संधि त्वचेला,
हृदा काळजा रक्तपिंडादिकांला,
चिरावें स्फुरावें, भरावें द्रवांनीं,
पहावे कसे होति व्यापार त्यांनीं. १२९.

अशा धीट नाहीं स्त्रिया आजि झालों;
पदा नीच ऐशा न अद्यापि आलों.
मना वीट येतो अशीं क्रूर कर्मे
बघोनी, घडों येती जीं गे अधर्मे. १३०.

परि इथ जरि कोणा विकृति प्राप्त झाली,
निजकरिं करुं सेवा, औषधी पाजुं वेली;
हरगुणि उपचारां योजुं आम्ही विचारें;
प्रकृति निजजनांची रक्षुं साऱ्याप्रकारें. १३१.

त्वां सृष्टि विश्वंभर विश्वकर्त्ता,
यांची अतां केलि असेचि वार्त्ताः
माझ्याप्रमाणें कृति विश्वि कोणी
केली नसे होउं तरी शिराणी.१३२.

स्त्रीउन्नतीचा बसवोन पाया,
आरंभिलें मुक्त तिला कराया;
आतां उरे स्त्रीकरिं शेषकार्य,
येवोन साह्यप्रति सर्व आर्य १३३.

विश्वंभरें दैववशें सुबुद्धि
देवोन शक्ती, करी कार्यसिद्धि;
प्रवृत्त केलें कृतिलागिं मातें,
पावो यशाला अनि उत्तमा तें! १३४.

व्हालोनि जावो, जशि इच्छितें मी,
स्त्रीजातिची सांप्रतची गुलामी;
अंतास जो सत्कृति पूर्ण नेतो
साफल्य देवो अमियां धनी तो!"१३५.

असें बोलली जें मनीं नित्य इष्ट;
स्त्रियांचें सदा इच्छिते जी अभिष्ट;
पुढें चालले बोलतां ह्याचि गोष्टी,
ह्मणे विश्व तो पाहुनी तेथ दृष्टीं:-१३६.

"अशा सुप्रसंगीं, अशा सुस्थळीं या,
किती मौज मैत्रीणिसंगें रमाया!
किती स्वप्रियासंगतीनें मनाला
महानंद होईल कामीजनांला!" १३७

"इंद्राचे भुवनापरी दिसतसे शोभा इथें सुंदरा,
तत्वज्ञानि इथें रमोन अवघे जाती," वदे इंदिरा;
'वार्त्ता कामिजनांचि येथ करिशी तूं व्यर्थ गे कासया?
कामाचा अमुच्या नसेचि नगरीमाजी मुळीं वास या".१३८

## दिंडी.

तिणें आज्ञा मग केलि दासिंलागीं;
तंबु मोठा ठोकला रम्य जागीं;
गार चारीवर मधुर फलाहार,
करिति दासी तिथ सर्व तो तयार. १३९.

नारि इतुक्यामाधिं ठाइं ठाइं गेल्या;
अद्रिशिखरावरि कोणि उभ्या ठेल्या;
कमलजेच्या शशिवदन संगिं आला;
करीं कमलाक्षें धरिलि मधुकरीला. १४०.

## श्लोक.

महिंद्रमार्थीं महिला समस्त,
त्या पातल्या सर्वहि अस्तव्यस्त;
जैसे जडावें नग शोभताती
तैशा नगा कामिनि शोभवीती. १४१.

## पद.

(वैशाखमासिं वासंतिक—या चालिवर)

या शैलशिखरिं रमत फिरति सकळ कामिनी,
ठायिं ठायिं जमुनि नारि, हर्षती मनीं ॥ ध्रु० ॥

पाषाण गारि धातुमिश्र क्षार मृत्तिका ।
सुवर्ण रौप्य ताम्र रंग श्वेत वा फिका ।
दगड बघुनि हाणिती तयांस नायिका ।
चालतां प्रकार असा, येइ यामिनी ॥ १ ॥
या शैलशिखरीं १४२.

**संवाद नामक तिसरा सर्ग समाप्त.**

# स्त्रीवेषोपहास नामक सर्ग चवथा.

श्लोक.

सूर्यें जयीं पश्चिम वाट घेली;
नक्षत्र बिंबें गगनीं उदेलीं
छाया पडोनी रजनीकराची
पूर्णेंदु-रश्मी दिपवी प्रतीची .१

ह्मणे इंदिराः-"हो चला जाउं आतां
बहु श्रांत झालों नगामाथिं येतां;
करूंया फलाहार; डेऱ्यांत जावुं;
सुखाची घडी घालवूं भक्ष्य सेवूं".२.

नगापायथ्याशीं उभा तंबु होता;
दिसे लागले तैं रवी अस्त जातां;
तयांचेवरी दृष्टि ठेवोन नारी
कडयाखालिं येती. श्रमे जीव भारी.

उतरति करिं कोणी मैत्रिणीला धरोनी;
निजअनुचरिलागीं कोणि घे सांवरोनी;
पकडुन तरु वल्ली पाउलें कोणि टाकी,
सरसर कुणि धांवे पायिं विद्युल्लता कीं. ४.

अशा सर्व येवोन डेऱ्यांत नारी
तिथें बैसल्या मांडुनी चार हारी
पुढें शोभतें अन्न नानाप्रकारीं
बहु थाट शोभे, श्रमा सर्व हारी. ५.

म्हणे इंदिरा तैं:—"कुणी गीत गा हो?
मृदुगान-आनंद कर्णास लाहो!"
तदा एक घेवोन सारंगि पाणीं
करी गायनारंभ मंजूळ वाणी:—६.

पद. राग कल्याणी. ताल त्रिवट.

( रामजोशाच्या लावणीच्या चालीवर. )

"कां अश्रु हे नयनीं येती ! कांहिंच समजेना.
ईश्वरें अशि स्फूर्ति दिधली कां तरि ही त्यांनां!॥धु.॥
हृदयिं निराशा जागृत कां ही, नुरवी देहभाना!
कां मन्मन हें चंचळ झालें, नभुलें धनगाना !
कां वैराग्य-कंटक नाशी या शरिरोद्याना !
काय जुने दिन गेले हाणुनी चळविती नयनांनां ॥१॥
कां अश्रू. ७.

पद. जिल्हा झिंजोटी. ताल त्रिवट

( सुर्यवंशीं चंद्रकेतू—या चालीवर. )

परदेशा मित्र जाई जसा तो प्रेमळ
जिवलगांस लावी सान्या, अंतरिं तैं हळहळ;
तसा तो पूर्वकाळ, अंत अजी पावला;
उदयातें नूतन आला, शोक तें जगिं जाहला. ८

अंत्यगीत.

मानव मरणोन्मुख तो होतां,
कर्णी ये ना ध्वनि आयकितां,
हालतां ये ना नेत्रपातां,
गात्रें गळताती; ९.

तैसा झाला हा गतकाळ,
म्हणुनी जग हें झालें विव्हळ;
पुनर्जीवनीं श्रम निष्फळ
जातिल ते सारे. १०

पद (पंजाबी ठुंबरी) जिल्हा झिंजोटी ताल त्रिवट.

( गाहा जगपति—या चालीवर. )

मृतसमयींचें स्पष्ट जसें तें,
चुंबन स्मरणीं अक्षय राहतें;
अथवा प्रेमळ निजपत्नीचा,
प्रेमा हृदयीं जागत साचा;
तैसा हा गतकाल हृदांतरीं
जागत राही पडतां हारीं ". ११.

## दिंडी.

गीत गातां सतिनयनिं अश्रु आले,
लाल गालांवरि तत्प्रवाह चाले;
वाणि प्रेमळ मंजुळ तिनें ऐशी,
काढली कीं ती गेलि हृत्तळाशीं. १२.

## श्लोक.

गीतें ना रुचलीं विरोध भरलीं ऐशीं परी इंदिरे;
ऐकोनी निजकर्मवर्म कथिलें, क्रोधें मनीं ती स्फुरे;
धिक्कारोन वदे:—" जरी गतदिसां गावोनियां गे अशा
वाणीनें इथ काढिशी सुसमयीं, का त्वन्मनाची दशा!१३

गेले जे दिन जाउं दे मनन तें त्यांचें कशा पाहिजे ?
येणारे दिन ते कसे उजडती चिंता अजी वाहिजे.
गेला काळ नरांचिया धमकिचा आतां करूं राज्य या;
त्यांशीं तुंबळ योजिला समर हा पावूं सुकाळीं जया.१४

पद राग देस. ताल त्रिवट.

कलिया भीनन जाय—या चालीवर.

पुरुषांला विषप्राय झालें मी | आयका स्त्रियांनों.॥ध्रु.॥
उपाय योजा जेणें अपुला | मानस सिद्धिस पूर्ण जाय,
ध्यास लागला स्त्रीउन्नतिचा | लढुं या बघतां काय? ॥१॥
पुरुषांला॥
हा महिलांचा समाज पहिला|सकल महीला सौख्याधार
होऊं या;ही नरबळजोरी | स्त्री-मुखिं वदवी हाय."॥२॥
॥ २ ॥ पुरुषांला ० १५.

श्लोक.

वदे इंदिरा राजपुत्रा तदा तीः—
" ह्मणा गीत कांहीं तुम्हां गांविं गातीं;
प्रशंसा नको हो भल्या ती नरांची
नको त्यांत गाऱ्हाणिं गेल्यां दिसांचीं.१६.

परी गा कसे दीस येती स्त्रियांनां;
स्थिती योग्य होई कशी प्राप्त त्यांनां."
तदा गीत तेणें स्वयें कल्पिलेलें,
मुखें मंजुघोषें तिथें गाइयेलें:-१७.

पद. जिल्हा झिंजोटी--ताळ त्रिवट.

सूर्यवंशीं चंद्रकेतू—या चालीवर.

"झडकरि अगे उडुनि जाईं, दक्षिणेप्रति कोकिले!
प्रियेद्वारीं बसुन तीतें, वद तुजला जें कथियलें.
सांग तिजला दक्षिणेचे जन कठोर ते चंचळ;
तद्विपरीत उत्तरेचे, मन अचल त्यांचें, कोमळ. १८.

पद. (त्याच चालीवर.)

तुजसंगें मी उडुन जातों, मज असते जरि पंख तें;
बैसुनियां द्वारिं तीच्या दाखवितों निजप्रेम तें.
करुन तिजशीं गोड गोष्टी प्रेमानें तिज जिंकितों
घालुनियां मोह तीतें, करुणा तिची मी भाकितों. १९.

पद, (त्याच चालीवर.)

कोकिले! तुजसम नाहीं पक्षी कां मी जाहलों!
तुजपरि असतों कोणे काळीं, तिच्या खांदे बैसलों
एकदां तिथ मिळतां जागा तें स्थळ न कधीं सोडितों
मरणकाळ पावेतों मी आनंदें तिथ पहुडतों! २०.

पद. रागिणी भैरवी—ताल त्रिवट.

कां प्रेम तिचिया हृदयीं न जागे?
तरुणी अशी कां निष्ठुर वागे?॥ध्रु०॥
कोकिले! तिजला सांग फिरें मी
शुभ्यर्थ तिचिया दक्षिणग्रामीं; ॥१॥
उत्तरग्रामा सोडून आलों
कीर्तीस तिचिया लुब्ध मी झालों ॥२॥ २१.

पद. ( याच चालीवर.)

क्षणिक असे हें मानवआयु
परि प्रेमभाव राहे चिरायु॥ ध्रु० ॥
उत्तरदेशीं कामिनी-यौवन
बहुकाल राहून हर्षवी स्त्रीजन॥ १ ॥
दक्षिणदेशीं अल्पवयीं तें
सौंदर्य यौवना सोडून जातें ॥ २ ॥ २२.

श्लोक.

त्यजुन कोकिले ! रम्य या वना
गमन गे करीं दक्षिणीजना
उठवि तूं तिच्या प्रेम मानसीं;
कद तिच्याच मी जाइं भेटिसीं. "२३.

परिसुनि अशिया त्या राजपुत्रा मुखींचें
नरख भरलेलें गायन, प्रेम साचें,
सकल युवति पाहों लागती एकमेकां
गद गद गदनादें हांसती सर्व त्या कां. २४.

जरी गायनाचें कळेनाचि मर्म,
तरी हांसतां एक, दूजी स्वधर्म
असे हांसण्याचा असें मानुनीयां
हंसें येइना तोंहि लागे हंसाया! २५.

वदे इंदिराः—" मंडुकाचेपरीं हा
ध्वनी ऐकुनीयां सुटे कंप देहा;

असे काय हा कंठ, ऐसा स्त्रियांचा !
नसे शब्दिं माधुर्य; ना गोड वाचा. २६.

असे गाइला सर्व शृंगार बाई,
नसे अर्थ, वा त्यांत कांहीं नवाई;
जुनी गोष्ट सारी, स्त्रियांनां वरावें—
रुचे तोंवरी त्यांप्रती लुब्ध व्हावें ! २७.

पुढें एक सोडोन दुजी धरावी
कृती निंद्य ऐशी किती ही करावी;
नसे कांहिं लज्जा न कांहींच भीती
न मानीति शास्ता; अशा घोर रीती. २८.

वर्चस्वा मिळवावया पुरुष हे दासत्वही भोगिती !
आली हातिं तयां लगाम मग ते कांहिंच ना मानिती
स्त्री आहे अति नीच, आपण धणी, भावें तसें वागती.
ऐशी दुःखद सत्य ही जगिं सदा आहे स्त्रियांची गती.२९

करीं खाटिकाच्या पडोनी मरावें;
परी या नरांच्या न हातींच यावें.
विधीनें असा काय संकेत केला,
नरांच्या करीं सर्व व्यापार गेला.! ३०

असे गाइला व्यर्थ शृंगार सारा;
न ये या स्थळीं आमुच्या तो विचारा.
वृथा मानुं तो सर्व प्रेमा नरांचा
प्रसंगानुसारी वृथा त्यांचि वाचा. ३१.

तुझां गांवच्या नारिंची रीतभात
अहो, वर्णिलेली असे पूर्ण ज्यांत
असें कांहिं आह्मांस गावोन दावा
बहू इच्छितों काळ मौजेंत जावा. " ३२.

अशा वाणिनें इंदिरा ती सुनेत्रा,
तदा प्रेक्षुनी बोलली राजपुत्रा.
तसें गीत गावें तदा, मानसाचा
असे हेतु त्याचा; स्फुरे तेवि वाचा. ३३.

साकया.

इतुक्यामाजी शशिवदनाच्या नाद शिरीं मद्याचा.
शिरला, नुरलें देहभान त्या, तान सुटे गाण्याचा.
गाण्या लागे तो । तेणें आगी पेटवितो; ३४.

स्त्रीकर्णाला निशिद्ध ऐशी ठुंबरी मुखिं त्या येतां
चाकित जाहल्या सर्व कामिनी, उपजे मनिं त्यां चिंता
ऐसा घोर पडे । क्षणिं त्या गर्दी एकं उडे. ३५.

दिंडी.

दटावी तें कमलाक्ष त्या खुळ्याला;
मुखीं येई म्लानत्व कमलजेला;
मधुकरीनें ही अधोवदन केलें
ह्मणे "झांकीलें तेंचि उदयिं आलें!" ३६.

" खबर्दार ! " ह्मणे इंदिरा सकोप.
चंद्रकेतूच्या हृदयिं होइ लोप

मित्रभावाचा, तदनु तैं शशीतें
उरीं हाणियली मुष्टि रुष्ट घातें. ३७.

श्लोक.

" खबर्दार मुर्खा ! " ह्मणे राजपुत्र;
उरीं लागतां मुष्टि तत्प्राणमित्र
भयाभीत होऊन राहे उभा तो;
पडे हाक मोठी नभीं नाद जातो. ३८.

मधुकरि तयिं कंपें दीर्घ आरोळि फोडी;
दचकुनि उठली ती इंदिरा तैं तडाडी;
"त्वरित, " वदलि " आणा वाहु ! जाऊं घराला !
कहर हर ! इथें हा घोर कां आजि आला ! " ३९.

सकल युवतिमाजी एक कल्लोळ झाला;
पळत सुटति साऱ्या; कोणि नाहीं कुणाला
पुसताचि, परि धांवे, सांपडे जेथ वाट;
विरस परम झाला; मोडला सर्व थाट ! ४०.

ऐशी ही मदिरा सुरासुरनरां जी मानली ना कदा,
झाली त्या अवलाकलापि दमल्या, अत्यंत दुःखास्पदा
यासाठीं विषतुल्य हो, जन कदा ही प्राणहर्त्री सुरा
सर्वांशीं कुलनाशनी भयकरी सेवूं नका दुर्धरा. ४१.

आहे औषधि दिव्य सत्य जरि ही वैद्यांचिया हस्त कीं
त्यालागीं सुखदा, नितांत गुणि, जो लोळे जराग्रस्त कीं;
ऐयारामें तरी अवश्य नसतां केल्या हिचें सेवनं.
मागावी बुडि जाणुनी जळतळीं तैसें करी जीवन. ४२.

शोका तें हृदयांतरीं वसतसे, वैद्यां नये काढतां;
गात्रें होति हळूहळू शिथिल तीं, उन्माद तो वाढतां;
लागोनी थरकांप हस्तपदिं, ते होवोनि जाती कृश
संभारा तनुच्या न साहुं शकती, वैरी असें हें विष.४३

दिंडी.

राजपुत्राची ऐशी तें निराशा
झालि; गेले श्रम व्यर्थ सर्व नाशा!
उभा राहे कमलाक्ष तयासंगीं
दुजें नुरलें कुणि तेथ त्याप्रसंगीं. ४४.

पळे युवती एकेक कंपितांगी,
तसा तिळतिळ तो तुटे अंतरंगीं;
पळत अश्वांच्या पाउलांस ऐके,
तया प्रत्येकीं वसति हृदीं ठोके. ४५.

श्लोक.

लेखें हातवळा, मळा शिंपाडितां, गातां जसा तो गळा,
तैशीं दोन हृदें समीप असतां काळेंहि लागे लळा.
ऐशी आस धरोन राहत सदा जो इंदिरेच्या सवें,
त्यालागीं अजि अंत हा विपद् ना कल्पांतिं ही सोसवे.४६

दिंडी.

कशी आतां भेटेल इंदिरा ती,
दिसे पुनरपि कीं नाहिं ऐशि भ्रांती,
पडलि त्यातें; न कळेंचि कुठें जावें,
काय तीच्या प्राप्त्यर्थ तें करावें. ४७.

क्रुद्ध झाला मनिं; ह्मणे आपणाशीं
'थोर शशिवदना, अससि मूर्खराशी.
कशा जाळाया पिउन मद्य रे तें,
असें नाशावें अजी स्वकार्यातें ? ४८.

अरे ऐसा का अंत आजि व्हावा ?
घडा गुह्याचा असा का फुटावा ?
होउ भेटी पुनरपी होइ जव्हां,
इंदिरेची; ती हरलि असे येव्हां!' ४९.

श्लोक.

मनीं आपणाशीं करी जें विचार
तया कर्णिं येती तदा शब्द घोर
"धरा हो धरा स्वामिनी ही बुडाली
प्रिया माउली नीरडोहांत गेली" ! ५०.

साकी.

धांवत असतां वारु तियेचा नदिधरणा उतरोनी,
निसटुन पडला तिच्यासकट तो जाती दोन्ही तरोनी
पडली हाकाटी | झाली तीरीं बहु दाटी. ५१.

श्लोक.

परिसुनि ध्वनि ऐसा धांवला राजपुत्र
पसरट जिथ होतें थंड तें नीरपात्र;
शिरुन युवति-मेळीं शीघ्र तो तीरिं ठेला;
बघितलि पडलेली नीरिं त्या इंदिरेला. ५२.

पाहोनी पडल्या अशीं तरतशा त्या इंदिरेला, सत्त्व
मारीली उदकीं उडी नृपसुतें, काढावया गौरत्वें
जी अर्ध्या जगतास रक्षक असे. स्त्रीजातिची स्वामिनी
डोहाच्याविकशी करोन उघडच्या त्या सारिया कामिनी? ५३.

नदीमध्यभागीं प्रयत्नें तरोनी,
तिचा हात युक्तीबलानें धरोनी
तिला वामहस्तें जळाच्या तरंगीं
झणी पोंहवी, भ्यालि जी अंतरंगीं. ५४.

जळाचे तरंगामधीं झाड होतें;
धरोनी तयालागिं तो सव्य हातें,
नदीच्या तिरा पावला शूर वीर,
अशा या झणात्वें नरा धन्य धीर ! ५५.

गतप्राण झाली महा सुंदरी ती,
म्हणे आपणा चंद्रकेतू, " न भीती
हृदा बाळगीं; रे महत्कार्य झालें;
करें या, तडी इंदिरेलागिं नेलें. ५६.

दिंडी.

कधीं न कधीं येईल उदयकाल,
तदा कामीं मम कृत्य हें पडेल;
हृदा होऊं रे नको उतावीळ
अंतिं भेटे ती, थांब कांहिं वेळ. ५७.

श्लोक.

खांदे सोवरिली भमोन बहु तें त्या राजकन्येप्रती;
घेवोनी चढला तटावरहनियां, तों एक तेथें सती

दे त्यातें निजहस्तका, गलितशा देहा धराया करीं;
तंबूची धरि वाट, दिव्य सतिला वाहोन खांद्यावरी. ५८.

म्हणाल्या रवें एक त्या सर्व नारी,
"अहो जीव आहे सतीच्या शरीरीं!"
तदा राजपुत्रें पहा काय केलें,
पुनः तोंड ना त्या स्थळीं दावियेलें. ५९.

म्हणे, "कीर्ति दावूं अजी तोंड काळें
न जाणें किती कोप ये राजबाळे;
असे काळिमा या त्रिवर्गास आली;
प्रिया-प्राप्तिची वाट ती बंद झाली!" ६०.

न देखीयले मित्र त्यानें कुठेंही;
निघे शोधण्या त्यां बहु भ्रांत देहीं;
अरण्यांतुनी एकटा त्या अवेळे
पदीं वाट चालोन ये पाठशाळे. ६१.

चंद्राचा पडला प्रकाश गगनीं तैं पौर्णिमेचा पुरा,
वाटे रात्र नव्हे, परी उगवला कीं दीस तो साजरा;
कीं आला उदयाप्रती रवि जणूं त्यागोन उष्णप्रभा;
ऐसा त्या रजनीस रंग भरला आली सुशोभा नभा. ६२

मार्गी जातां थोर आले विचार;
ग्लानी आली अंतरंगास फार;
जावोनीयां पाठशाळेसमोर,
ठाकेची तो राज-उद्यान-द्वार. ६३.

साकी.

निमग्न असतां विचारिं अपुल्या फिरतां तो उद्यानीं,
तेथ देखिलें कमलाक्षाला; धरिलें त्या बाहूनीं.
बोले-"कमलाक्षा! झाली आशेची रक्षा!", ६४.

दिंडी.

तदा "मित्रा!" कमलाक्ष तो ह्मणाला
"हळू बोल किं ना ऐकुंये कुणाला;
शोधितातो ह्या नारि आपणाला;
धरूं, दंडूं या बोलती तिघांला. ६५.

मंदिरांतरिं इथ शोध चाललाहे,
इंदिरा ती एकेक नार पाहे,
पुसे प्रत्येकिस आपणा कि जाणे.
ह्मणे जी ती कीं त्रिवर्गास नेणे. ६६.

श्लोक.

मधुकरि परि येतां राजबाळीपुढें ती,
उडविंत करणें मानसीं पूर्णरीती;
अभिमुख उभि राहे मान घालोन खालीं;
प्रथम मुळिं न तेथें शब्दही ती ह्मणाली. ६७.

पुसे इंदिरा ती जयीं आग्रहानें
ह्मणाली, असे जाणिलें सर्व तीनें;
ह्मणे स्पष्ट ना, माय कीं वृत्त जाणे;
असो कोण कां येथ केलेंचि येणें; ६८.

मराठी ग्रंथ संग्रहालय
नं. ८९
ठाणे सन १९०४



कमलजेविशीं जावें इंदिरा
पुसत वालिला, तें न उत्तरा
मधुकरी करी; ना वदे असे
सकळ डावकें वृत्त वा नसे. ६९.

मौन पाहुनी बाळिचें असें,
लाजल्यामुळें म्लान जी दिसे,
योग्यसा तदा अर्थ काढिला
वृत्ति बाळिची डावकी तिला. ७०

धाडी दासिस शीघ्र तैं कमलजे पाचारण्या इंदिरा;
येती त्या परतोन; दासि ह्मणती धुंडियलें मंदिरा,
कोठें ना परि ती मिळे कमलजा; सोडून गेली असे;
जागा शोधियल्या, न थांग परि तो लागे, न कोठें दिसे. ७१.

ह्मणे इंदिरा ऐकुनी ह्याचि वाचे
'धरा पोर बाहेर टाका स्त्रियेचें.
'नको जाहली द्रोहिणी माय जीची;
नको खूण येथें मुळीं त्या स्त्रियेची.' ७२.

शशिकलेसि बलाविलें असे
सकल हें पुसण्या घडलें कसें,
असुन ठाउक जें इथ जाहलें
न कथिलें परि गुप्तचि ठेविलें. ७३.

साकी.

अशी चौकशी दर्बारीं ती मोठी आता चाले
निसटुन तेथुन तुला भेटलों योग्यचि मित्रा झालें;
सांगें जाशि कुठें । पडले विचार अजि मोठे! ७४.

## दिंडी.

कुठें आहे शशिवदन कमलजा ती
काय गेलें ह्रय पळोन सांगातीं ?
ह्रीच त्याची रे भीति मला होती;
उगा धरिलें हें महत्कार्य हातीं." ७५.

## श्लोक.

म्हणे चंद्रकेतू उगा दोष देशी;
नसे मित्र तो एवढा दुष्टराशी;
अरे प्राशुनी मद्य तो मस्त झाला
तरी तद्गुणा काय त्या अंत आला? ७६.

न का ऐषआरामिं कोणी कदाही
सुखानंद घेवोन्न मौजेंत राही?
पडे भूल त्यालागिं या स्त्रीजनांची
सुरेनें स्थिती पालटोनी मनाची; ७७.

असें गाइलें पूर्ण शृंगार ज्याला
तरी पापि केलें तयें का स्वजीवा?
म्हणावें न जें स्त्रीपुढें तें म्हणाला
म्हणोनी सदा काय तो निंद्य झाला? ७८.

बीभत्स याहूनहि का नसे तें,
अश्लाघ्य वाटे बहु जें मनातें?
गौणत्व ऐसें वचनीं असे गा,
रोमांच आणी क्षणिं सर्व अंगा. ७९.

स्वयें हाडिंरे मूळचा चांगला तो
पळोनी कसा एकटा आजि जातो?

स्वभावें खुला तो, न कापट्यरूपी
कसा आपणा त्यागितो या कलापीं ? ८०

जसा गोड अंगीं सदा इक्षुदंड
जरी कारल्या आळें वाढे उदंड,
तसा रे शशी तो जरी मद्य प्याला
तरी हाडिंचा नाहिं तद्वर्ण गेला." ८१.

### साकी.

ऐसें मित्रा बोलत आहे, आल्या इतुक्यामाजी,
दोन बायका, ह्मणति त्यांजला, " नांवें हो सांगा जी."
धरिती कमलाक्षा, । वाटे कीं द्याया शिक्षा. ८२

धांव घेतली राजकुमारें, वाटे निसटुन गेला
पळतां पायीं कंटक रुतला; काढाया तो ठेला;
जर्जर तें झाला । बायां हातीं सांपडला. ८३.

### श्लोक.

नेलें राजकुमारि सन्मुख तयां दोघां क्षणाभीतरीं,
जेथें बैसलि होति राजतनया विस्तीर्णशा मंदिरीं.
भाळीं एक हिरा विशाळ तिचिया भांगावरी गोंविला,
खांदे लांब सुकेश कृष्ण पडले त्यां आंगें तो शोभला. ८४.

### दिंडी.

तिच्या पायांशीं पडे मंजुळा ती.
वामभागीं मधुकरी उभी होती.
तिच्या सन्मुख ती शशिकला उभेली;
काय ऐका तिथ समयिं त्या ह्मणाली:—८६.

## श्लोक.

" जुना काळ गेला तदा अन्यरीती
इथें सर्व कार्यें अगे होत होतीं;
तुला शब्द माझा सदा मान्य होता
विचारीत होतीस तूं येत जातां. ८६.

मता घेत होतीस जें वंद्य नित्य
सदा बोललें वाटलें तेंचि सत्य;
नसे हालली माझियेवीण काडी
वदें जें पडे भाग तें तूजपाडी. ८७.

तुला वाढवीलें तुला खेळवीलें
सुधातुल्य गे ज्ञान म्यां पाजियेलें.
तुला पोटिंच्या अर्भका ह्या समान
सदा रक्षियेलें उराशीं धरोन; ८८.

जरी जन्मदात्री दुजी गे असे ती
खरी माय मी; वाढवीलें स्वहातीं.
तुला गोष्टि सांगोन मी उन्नतीच्या
दिलें शिक्षणा पूर्ण उच्चाप्रतीच्या. ८९.

परी वेळ ती पालटोनी ग गेली
प्रतिस्पर्धि जेव्हां स्थळीं येथ आली;
तिनें काळजा तूझिया चोरियेलें
तुझें चित्त गे आपणाठायिं नेलें. ९०.

हळुहळु मग तूं गे दूर केलेंस मातें.
मम हृद फुटताहे ऐशिया दुष्ट घातें.

उमजत मज नाहीं काय अन्याय झाला;
उमविलि कृति ऐशा यावया का फळाला? ९१.

सुरळित तव जावा हेतु अंतास गे हा
म्हणुन त्यजुन सार्‍यां इष्टमित्रांस गेहा
तव पथ धरिला म्यां सर्व सोडोनि आलें;
सकळ मुकुन आतां हातिंचें कार्य गेलें! ९२.

## साकी.

आजवरी हें सोसुनि राहें धरुनी पुढची आशा,
कधिं तरि वळशिल मजवरती तूं करिशिल ना मम नाशा,
आहे निष्ठा ही ! चित्तीं इष्ट तुझें वाहीं. ९३.

तुजविण नाहीं या सत्कार्या अन्य कुठें ही त्राती
होतो सिद्धी, धरिलें आहे महत्कार्य जें हातीं !
आहे निष्ठा ही ! चित्तीं इष्ट तुझें वाहीं. ९४.

## दिंडी.

परी प्रेम तुझें कमलजेवरी तें
अधिक झालें हें स्पष्ट कळुन येतें.
नवी येई स्त्री इथें शिकायाला,
कमलजेशीं तूं धाडिशी तियेला. ९५.

असे परदेशी अल्पवयी स्त्री ती
अल्पबुद्धीची कमलजा विजाती;
तुझ्या गांवचि मी बहुतां दिसांची
सोवतिण तव शुभ इच्छिणारि साची. ९६.

तुझ्या हातीं मम-कार्य-श्रेय आहे
दंड भोगीं मी म्हणोनीच का हे?
अंतिं ओळखशिल काय रूप आहे
कमलजेचें तें, हीच वाट पाहें. ९७.

## श्लोक.

आले गे इतुक्यामधींच वृक हे, कां येति, मा सांगवे,
तोंडा लावुन तोंड ती गतदिनीं बैसे तयांच्या सवें.
जाणें, पूर्ण तिघांस ती वळखिते, तीच्याच ते गांवचे;
रात्रीं ओळखिलें तयां, तदुपरी कांहीं न मातें सुचे. ९८.

सांगावें तुजलाचि वृत्त अवघें, जावें तुजें गे कुठें !
होतें येत तुझ्याकडे, मनिं परी संदेह मोठा उठे;
वाटे तूं म्हणशील गे कमलजे वृत्तांत सारा पुसुं;
ऐसें जाहलिया, मनीं समजलें, दोघींहि अंतीं फसूं. ९९.

त्वां जावोन तिला जरी पुसियलें, नव्हा तरी ती धरी;
नानारीति तुला बहू शिकवुनी तुझ्या शिरे अंतरीं;
बोलोनी तुशिं गोड गोड वचनें केल्या कृतांची क्षमा,
ती मागेल तदा; म्हणेल म्हणि ती मी पावलीसें भ्रमा. १००

सांगेल वृत्तें बहु द्वेषकारी,
आहें म्हणोनी कृति या प्रकारीं
माझी असे तीस दगा कराया
उच्चा पदातें तिचिया हराया. १०१.

राहें भिऊनी जरी या अपेष्टे,
आलें असें मी इथ फार कष्टें,

ठेवीयली त्यांवरि योग्य दृष्टी
म्यां वालवीला दिन फार कष्टी. १०२.

येवोन पाहें तंव गे दुपारीं
गेली पहाडास तुझी सवारी;
होती तिथें गेलि तुझ्यासवें ती,
सांगेल सारें म्हटलें स्वचित्तीं. १०३.

असे काय सारें तुला तें विदीत,
कशी येथ आली महा दुष्ट जात;
इथें कासया पातलें हें त्रिकूट
स्वलग्नें इथें पाडण्यालागिं तूट? १०४.

पळाली असे येथुनी साह्यकर्त्री
असे मूळ नाशा, क्षया अग्रवर्त्री;
कसें तोंड दावील ती येथ आज?
असे भासली का मुळीं सर्व लाज! १०५.

आजि इथ उरलीसें एकली या स्थळीं मी
तन मन धन तूझ्या वेंचलें ज्या सुकामीं;
बिघडलि कृति ऐशी, क्रोध तें पावशील;
मजवरि सकळांचे दोष तूं घालशील; १०६.

परी जाणशी तूं म्हटें येथ केवीं
तुझ्या माझिया कार्यिं मच्चित्त लावीं;
असे दोष माझा तरी लाव वाटे
पहा गे पुढें काय होतील तोटे. १०७.

चहूंकडे होइल ती फजीती
पडू नरांच्या मुखिं सर्व रीती;

पुरें जगीं होइल हांसणें तें
नये कराया धरुं ज्यास हातें." १०८.

तदनु इंदिरा तीस बोलली
"शपथ वाहिली आज मोडिली;
गमन तूं करीं पाहिजे तिथें;
मुकशि कन्यका, ठेवुं ती इथें." १०९.

शशिकला ह्मणे:—"सर्व ही कृती
सफल थाट हा उन्नतीप्रती
प्रथम गे असे योजिला स्वयें
वदसि हें तरी कोणच्या नयें?" ११०.

धरुन मधुकरीचा हस्त बोले तिला ती:—
"चल उठ निजमार्गा जाउं आल्याहि रीती."
उठुन मधुकरी तैं आइच्या स्कंधभागीं
निजशिर गलितांगी ठेवि, चाले अभागी. १११.

वळुनि वळुनि पाहे इंदिरेच्या मुखाला
नयनिं भरुन अश्रू-बिंदुंचा लोट आला;
निजहृदिं कमलाक्षा प्रेम आलें अपार,
स्वमनिं ह्मणतसे हा लेंकरा काय घोर! ११२.

साकी.

इतुक्यामाजी मंदिरद्वारीं गडबड ऐकूं आली;
धांवत तेथुनि एक नार ये, कंपित, बहु दमलेली,
दिसली बावरली। हातीं पत्रें आणियलीं. ११३.

## श्लोक.

पत्रिका दिल्या राजबाळिला;
वाचुनी तिणें अर्थ जाणिला;
नेत्रवर्ण तें लाल जाहला
कोप तन्मनीं शीघ्र दाटला. ११४

असे थोर आवेश आला तियेला,
तनू कंपली गाल आरक्त झाला;
दिसे जेविं अग्नी-शिरीं आगि पेटे;
मुखीं शब्द येना तिचा कंठ दाटे. ११५.

फिरवुनी मुखा चंद्रकेतुला
निरखिलें, उभा जेथ राहिला;
चुरुनि पत्रिका त्यासिं फेंकिल्या
उचलुनी तयें हातिं घेतल्या. ११६.

मुळिं जरि वदलीना शब्द ही ती मुखानें,
तरि समजुन हेतू इंदिरेचा तयानें
उघडुन चुरलेल्या पत्रिका वाचियेल्या
पितर उभयतांचे यांहिं त्या पाठवील्या. ११७.

## साकी.

पहिलि पत्रिका गजेंद्ररायें, कन्ये लिहिली होती;
चंद्रकेतुच्या घाबरलेल्या पडतां जनकाहातीं.
कन्ये लिहिलें कीं । मचडे दुर्लौकिक लोकीं. ११८.

पद. जिल्हा झिंझोटी--ताल त्रिवट.

-सूर्यवंशीं चंद्रकेतू—या चालीवर.

"राजपुत्रा धाडियेलें तव गांवीं जैं कन्यके!
नगरींचे नियम तुझ्या नव्हते मजला ठावके;
बहु घाबरलों अंतरीं कीं, प्राणातें तो इथ मुके;
धांवत आलों सांगण्याला कीं मृत्यूला तैं चुके.११९.

साक्या.

इतुक्यामाजी सांपडलों मी तज्जनकाच्या हातीं,
झालों आधिन त्या ज्या वाटे पुत्रजिवाची भीती.
आणी सैन्याला | वेष्टी तुझिया नगराला". १२०.

पत्र दुजें नृप सत्यध्वज याकडुनी होतें आलें;
योग्य योजुनी भाषा तेणें होतें तें लिहिलेलें
वेष्टी नगरातें | रक्षाया निजपुत्रातें. १२१.

श्लोक.

"माझा पुत्र असे तुझ्या नगरिं तो, केशाग्रिं त्या होउना।
कल्पांतीं कशिही कुणेपरि इजा, ऐशी करीं योजना;
येनोंदे परतोन त्या पुनरपी ग्रामीं सुखें आपुल्या;
दे, त्यातें कर आपुला घडवि तें कार्याप्रती योजिल्या.१२२

पद. (तुह्मां तो शंकर सुखकर हो-या प्रबंधाचे चालीवर.)

कुमारी! कुमाराप्रति कर दे ॥ निशिदिनीं मननिं मनिं
आननिं द्युतनये, गुणमये, सुहृदये वससि ममसुताच्या।
सदा गे ॥ कुमारी! कुमाराप्रति कर दे ॥ ध्रु० ॥

तद्रुपा अति सुचिर मनिं आणुनी, श्यामा, धामा, त्यजुनी पातला अंगना-शुद्धिप्रति सुहृदांसवें, शौर्ये, कामिनी-वसन-भार लेवुनी, संकटा न जुमानुनी, योजनें उल्लंघुनी, वीर सुंदर योग्य तरुणी आला वराया प्रमोदें ॥

कुमारी! कुमाराप्रति कर दे ॥ १२३.

पद. राग कांबोद (ताल सुरफक्ता).

मनीं इष्ट बहुकाल संकेत केला—या चालीवर.

पुनः एकवार मागतों तुजपाशीं
ऐक रूपशाली मम वचनाशीं ॥ ध्रु० ॥
दिव्य हे सुंदरी राजपुत्रा वरीं,
आपुलासा करीं; योग्य तूतें ॥ १ ॥ पुनः०
सोड ह्या खटपटी, यश न मिळे शेवटीं
व्यर्थ भलत्या अटी घालूं नको ॥ २ ॥
पुनः एकवार. १२४.

पद. जिल्हा झिंझोटी. ताल त्रिवट.

(सूर्यवंशी चंद्रकेतू—या चालीवर.)

सोड तूं गे सोड ऐसें अघटित महा कृत्य हें,
स्वीकरीं ध्यास ज्यातें अन्य तुजविणें नोहे;
जोड गे तूं राजपदाला शोभशिल त्या स्वामिनी;
अचल हें स्त्रीराज्य नाहीं, निष्कामी या कामिनी. १२५.

श्लोक.

स्त्रियांपेक्षां वाटे नरजन जरी नीच तुज तें,
तुझी मिथ्या आहे सकल कृति आज्ञांस गमतें,

कळ संग्रामातें जरि न सुखि ये मत्तनय तो;
पित्याला जिंकोनी सकल तव गर्वास हरितों."१२६.

पत्र वाचतां येथ थांबला
राजपुत्रिला स्पष्ट बोलला:—
"पातलों न त्वत्कार्य-नाशक;
द्वारिं येइं त्वत्पाणि-याचक. १२७.

पद. राग धनाश्री, ताल एका.

(विश्वंभर प्रभु पतितोद्धरणा—या चालीवर.)

ऐश्वर्या घरदारा सोडुनि तुज वरण्या पावलों;
सुशीले, तुज वरण्या पावलों ॥
पडतां डोहीं वांचविण्या तव प्राणातें धांवलों ॥
सुशीले० ॥ ध्रु० ॥
डोहाच्या तळिं बुडी मारुनी, जळिं सन्निध ठाकलों ॥
सांवरिली गतप्राण जणूं का, सुख मनिं बहु पावलों ॥१॥
ऐश्वर्या०
प्राणदान गे तुज दिधलें म्यां, काय म्हणुनियां दुरावलों॥
नन्ना धरिलिस मुळापासुनी, हतभाग्य जाहलों ॥ २ ॥
ऐश्वर्या० .
देह तुझा हा नसेचि, मजला दे, ध्याया पातलों॥
होशिल माझी सुखदा भार्या, मानुनि मनिं मातलों ॥३॥
ऐश्वर्या०
गुणिं रूपीं का कमतर झालों, कीं तुज ना भावलों?॥
प्रतिमा घोळे मनिं निशिदिनिं, तव नादें वेडावलों ॥४॥
ऐश्वर्या. १२८.

पद (होरी) रागिणी भैरवी, ताल—दीपचंदी.

काय असा मी अपराध केला ॥
लोटून दिधलें त्वां गे मजला? ॥ध्रु०॥
मज एकट्याला सोडून दिधलें
इतुकेंच नाहीं विपरीत घडलें ॥ १॥
टाकुन देशी पुरुष सकल ते
विस्मित जग तव करणीस बघतें ॥२॥
बालपणापासून मीं हृदयीं
ठेवीलें प्रेम तुझिये सुनामीं ॥३॥
भावीत होतों संसारसुखाला
कां गे तुवां अंत गोड न केला ॥४॥
वरिन कुणा जरी, तुजची वरीन
हृदिं या न इतरा ललने धरीन.॥५॥
क्षात्रियपुत्र अक्षर खोटें
वदणार नाहीं मी या मुखावाटे ॥ ६॥ १२९

श्लोक.

नादें सान्निध मी तुझ्या, जवळुनी कल्पांतिं ना गे निघें.
अंगाचे तुकडे करीं, तुडविं त्यां; माझा इथें प्राण घे!
देहा या तुजसाठिं आजवरि म्यां रक्षीयलें सुंदरे,
मोक्षा जाइन मी तुंवा वधियल्या हातीं स्वयें इंदिरे!१३०

कितिहि वदशी नाहीं नाहीं, निराश नहोइं गे!
निजमनिं धरीं ऐशी आशा जरी तनु ही जगे,

वळशिल अगे माझ्याठायीं तुझें मन लागुनी;
तव कर मज दे, आलें ठेलों सुखा गृहिं त्यागुनी. १३१

पित्याचीहि तुझ्या तशी वृत्ति आहे,
कधीं "हो" ह्मणेशी अगे वाट पाहें;
न आज्ञेविणें त्याचिया येथ आलों;
पहा पत्रिका लग्नि जें सिद्ध झालों." १३२

असें ह्मणुन देइ तो करिं तिच्या जुनी पत्रिका.
तिच्या सुजनकें तया दिधलि शोधण्या कन्यका.
तया धरुन पत्रिके, करि बहू सती क्रोध ती.
न ती उघडितां, धरे वरति आपटीते सती. १३३

जसा पूर पाण्याचिया रुद्द पाटीं
चढे लाट लाटांवरी, होइ दाटी,
तसे शब्द येती तिच्या कंठनाळीं
महा ओघ कीं लोटतो त्याचिवेळीं; १३४

मुखांतून येणार आतां फुटोनी
अती क्रुद्ध वाणी असें ये दिसोनी;
पडे तों ध्वनी कर्णि, कल्लोळ माजे;
स्त्रिया बोलती भोंवतें सैन्य गाजे. १३५

साक्या.

झंजा मारुत येउन जैसा, उडवितसे फुल पाना
नानारंगी नानारूपी नाचवि आकृति नाना,
तैशा तिथ नारी । भिउनी गेल्या अंतरीं. १३६
कोणी ह्मणती सैन्य पातलें, नगरा वेष्टि समोंतीं;
कोणी ह्मणती येऊं द्या तें, काय घडे त्याहातीं.
ऐशा घोंटाळीं । पडलें मंदिर त्या वेळीं. १३७.

## श्लोक.

क्रोधें तप्त जहालि ती परिसुनी ऐशा वृथा कल्पना;
आवेशें खिडकीशिं येउन सती सोडोनियां आसना,
बोले त्या सकल स्त्रियांप्रति महाशब्दें वहू ताडुनी: —
"कां ऐसा मतिहीन आजि बनतां, गेलां भयें नाडुनी! १३८

आहे स्वामिण मृत्युनें तुमचि कां आजीच ती ग्रासिली?
कार्यें कां तिचियांत शक्ति नुरली रक्षावया आपुलीं?
मी, मी, मी अजि मी पहा जगतें, साहीन मी एकटी
साऱ्या त्या नरलायकां; युवतिंनों! रक्षीं तुम्हां संकटीं! १३९

युद्धा जाइन मी, लढेन समरीं मत्कार्य रक्षावया;
येतां मृत्यु रणीं तियेंहि लढतां अर्पीन देहास या.
चत्रोनी करिं कार्य यापरि मला संप्रेम तें एकदां
त्यागी कां कुणि त्या मधींच, कुणि मी त्यांगीं न माझी कदा.

ही भीती मनिं बाळगा अशि फुका अन्याय ना तूमचा.
झालीं षष्ठसहस्र आजि वरुषें दासत्व अस्थित्वचा—
यांमाजी भिडुनि तुम्ही सकळहो झालां असां भ्याडशा;
काळें निश्चय पालटेल तुमची दुःखास्पदा ही दशा. १४१.

रहा गे उग्या सर्व! कल्लोळ कां हा?
महानर्थ ऐसा फुका मांडिताहां?
तुम्हांलागिं देईन मी हांकुनियां
स्वधामास जा! घालवा जन्म वांया. १४२.

न्हावा तुम्हीं तो जलघट शिरीं पूर्ण भरला,
भरोनी त्या हातीं जरि न शरिरीं प्राण उरला;

धुवावें, बोळावें, निसणटिपणा नित्य नियमें
करावें; हें तुह्मां अवडत असे हो मज गमे. १४३.

तुह्मां हें नशोभेचि स्वातंत्र्य साचें;
तुह्मां गोड तें दास्य वाटे नरांचें.
कराया सदा आवडे त्यांचि सेवा,
जसा कीं नरांहातिं स्त्री-सौख्य-ठेवा. १४४.

बसा बोलती ते तदा ही बसावें;
उठा बोलती तें तुह्मीं हो उठावें;
जसें नाचवीती तसें सर्व भावें
सदा नाचुनी आपुतें घालवावें." १४५.

ऐकोन वाणी अशि इंदिरेची
गर्दी निमाली तिकडे स्त्रियांची.
झुंडी तयांच्या फुटल्या समस्त,
संग्राम ज्या ऐकुन भीतिग्रस्त. १४६.

हंसत करुन मुद्रा इंदिरा राजपुत्रा
मधुर वचन बोले हर्षिता चारुगात्रा,
"नरवरमणि तूं रे शोभती दिव्य साचा
खुलविशि कुलकीर्ती; वर्ण तैसा नरांचा. १४७.

कधिं तव उपकारा अंत येणार नाहीं;
निजतनु जगनाहे युक्ति तावें तुझ्या ही
परम करुन धैर्या प्राण हा वांचवीला,
ममकृतिस तुझा तें साह्य वा देह झाला. १४८

बहुत वसनिं या रे शोभसी राजपुत्रा!
कुनि मज नुमजे त्वां केलि कां ही विचित्रा.

समर करुन न्याया आगलें काय सैन्य!
तवरि करुं पहाशी, काय हें थोर दैन्य! १४९.

अशि विनोद करून ह्मणे तया;
स्मरण ये, कृति पाववि तो लया
तशि नये क्षणिं होइ उदास ती
कळवळोन वदू वदली सती. १५०.

जळिं तरि बुडलीना माझि कां सर्व काया!
परम करुण देवें प्राण हा वांचवाया
अवचित तुज कां तें धाडिलें योग्य काळीं
तवरि करुन न्याया? दास्य येण्या कपाळीं? १५१.

पद. राग कानडा, ताल त्रिवट.

वरण्या कीं मज दासी करण्या इच्छिसि तूं हे नृपतनया!
परहस्तें का तनु ही द्यावी, सत्कार्यातें मोडुनियां? ॥ध्रु०॥
वरतां तुजला मम स्वातंत्र्या अंत अकाळीं येउनियां
हानी सारी निश्चित होईल, थोर निराशा स्त्रीजनिं या॥१॥
वरण्या कीं०
अमोल काया काय फुकावी नित्य गुलामी करोनियां॥
पुरुषांचेविण गत्यंतर ना, काय ह्मणावें याचि नया!॥२॥
वरण्या कीं० १५२.

श्लोक.

ह्मणसि काय रे लग्न योजिलें?
कृतिस ऐशिया कुणि स्वकारिलें?
जनक-कृत्य हें रुचत ना मला
गमत मी न तें विक्रियली तुला. १५३.

विशाला ऐशी ही पृथिवि घटती हेममय तो
तया हेमाचा रे मुकुट करुनी त्याहि वरती,
नगांचे साऱ्याही बनवुन हिरे त्वां जडविले,
तरी ना तद्लोभें मम मन वळे; पूर्ण ठरलें, १५४

पंजाबी ठुंबरी. राग केसुरी-ताल त्रिवट.

वर मिळवाया लग्न करावें;
सासरिं स्वातंत्र्यचि बुडवावें ॥ ध्रु० ॥
सुदैव तें, जरि माउलि सासू
सदैव ना तरि नयनीं आसूं ॥ १ ॥
नणंदेचा परिसावा घसरा
चाहड्या नाशिति सासुसासरा ॥ २ ॥
व्यर्थ मत्सरें भांडति जावा
भांडविती मग भावांभावां ॥ ३ ॥
इतुकें सोसुनि पतिची जरि कां
प्रीत नसे तरि आयुष्य फुका ॥ ४ ॥
कोण विवाहित सासुरवासा
सासूच्या ना जाणत लासा ॥ ५ ॥
नांवाकरितां अंगावरतीं
दागदागिना लादुन देती ॥ ६ ॥
परि दासत्वा पार नसे तो
हा अनुभव त्या लग्नें येतो ॥ ७ ॥ १५५.

पद. राग हमीर, ताल त्रिवट.

( असो धिग धिग—या चालीवर )

नसे तिळभर भीति का जिवाला
येवोनी मागशी तूं मजशीं वरण्याला ॥ध्रु०॥

दिसे घोर उडी ही रे तुझि मजला
आलासि कां व्यर्थ इथें आजि मरण्याला ॥ नसे-
तिळभर ॥ १ ॥ १५६.

श्लोक.

अरे निघुन आलिया परत मार्गि जाई सुखें!
न पहावत हें तुझें वदन कज्जलासारखें.
स्वरूप बदलोनियां करिशि वेष हा मीपणें
सुकार्मि फसवावया; फसशि तूं स्वयें; धिक् जिणें! १५७

अगे कोण आहे तिथें? यांस दावा
गृहीं जावया मार्ग! वाटेस लावा!
नको लांडगे येथ हे क्रूर-दृष्टी
करा यांचिये पृष्ठीं हो मुष्टि-वृष्टी." १५८.

ऐकोनी अशि क्रुद्ध वाणि निघतां तेथोन अष्ट स्त्रिया
अंगीं ज्या बहु धष्टपुष्ट दिसती ज्या जाणती ना दया,
त्यांहीं घट्ट धरोन हातिं त्रिकुटा लोटीत नेलें सवें
गेले हिर्मुसले; अपार हंसल्या त्या नारि एक्या रवें. १५९.

दिंडी.

अंत वेषाचा शोचनीय झाला;
वधू-प्राप्तीचा फुकट काळ गेला!
परी आशा ना जाइ अंतरींची.
गेलि कोंदुन मनिं मूर्त्ति इंदिरेची. १६०

नवथा सर्ग समाप्त.

# संगर नामक सर्ग पांचवा.

दिंडी.

मंदिराच्याबाहेर लाविलेले
मित्र गांवाच्या शिवेपार गेले;
मार्ग धरिला तर्यि थेट उत्तरेचा,
दिसतहोता जिथ थाट संगराचा. १.

श्लोक.

जिथें स्थापिली छावणी राजियानें
तिथें पातले दीन झाले श्रमानें.
शिवेपाशि येतां तया छावणीचे
तयां प्रश्निती गाडदी पाहऱ्याचेः—२.

"असां कोण दोघीं, कुठें जात आहां?
कशा येथ आलां, खुलासा करा हा".
ह्मणे चंद्रकेतूः—"अहो मित्र आहों
इथें राजभेटीप्रती पातलों हो." ३.

ह्मणे गाडदीः—"जा अजी भेट होई,
महाराज ते वैसती तंबुठायीं."
दिला तंबु दावावया एक प्यादा,
तया गाड्यानें करोनी विनोदा. ४.

निघुन तिथुन जाती तंबुंच्या थेट वाटे,
स्थळ जिथतिथ दाटे तंबुच्या शुभ्र थाटें.

नर-गणिं गुणि योद्धे वीर ते सर्व आले,
सकल वसति डेन्यामाजि ते आपुलाले. ५.

तंबूंत आले मग ते सुमित्र,
बैसे जिथें राय, तिथें सुपुत्र
प्रेमें उभा जोडुन हस्त ठेला;
साष्टांग राया प्रणिपात केला. ६.

जसे तंबूमाजी युवति-वसनीं मित्र शिरले,
तयांच्या रूपाला सकल बघुनी वीर हंसले.
श्रमानें रात्रींच्या विसकलित पोशाक सगळा,
असे झाला; अंगावरि उघळला मार्गि धुरळा. ७.

## दिंडी.

नत्रे रायाचे उदकिं भरुन गेले
उडुन गेलेले पंचप्राण आले.
पुत्र पाहुनि मनिं राय पूर्ण धाला;
समर केल्या अधिं, पुत्र हातिं आला. ८.

## श्लोक.

बघुन निजसुपुत्रा राय बोले गजेंद्राः—
"निजगृहिं अजि जावें ये क्षणीं हे नरेंद्रा!
सुरक्षित मम आला पुत्र हा चंद्रकेतू.
तदुपरि इथ तुह्मां ठेविण्या नाहिं हेतू." ९.

तदा न्याहळोनी स्वपुत्रा वदे तोः—
"अरे काय हें रूप बा चंद्रकेतो!
कुठे रंग गेला कुठें तें शरीर!
वधू-शुद्धिला हे किती यत्न घोर! १०.

जा बाळा उतरोन वेष अजि हा राहें उभा संगरा;
तेथीं एकिकडेस हा युवतिचा संभार रे गोजरा;
केलीसे शशिनें निवेदन कथा साद्यंत पुत्रा मला;
आले बंधु तिचे तयां समरिं तूं जिंकावया जा भला."११

तदा सुत वदे पित्याः—"करुन काय तो संगर
वरेल कुमरी कधीं, वदुं शके न कोणी नर.
शरीर जरि पावलें, तरि तिचें मिळे का मन?
न हेत मनिं तो जरि, तरि वृथा सुभार्या-धन."१२.

## साकी.

बोलुन ऐसें पित्यास विनयें तंबूंतून निघाला;
मागुन अपणासाठीं तंबू, मित्रासह तिथ गेला.
वेषा उतराया। युद्धा सिद्ध तदा व्हाया. १३.

## श्लोक.

जसा तो विद्यार्थी स्वमनिं अपराधा स्मरुनियां,
गुरू देखीयेल्या लपत असतो पावुन भया,
तसे ते दोघेही लपत समुदायांत निघती;
स्त्रियांच्या वस्त्रांनें शरमुन मनीं शीघ्र पळती. १४.

उतारोन तंबूंत वस्त्रादिकांतें
तदा शस्त्रअस्त्रांस ल्याले स्वहातें;
नरांचा नरां वेष जो नित्य साजे
जगीं त्यांहिं केला, मुखश्री विराजे. १५.

---

असे जाहली याघडीं सुप्रभात
रवी उत्तराद्रिप्रती शोभवीत;
निघाले तया अद्रिमार्गें विचित्र,
शशी भेटला तों, तिथें प्राणमित्र. १६

ओशाळला तैं शशि पूर्ण रीतीं,
केल्या कृतीची जिवि फार भीती;
केली क्षमा त्यांहिं परस्परांनें
जो मारि; जो गाइ अभद्र गीतें. १७.

पुनः तिघे मेळति एकठायां
त्रिकूट तें स्वानुभवा कथाया
वसे; वदे तो शशि कीर्वि शैला
त्यजूनि त्या छावणिमाजि आला. १८

ह्मणे:—"मद्याच्या रे प्रबळ बहु मादें तुडविला,
बुझालों; चिंतेनें भ्रमण करितां देह दमला.
पथीं जातां जातां प्रिय कमलजा भेटलि मला,
इथें आलों दोघें; बघ तिथ तिचा देह पडला. १९

नबोलेचि कांहीं न कांहींच लक्षी
न पाणी पिई अन्नही ती न भक्षी;
असे पोथि लावीयली रोदनाची,
स्थिती जाहली ऐसि तीच्या मनाची." २०

पडलि जिथ असे ती, पातले तेथ रारि;
बघुन तिज निचेष्टा, दुःखिता या प्रकारें,
द्रवति सुहृद चित्तीं; बंधु वैसोन पाशीं,
उचलुन भगिनीचा हस्त घेई उराशीं. २१

"भगिनि हे ! मधुरे ! मुख ऊत्रलीं
पडुंनको अशि गे, तनु कोमली.
करिशि काय ? तुझा नच्चि वांक तो
भगिनिहस्त न बंधुसि मारितो. २२

पद. राग काफि, ताल दीपचंदी.

(भोलानाथ दिगांबर--या चालीवर.)

घडलें जें आजि घडेंदि तयातें, कां खिन्न होशी अशी ?
भागिनी, कां खिन्न होशी अशी ? ॥ ध्रु० ॥
गतगोष्टीचें, मनन करोनी। व्यर्थ हृदीं ही हाय धरिशी?
भगिनी, कां खिन्न ॥ १ ॥
निजबंधूचा, नृपतनयाचा । कधिं काय प्राण हरीशी
भगिनी ॥ २ ॥
मोडीली शपथ, बहु इष्ट झालें । होती ती पूर्ण कशी ?
भगिनी ॥ ३ ॥ २३.

श्लोक.

ह्मणे कमलजप्रती नृपकुमार तो कोमळः—
"अगे सुतरुणी नको हृदयिं होउं गे विह्वळ.
मनासि करिं शांत तूं; मजहि काय धोका नसे?
त्रधूस मुकलों पुरा ! कशिग इंदिरा ती दिसे?"२४.

दिंडी.

तिनें आयकिली राज-तनय-वाणी,
स्फुंदस्फुंदोनी नयनिं येत पाणी;
पदर सांवरुनी मुखावरी घेई
उठुनि बैसे जिथ पडलि तोचि ठायीं. २५

पद. जिल्हा झिंझोटी, ताल एका.

"हर! हर! हर!" म्हणे काय घात केला ॥ स्वामिनि-
च्या कार्याचा हिरमोड झाला ॥ ध्रु० ॥
काय अशी पापिण मी। दुर्दशाही सकल कामिं । करुनि
कलह निजधामीं । घोर मांडिला ॥ हर! हर! ॥ १ ॥
स्वामिनी मज अंतरली । काय अशी बुद्धि भ्रमली ।
जागा जागिं मुळि नुरली । तोंड दाखविण्याला ॥हर!
हर! ॥ २॥ २६.

(मणिबंधाच्या चालीवर.)

मोडियलें म्यां सद्रचना । दावुं कसें हें तोंड जनां!
रक्षियलें म्यां मम अनुजा । नाशियलें तें व्यर्थ दुजां.॥२७

साकी.

शशिवदनें तिज म्हटलें:—"साध्वी खेद करींना आतां
शांत असें तूं जें झालें तें येईना फिरवीतां.
बाळिकडे पाहें । तिचियासाठीं जागें राहें". २८.

श्लोक.

परिसुनि सति नामा आपुल्या अर्भकाच्या,
ढळ ढळ रडुं लागे नाशके वर्णु वाचा.
असुंवर असुं गाळी धाय ती मोकलूनी,
धडपड जिविं लागे कंप अंगीं सुटोनी. २९.

बोले:—"बाले कमलवदने! वत्सले माझिया गे!
आलें नाहीं मनिं किति तुझे हाल होती वियोगें!
हातांतूनी निजपदरिंचें घालवीलें सुरत्न,
आतां कन्या परत मिळण्या मीं करूं काय यत्न!३०

टाकीलें म्यां तुजशिं तिकडे, काय चांडाल माता !
माझी कन्या ह्मणुन तुजला दोष गे जात येतां
देवोनीयां पिडितिल सदा, निश्चयें जाणतें हें
कैशी बुद्धी उपजलि अशी! दैन्य मातें नसाहे. ३१.

ह्मणतिल तिचि होती माय ह्या ह्या प्रतीची
करितिल मम निंदा तोडण्या प्रीत तीची;
उडवुन मन तीचें स्त्रीय माते वरोनी
करितिल तिज दुष्टा, कर्ण तीचे भरोनी. ३२.

मग मज कधिं ना ती ओळखीणार बाळी!
जरि कधि वळखीलें, कोणच्याही सुकाळीं
वळखिल, परि बुद्धयां दूर राहील बाला,
कृति अशि घडल्या का सौख्य वाटे हृदाला? ३३

चुकी थोर झाली सुते टाकियेलें
तिथें एकटीला; कुठें चित्त गेलें?
जंये वेळि कल्लोळ केला स्त्रियांनीं;
मुळीं भान गेलें; तिघे सर्व ध्यानीं. ३४.

द्वारीं जाउन बैसतें रडत मी, त्या राजबाळेचिया
मागोनी मम कन्यका उठवितें पोटीं तिच्या मी दया.
आक्रोशें रडुनी तिथें गडबडां लोळेन भूमीवरी.
नाना अन्य उपाय योजिन असे कीं ती द्रवे अंतरीं. ३५

नाहीं मी उठणार तेथुन जरी कन्या न माझी मिळे.
घेवोनी मग बालका मधुर त्या चुंबीन मी मंजुळे.
हा कन्ये! मधुरे सुरम्यवदने हा वत्सले, कोमले!
माता दुष्ट किती तुझी, परकरीं कीं तूजला टाकिलें. ३६

ऋणी जन्माची तो करिल मज जा देववि सुता;
अहो जन्मोजन्मीं स्मरिल उपकारांस वनिता.
विनंती माझी जा परिसुनि करी साह्य करवी,
तयाच्या मी सान्या सकल मनिंचे हेतु पुरवीं.' ३७.

"नको खंती होऊं" शशिवदन बोले तयि तिला,
"प्रिया कन्या तुझी कमलवदना देववुं तुला"
सुखाची वाणी ही परिसुन, पुनः भूमिवरती
पडे; मूर्च्छा आली; सनि कमलजा हालत न ती.३८.

अहो पोटचा जाळ का अल्प आहे ?
वियोगाग्नि का सारियांलागि साहे ?
कुणाचीं कितीही मनें दुष्ट होती,
परी पोटिंचें बाळ ना त्यागिती तीं. ३९.

---

दिंडी.

काय छावणिमधिं वर्त्तमान झालें,
पुढें परिसा तें काय घडुन आलें.
बंधु तेथें तो दिव्य इंदिरेचा.
करुन आला संकेत संगराचा.

इंदिरेचा प्रिय वीरभद्र बंधु
खऱ्या धैर्याचा पूर्ण शौर्य-सिंधु
भगिनिकार्याचा जयीं नाश झाला
पारिपत्याकारणें तेथ आला. ४१

श्लोक.

चंद्रकेतु हें वृत्त ऐकुनी
मूर्च्छितांगना तेथ ठेवुनी

मित्र संगतीं घेउनी निघे;
रंगभूमिलें पावती तिघे. ४२.

राजे दोन्हि तिथें करीत बसती संवाद लग्नाविशीं;
"पुत्रातें तनया विवाहिं" ह्मटलें सत्यध्वजें "दे कशी;
देवोनी बहु लाड रे तिज नृपा वेडावलें त्यां अधीं.
आतां एवढि बेकली न धरितां येणार हातीं कधीं. ४३.

नरां सारियां सर्वदा तुच्छ मानी
जगाची, स्वताची, करी सर्व हानी;
करी भंग माझ्या सुताचीहि आशा,
ह्मणे 'ना' तरी युद्धिं पावेल नाशा. ४४.

करूं युद्धसंग्राम तीतें हराया.
नृपा! राजवूं शस्त्र अस्त्रें करीं या
हरूं गर्व तीचा, करूं पारिपत्या;
करूं लग्न, रे देवुं पत्नी अपत्या." ४५.

साकी.

राजेंद्रनृप या परिसुनि वचना चंद्रकेतुला बोले:—
"गमतसे मम बालेच्या गृहिं, असतिल हालचि झाले.
लोभ तिचा धरिशी । वर कीं संग्रामा करिशी". ४६.

श्लोक.

"नसे संग्रामाची मम हृदयिं इच्छा मुळिंच ती
न तो ये हो कामी" नृपतनय बोले निजमती;
"नव्हेई कल्पांनीं कुशल विधि ऐशाचि अरिनीं;
रमे लग्नासाठीं समर करितां त्या न सुगती. ४७

आधींच मी तिज दिसें नर दुष्ट खोटा;
संग्राम तो घडलिया मग पूर्ण तोटा.
साऱ्या नरांपदरिंचें ममसाथिं पाप
येईल; होइल पुरा मम-कार्य-लोप. ४८.

दिंड्या.

तिच्या कार्याच्या आड पुरुष येई
पूज्यबुद्धी तिचि नुरे तयाठाईं;
जरी कोणी विध्वंसि तिच्या कार्या
तया धिःकारिल सुता तुझी आर्या. ४९.

युद्धि संगरिं हें काम होत नाहीं
तोफभडिमारिं वा न सायकांहीं;
हृदयिं प्रेमाचे पाहिजेत गेले
बाण कोमळ, तिथ भिडुनि राहियेले. ५०.

तिच्या प्रेमाची मज असे अपेक्षा;
लग्न नरुचे मज किमपि नाहिंपेक्षा;
वरुनि काय करूं जीस नावडे मी
कशी शांती नांदेल अशा धामीं ? ५१.

विश्व पालथिलें, जलधि शोषियेला,
अद्रिसमुहाचा चुरा जरिहि केला,
अतुल-ऐशा जरि बळा दावियेलें
ह्मणुन काय तिचें प्रेम साधियेलें ? ५२.

धरुन बांधियलें, गुलाम ही केलें
ह्मणुन काय तिच्या हृदा जिंकियेलें!

जरी संगरिं ती हरुन बद्ध होई
ह्मणुन घेतां का हृदय हातिं येई? ५३

### श्लोक.

जो, जो, सायक जाय, येथुन सुटे, जो बार बंदूकिचा,
लागो कीं न कुणाप्रती करु इजा, होवो न तोटा तिचा,
ते ते अंतर पाडतील अवघे, आह्मांमधीं निश्चित,
लग्नाचा मुळिं हेतु जाइल वृथा, हें मी करीं भाकित."५४.

सुतास वदला पिता, करुनि कोप, सत्यध्वजः—
"अरे बटु-विचार हे; पडति कामिं ना ते त्यज.
मुला! वळखशी न तूं परम गूढ हें स्त्रीजन;
जगीं फिरुन पाहशी तरित्र पालटे त्वन्मन. ५५

असेचि नर पारधी, सुचिर नारि त्या पारध;
जगा वळखिनी पुरे, सकल बोलती ते बुध.
रुपा भुलुनियां स्त्रिच्या नर तिची करी पारध,
त्वचे भुलुन पारधी करि जसा मृगाचा वध. ५६

अरे या स्त्रिया शूर वीरां पुजीती,
बळा बाहुच्या जे तयां दाखवीती;
नसे जें स्त्रियांअंगिं तें शौर्य दावी
असे तो स्त्रियां वंद्य धीर स्वभावी. ५७

### दिंडी.

काय वाघिण वा सर्प कुण्याकाळीं
कोटियाच्या धरुं पकडुं येत जाळीं?
प्रेमपायीं का इंदिरा वळे ती ?
जिंकियेल्याविण न लागेचि हातीं."५८.

## श्लोक.

बोले राजकुमार तैं स्वपितराः—"स्त्री जातिच्या पारख्या !
सांगें तात मला जगीं असति का साऱ्या स्त्रिया सारख्या ?
पुष्पांमाजि जशीं गुलाब बकुली जाई जुई मोगरी,
चंपा जास्वन पारिजातक, तशा होती स्त्रियांच्या परी. ६२

कोणी शीतल शांतशा मधुमुखी अत्यंत सुप्रेमळ,
शब्दें आचरणें जनां सुखविती, चित्तीं सदा निर्मळ.
कोणी केवळ भांडखोर, बसतीं भांडोन कोनाफटी;
कोणी लाविति शीघ्रकोपि जिकडे जाती तिथें आगटी.

कोणा संगर आवडे, रणिं पडे जो, शत्रु जो पाडितो,
दावोनी निजशक्ति त्या भुजबळें मृत्यूपथें धाडितो.
कोणा आवडती गृहें; कुणि तिथें बालांमुलांभीतरीं,
आनंदें रमती; अशा असति हो नाना स्त्रियांच्या परी. ६१.

न का युद्धालागीं प्रबल दिसते राजतनया!
असे अंगीं तीच्या बल निकरिं जें ये समुदया.
महा शौर्याच्या ती सकल मनुजां लाजवितसे;
हरी शोभे अद्री नखिं उचलितां, ही तशि दिसे. ६२

पहा इंदिरेची कृती काय मोठी !
जणूं सूटिला शेष घेई स्वपाठीं !
करा हा मनीं अल्प ताता विचार
कसें स्त्रीप्रती दुःख देतों अपार. ६३.

कसे वागवीतों स्त्रियां दुष्टरीती !
नसे कोणि शास्ता, जिवानें न भीती;

नसे बोलणें इंदिरेचें खरें का!
न का नारि त्या मारिती सर्व हाका! ६४.

न का स्तुत्य हेतू असे या सतीचा!
न का तथ्य जाणे तिची सत्य वाचा?
अहो वागवीतां स्त्रियां योग्य रीती,
तरी मागणें आज का हें करी ती!" ६५.

गजेंद्र बोले "वदसी खरें तूं.
असे कुमारी-मनिं स्तुत्य हेतू.
असे तिची वाणि परी कठोर;
खरें तुझें वाक्य. सुयोग्य थोर. ६६.

किति तरि सुख होतें माझिया अंतराला!
तुज जरि वरिती ती, योग्य वीरास वाला,
वर निज मिळतीयां, इष्ट तूंतेंहि तैशी।
वधु तव अनुयायी प्राप्त होती सुवंशी. ६७.

अरे आलासी तूं अजि नृपवरा युद्ध करण्या,
मला नेवीलेसी, इथ नजर कैदेंत वसण्या,
तुझा आतां आला तनय परतोनी तुजकडे.
तया घेई राया; मम शिरिं न जें यावरि घडे. ६८

मजवरि उपकार भ्रातिया! थोर केला;
सतत नृपति! माझा मान तूं राखियेला;
कधिं मम अवमाना कोणच्याही प्रकारें,
करिं परकरिं केलें नाहिं राया तुवां रे! ६९.

पद. ( आला वनमाळी रात्रीं—या चालीवर. )

धाडीं माझ्यासंगें आतां, पुत्र नृपा आपला,
देतों त्यातें माझी कन्या, निश्चय मी पूर्ण केला॥धु॥
घेउनीयां जातों तेथें सांगातें मी त्याजला,
वीरभद्र जेथें आहे संगरास पातला;
वीरभद्र पाहूं काय, सांगतो यावेळीं मला,
त्याचाहि विचार घेऊं, जाणें पूर्ण इंदिरेला;
करोनी विचार आह्मी काढुं योग्य युक्तिला;
बंधु सांगे तैसें करणें, भाग पडे भगिनीला ॥ १ ॥
धाडीं माझ्या. ७०.

## दिंडी.

बंधुशब्दा ती नाहिं मोडणार.
असे बंधूवरि भगिनिप्रेम थोर.
बंधु सांगे तें भगिनिला प्रमाण.
बंधुकरितां अर्पील पंचप्राण. ७१

## साकी.

कमलाक्षा, शशिवदना, तुह्मिही आह्मांसंगें यावें.
पंचक आपण विचार करुंया आतां काय करावें.
कांहीं युक्ति सुचे । न जाणों वळवूं मन तीचें." ७२.

## श्लोक.

असें ह्मणुनि राजिया, धरि गजेंद्र हातीं निघे
सुमित्र; मग जावया निजसुताप्रती तो निघे.
" करा सफल कार्य, " हें शुभ वदोन सत्यध्वज,
शिरीं स्वतनयाचिया वरद हस्त ठेवी निज. ७३.

निघाले मार्गी तैं, जिथ तिथ दिसे रम्य वसुधा;
वसंताची शोभा सुखवि नयनांलागिं विविधा;
स्वसंतोषीं नाना गहुन फिरती पक्षि गगनीं;
तरूमाथीं गाना वसुन करिती मंजुळ स्वनीं. ७४

दिंडी.

रंग आकाशीं विकसले अनेक.
सुहृद रमविति मधुरवें एकमेक.
लता पुष्पें सुखविती जागजागीं.
चंद्रकेतुस ना चैन अंतरंगीं. ७५.

शांत भोंवति तें सर्व शोभताहे,
समर-चिंता तो मनीं तदा वाहे;
शस्त्र अस्त्रें ज्या भरुनि चित्तिं गेलीं
काय होई त्या सृष्टि विकसलेली? ७६.

अंधबधिरासम चालला असे तो.
मननिं गढलेला, चित्तिं एक हेतो,
केधिं संगरिं ती होइ यशप्राप्ती.
मिळे जाया कीं अंतिं मुक्तिगोप्ती. ७७.

श्लोक.

सामोरे इतक्यांत धांवत तिथे तैं स्वार ते पातले;
राया देखुन "तात ! तात !" विनयें हर्षस्वनीं गर्जले.
"राजन् हो विजयी!" "तुह्मां कुशल हो," राजा वदे त्यांजला
आला राय पुनः सुखी निजजनीं, आनंद तैं गाजला. ७८

तिघां मध्यभागीं उभा वीरभद्र.
जिथें जाइ तेथें करी सर्व भद्र;

महा बाहुदंडें सजे शूरमूर्त्ति.
रणिं गेहिं गाजे तयाची सुकीर्त्ति. ७९.

तिघे बंधु हे इंदिरेचे, सुवीर.
तिच्या कारणीं प्राण देण्या तयार.
विडा घेउनी इंदिरेच्या कृतीचा,
उभाला रणीं बंधुंचा वर्ग साचा. ८०

त्रिवर्गास एकीकडे नेउनीयां,
ह्मणे राय, "कां युद्ध तुह्मी कराया
इथे पातलां हो? कशा हे विचार
मनीं आणितां दुःख ये जैं अपार. ८१.

नको युद्ध हो तें महा शोककारी;
जिवा नाशि; पाडी जनां व्यर्थ हारीं;
नको जोडपें जोडण्या प्राणहानी.
विवाहास द्यावा बळी कां जनांनीं? ८२.

परिसुनि पितयाचे शब्द ते वीरभद्र
स्फुरत बहुत बोले, तापला जेविं रुद्रः—
"दडवुनि तुज ताता ठेवुनी आजकालीं
चमुसह नगराला वेष्टिलें दुःखशाली! ८३.

समरिं करिन त्यांचें योग्यसें पारिपत्य;
भगिनि-कृतिस द्यावी पुष्टि; हो हेतु स्तुत्य!
सकल भगिनि-वाणी सार्थ मातें गमे ती;
नरकरिं बहु दुःखें भोगिते नारि-जाती. ८४.

इथें आणोनीयां प्रबळ चमुलागीं, नृप करी
त्वरा संग्रामातें; यश न कधिं येणें तदुपरी.

मला भीती आहे, अजि कवण संग्राम करण्या?
कधीं कोणालागीं भगिनि मिळणें ही न वरण्या.८५.

स्वभावें कोपी ती, कठिण ह्मणुनी काढि वचना;
असे योग्या वाणी परम, असिया दुर्धर जनां;
नरांहातें का ना जागें अमित अन्याय घडती
स्त्रिया जैं शोकाच्या जलधिमधिं त्या पूर्ण बुडती?८६.

असे शपथ वाहिली भगिनिकार्य मी साधिन;
स्त्रिया असति बापड्या परकरीं सदा आधिन.
स्वयें करिन शासना जरि तयांस नाहीं कुणी.
स्वतंत्र करण्या स्त्रियां झटत इंदिरा सद्गुणी." ८७.

दिंडी.

वाणि ऐकुनि ही चंद्रकेतु कांहीं,
वीरभद्रातें बोललाच नाहीं.
तिघां भ्रात्यांहीं अर्थ काढियेला,
चंद्रकेतू कीं भयाभीत झाला. ८८.

श्लोक.

ह्मणे चंद्रकेतू मनीं, युद्धयोगें
कशा वैमनस्या दुणावे निजांगें;
तदा बोलला एक, त्या बंधुतूनी
पिळोनी मिशा, तोंडि "धिक् धिक्" वदोनी. ८९

जसा वेष केला तसें अंतरंग
असां वीर, दावा तरी तेंवि रंग.
अहो भ्याड कां जाहलां आज ऐसे ?
चला, शौर्य दावा, लढा शूर जैसे ! ९०.

जो कंकणें करिं धरी, ललनेपरी तो;
अंगीं तया कुठुन तो पुरुषार्थ येतो ?
स्त्रीवेष घेउन जयें तनु नीच केली
त्याची सुबुद्धि अवघी विलयास गेली. ९१.

परिसुनि वचना या तुच्छ ऐशा विचार,
खवळुन मनिं गेला चंद्रकेतू कुमार.
शशिवदन ह्मणाला योजुनी वाणि क्रुद्धः—
"समर करुं चला या, सिद्ध व्हा मल्लयुद्धा ! ९२.

सकल चमु कशाला पाहिजे कारणीं, या?
नरगणसमुहाचा तो नको नाश व्हाया.
जय नर प्रतिपक्षीं वेंचुनी स्वीयबुद्धी
करुन उलगडा हो टाकुंया मल्लयुद्धीं!" ९३.

## दिंडी.

चंद्रकेतूचा स्फुरे बाहुदंड
ह्मणेः—" प्रतिपक्षा जिंकिलें उदंड
तरी मिळणें ना हस्त इंदिरेचा
अंत एकाचितो पुढें व्हावयाचा. ९४.

## श्लोक.

परी हे हिणावोन जैं दाविताती
तरी इष्ट कीं दावुं या बाहुशक्ती.
जरी वस्त्र ल्यालों शरीरीं स्त्रियांचें,
तरी शौर्य का नष्ट झालें भुजांचें? ९५
असो कांहिं होवो, मिळो नामिळो ती
लढूं संगरीं मल्लयुद्धीं सनीती;

बळा दाखवूं नांव राखूं कुळाचें
पुढें इंदिरा पाहुं ती केविं नाचे". ९६.

दिंडी.

वीरभद्रें तें युक्ति काढियेली
ह्मणे:-" भगिनीतें लिहुन येचिकालीं
विदित करुं कीं, जें ठरे मल्लयुद्धीं
आचरावें तें पुढें शुद्ध बुद्धी". ९७.

असा झाला संकेत आपसांत
इंदिरेचा अनुमोदि हें न तात.
ह्मणे मारोनी हात तो कृपाळा:-
"बालबुद्धी ही शोभतेचि बाळां." ९८.

करिति उत्तर ना तदा कोणि राया;
चंद्रकेतू निजछावणीस जाया
उठे, तदनंतर सुमित्रसांगातें
मल्लयुद्धाचें कथाया पित्यातें. ९९.

पित्यासन्निध ठाकला दिव्यमूर्त्ति,
मल्लयुद्धाची कथिलि मानसार्त्ति.
वदे सत्यध्वजः-"एक बा सुपुत्रा
गोष्टि घडल्या रे येथ ही विचित्रा. १००,

हेर पाठविले तीन, तीनवेळां
परत आले; त्यां जुमानी न बाळा.
अशा स्त्रीचा उन्माद योग्यरीती
मोडियेला पाहिजे दिव्य हातीं. १०१.

## श्लोक.

गेला एक अधीं महा चतुरसा वा स्वार त्या स्त्रीपुरा,
द्वारासन्मुख ठाकला परि न त्या देई कुणी उत्तरा.
हाका मारुन दीर्घ, कोरड बहू आली तयाच्या मुखीं;
भेरी वाजवुनी बराच थकला, कोणी परी नोळखी.१०२

गेला जैं दुसरा, तयास धमकी देती स्त्रिया धीट त्या;
मुष्टीमोदक अर्पिले तिसरिया; त्याची मला ये दया.
पाहे सर्व असा प्रकार अपुल्या नेत्रांपुढें इंदिरा;
वार्त्ता ऐकुन धावया परि तयां जाऊं न दे मंदिरा".१०३.

रायातें कथिला तदा नृपसुतें तैं योजिला मार्ग जो.
ऐकोनी सुतवाक्य, तात खवळे; बोले:—"कुडी ही झिजो!
पुत्रा प्राप्ति तुला असे न वधुची झाली अरे जोंवरी,
जिंकोनी तुजलागिं ना दिलि, न तों दावीं मुखा भूवरी."

ह्मणाले रायाचे पुरुष दरबारीं; " नृपवरा !
धरा कां हा हेका फुकट तुह्मि जाण्यास समरा ?
बसा स्वस्थानीं हो, निघुनि रणि सर्दार सगळे,
स्वदेहानें अर्पूं! कुमरि कशि ती पाहुं नवळे !" १०५.

## साकी.

इतक्यामाजी राजबाळिचें पत्रक निजबंधूला,
उत्तर आलें युद्धाचा कीं निर्णय अंतीं झाला.
परिसा त्यापत्रीं । केवीं लिहि ती नृपपुत्रीः—१०६.

## श्लोक.

"भ्रात्या! पाहशि तूं कशी जगतिं या आहे स्त्रियांची स्थिती.
दाणी, आपटिनो, कुटी मुडिमुडिं, जाळी जित्या स्त्री, पती!

खोडावेडि पदीं करीं चढवितो अंधेरिंही कोंडितो !
योजोनी कटु दुष्ट रुष्ट वचनें स्त्रीकाळजा फोडितो. १०७.

पद. (चलसागर तुह्मि वीरशिरोमणी—या चालीवर)

स्त्रीजातीला पुरुष कसे हे, अत्रघे वागविती,
बंधोराया! ठावें तुजला, मुळिं त्यां नच भीती!॥ध्रु०॥
द्वारींच्या रे श्वानाहुनि त्यां तुच्छ नीच गणती,
बाळपणींच त्यां श्वशुरगृहाला निष्ठुर धाडीती.
पैशाकरितां वृद्ध अपंगा अर्भक वोपीती
स्वातंत्र्याला नष्ट करोनी गुलाम बनवीती!
दुर्दैवें पति मरण पावतां छिन्नाभिन्न करिती
इतुकें करुनी तृप्ति होइना! कोंडुन ठेवीती,
हालीं जाचीं कितीक मरती; अनाथ ज्या जगतीं,
सांगु कशाला दुःसह त्यांची होई काय गती॥१॥
स्त्रीजाला पुरुष॥ १०८.

श्लोक.

आले हे नटुनी इथें बुडविण्या माझी कृती कृत्रिमें;
ऐसे हो असती नितांत कपटी दुष्कर्मि माते गमे.
जी मी हे अति दिव्य व्याघ्र शमवीं, द्वारीं स्वयें पाळुनी,
ती का मी फसणार बालमतिला, पोरां तिघां देखुनी! १०९.

व्याघ्रां जिंकियलें, तयां करियलें संपूर्ण आज्ञांकित;
जिंकाया पुरुषां असे कठिण का, अज्ञान जे भासत?
स्त्रीवस्त्रें परिधान ते करुनियां आले तिघे मंदिरा;
झाला हेतु न पूर्ण; का रिति अशा हे जिंकिते इंदिरा? ११०.

दिंडी.

करी बंधो तूं पारिपत्य त्यांचें;
कार्य साधीं रे पीडिल्या स्त्रियांचें.
कींव कोणा ये? स्त्रियां कोण त्राता?
एक ईश्वर, कीं वीरभद्र भ्राता! १११.

श्लोक.

स्त्रियांची शोकार्ह स्थिति बघुनियां मीं उभविलें;
अशा ग्रामा येथें, तायिं किं निपजावें फळ भलें;
परी येथें आला सकल कृति विध्वंस करण्या,
असा राजद्रोही नृपच्युत मला याचि वरण्या. ११२.

दुःखी कामिनिंची स्थिती बघुनियां आली मला रे दया!
केला म्यां पहिलाच यत्न अवघ्या नारी सुधारावया;
आप्तांतें, स्वजनां, कुला, सकाळिकां सोडोनि आरंभिलें,
कृत्या या, परि साहलें न मनुजां, तें त्यासिं विध्वंसिलें!

पद. राग धनाश्री. ताल एका

क्षणभंगुर संसार या चालीवर

भ्रात्या! राखि स्त्रियांची लाज । राखि स्त्रि० ॥ ध्रु० ॥
वैभव स्त्रीचें जाय किं राही येइल कळुनी आज॥१॥भ्रात्या.
प्राणाहुति ही देऊं आह्मीं, रक्षाया स्त्रीकाज ॥२॥ भ्रा०
ज्ञाणूनी शत्रू, स्त्री-स्वातंत्र्या रक्षक तूंच विराज ॥ ३ ॥
भ्रात्या० ॥ ११४ ॥

श्लोक.

मातेचा रुधिरांश रे, तुजमधीं; पिंडांश तूं रे तिचा!
रक्षाया मजला, तुला जननिनें देहो दिला बंधुचा.

माझ्या तूं मनिंचा खरा उमजशी हेतू मुळापासुनी,
रक्षीं रे, मजला प्रिया, भगिनि ही गेली असे ऱ्हासुनी!११५

करीं शिक्षा बंधो, रणिं नृपसुतातें; विजयि हो !
नको तत्प्राणातें हरण करूं, तूं जाण परि हो.
तया दावीं कीं रे, समरिं लढुनी योग्यहि रिती,
स्त्रियांतें रक्षाया नर कितिक या लोकिं असती;११६

जयानें मत्प्राणा, जळ-तळिं झणी मारुन बुडी,
असे रक्षीयेलें, मम निजभुजीं वाहिलि कुडी,
तयाचा मी कैसी, हरण करवूं प्राण अबला ?
परी त्याची शिक्षा दिसत करणें भाग मजला.११७.

तूं मारशील तरि ते मरतील सारे,
हें कृत्य तूं कर, परी बहु रे विचारें;
मारूं नको, परि तयां करिं योग्य दंड;
हत्येविणें करित शासन ये उदंड. ११८.

साऱ्या स्त्रियांचें बळ कोटि खंडी;
येऊ तुझ्या रक्षक बाहु-दंडीं !
होऊन ये शीघ्र यशस्वि जा रे!
गाईल तूझीं जग कीर्त्ति सारें. ११९

जन्मोजन्मीं युवतिमुखिं रे नाम गाजेल तूझें;
कार्य स्त्रीचें बुडत, समुळीं एकटीचें न माझें.
रक्षीं त्यातें निजभुजबळें बंधुराया नरेंद्रा!
डंका वाजे जगिं तव, असे जों गती सूर्यचंद्रा.१२०.

बहुत ठेविं चौफेर चौकशी
पडशि नातरी बंधु तूं फशीं.

असति शत्रुचे हीतमागते
लपुन, ऐकतें, छात्रणींत ते. १२१.

गेली एक असे इथून अमुची स्त्री शत्रुच्या बाजुला;
टाकोनी निजकन्यका कळतना कोणाकडे कोमला.
रक्षूं अर्भक तें गुणीहि उपजो, लज्जीत माते करो.
स्वातंत्र्योन्नति-पंथ हा निवडिला या मुक्तिमार्गा धरो." १२२

ऐशियापरि लिही सति इंदिरा
चंद्रकेतुस वदे नृप सद्गिरा:—
"फार खोल असती कटु बोल हे
केविं उक्ति अशि ही पुरुषां सहे? १२३.

अहो वीरांची ही जननि गमतें, जन्मलि असे
नृपां शूरां धीरां अवनिं, कुशला पूर्णहि दिसे
जगा वाटे स्वैर, प्रखर वडवाग्नी किं अबला,
परि ज्ञाती मोठी परम विबुधा चित्तिं विमला! १२४.

स्वेच्छेनें कशि पाहिं ती, स्वपितरा, राया गजेंद्राप्रति
चातुर्यें निजबुद्धिच्याहि तुबळें, स्वाज्ञेमधीं राखिती!
पुत्रा! आजवरी कसें बघ तुला, नादीं तिणें लाविलें!
आहे दुर्घट जाणशी, परि मुला सर्वांसि वेडाविलें. १२५

जेव्हां स्त्री बघते, असे पुरुष कीं अंगीं मनीं दुर्बळ,
वर्चस्वा मिळवावया नकधिंही ती एक सोडी पळ.
जिंकोनी पुरुषाप्रती मिरविते सत्ता तयाचेवरी.
कांहीं होउ विचार, कार्य अपुलें, वाणी करी ही खरी. १२६

## दिंडी.

सत्य आहे परि नियम सृष्टिचा हा
शोभवावें त्या स्त्रियेनें स्वगेहा.
सौख्य नांदे तिथ पतिच्याचपायीं
विराजे तो नर शूर रणाठायीं.१२७.

हस्तिं त्याणें तरवार गाजवावी
शिवणकामा सुइ करिं तिणें धरावी;
ज्ञान दावावें, मसलती तयानें;
हृदयकोमलता, तेविं त्या स्त्रियेनें. १२८.

गृहा सांभाळुनि, करुनि पाचितान्न
पती सेवावा करुनि त्या प्रसन्न;
बाळ खांदे कटिं वाहुनी सतीनें
तया रक्षावें योग्यशा रितीनें. १२९

नरांहातीं अधिकार तो असावा;
धर्म आज्ञेचा तिनें आचरावा;
व्यर्थ घोंटाळा नाहिं तरी होई;
जगीं व्यत्यय व्यवहारिं नित्य येई. १३०

## श्लोक.

नसावी रे जाया सतत पतिला त्रासवि अशी;
कधीं शब्दें ताडी, निजपतिस पाडी कधिं फशीं;
न जी आनंदाचा मुळिं उगवुं दे अंकुर गृहीं
गृहा ऐशी भार्या करुनि बिघडावें न कुणिंही. १३१.

दिंडी.

नसे भ्रांती मज ऐशियेप्रकारी,
इंदिरेच्यासंबंधिं दुःखकारी;
जिंकि तिजला; ती कधिं तरी वळेल
अंतिं दीर्घ तुझा यत्न हा फळेल.१३२.

श्लोक.

गजा अश्वालागीं निजकरिं जसा स्वार धरुनी
स्वसामर्थ्यें घेई सकल पशुंची शक्ति हरुनी
तसा जिंकीं पुत्रा नृपकुमरिला युक्ति करुनी;
मुलें होतां जाई सकळ मद तीचा उतरुनी १३३.

अरे लग्न होतां कधीं पालटे तो
स्त्रियांचा स्वभाव, स्वयें शुद्ध होतो.
जयां बालकें पोटिं येती तयांतें
जगीं ज्ञान का चीज हें ज्ञात होतें. १३४.

नसे स्वल्प रे बालकां वाढवीणें
पुरे रे पुरे होइ तें मायजीणें.
विचारांत, कृत्यांत, तैसा स्वभावीं.
अरे फेर होतो, असें विश्व दावी."१३५.

अशा भाषणालागीं सत्यध्वजाचे
तिथें ऐकुनी चंद्रकेतू सुवाचे,
मनीं आपणाशीं पुसे पूर्ण रीती
'नको प्राण घेऊं' असें का ह्मणे ती! १३६.

स्मरण मग तयातें जाहलें त्या ध्वनीचें,
"जय तुज मिळतो रे; पंथिं ये दक्षिणेचे,

धननिवरि निजचित्तीं ठेवुनी पूर्ण श्रद्धा,
नृपसुत वधुलोभें चालला मल्लयुद्धा. १३७.

आर्या

दोघां मित्रांसंगें युद्धातें चंद्रकेतु तें आला
झाला सिद्ध लढाया, माराया कीं स्वयें मरायाला. १३८

स्त्रीवेषा घेउनियां गेले शुद्धीस राजकन्येच्या,
गेलें क्षत्रियकुळिचें शौर्य कि बळ काय बाहुचें त्यांच्या?

युद्धाची सामग्री वीरांच्या स्नायुंमाजि ती वसते.
या न्यायें त्या त्रिकुटें ठेकियले दंड दीर्घ अतुले ते. १४०

नरवारी बंदुक वा भाले बरच्या धनुष्यबाणातें,
या संगरिं तें त्यजिलें, साधाया भुजबळें स्वकार्यातें. १४१

ठेले तीन जसे इथ, तेथें तैसेच तीनही ठेले;
संगर आरंभियला द्वयपक्षी सैन्य पाहतें झालें. १४२.

पद. राग परज. ताल त्रिवट.

(वारिवे मोहाणा बेडा पार —या चालीवर.)

ठाकले युद्धाला शूर वीर। ते रणधीर ॥
प्रबळ दिव्य देहीं. ॥ ध्रु० ॥
समरीं स्त्रियांचे वैरी सर्व पडावे
बाहु स्फुरे तैं इंदिरेचा ही ॥ १ ॥ ठाकले.
मनिं वाटलें जावोनी रंगभूमीतें
जिंकोन यावें हर्षवावी मही ॥ २ ॥ ठाकले १४३.

श्लोक.

भिडे चंद्रकेतूस जैं वीरभद्र
मुखीं त्या द्वयाच्या चढे रंग रुद्र;
भुजीं दंडिं जंघीं पदीं एकमेकां
धराया करीती सुयुक्त्या अनेका. १४४.

परी वीर मोठे! न कोणी कुणाला
अणू आटपे वा न पावे श्रमाला.
पिळाचेवरी पीळ मारोन वीर
बळा स्नायुंच्या दाविती ते अघोर. १४५.

साकी.

कमलाक्षाला पाडियलें तिथ त्याच्या प्रतिस्पर्ध्यानें;
शशिवदनाची तीच दशाही झाली तिथ युद्धानें;
आतां एकचि तो। नृपसुत समरंगाणें लढतो. १४६.

श्लोक.

पाहे युद्ध समीप ती उभि महा शौर्य-प्रभा इंदिरा;
वाटे राजसुता मनांत कुमरी ही लाजवीते नरां.
"प्रेक्षी शांत मनें कशी सकळिकां आहे किती धीट ही;
दावूंया हिजला रणीं कशि नरां ये पालथीतां मही."

दिंडी.

असें बोलुन, धरि वीरभद्र-दंड;
पीळ मारी मग त्यास तो प्रचंड;
तदा तेणें तनु पिळुनि कुशळ पेंचें
अंग काढियलें झडकरी स्वताचें. १४८.

चंद्रकेतू मनिं आपणासि बोले
जधीं लढतां तत्स्नायु ढील झाले:—
"गजेंद्राचा त्या धाकुट्या नराचा
पुत्र आहे हा काय वीर साचा ? १४९.

तरी वाटे मनुजांत मातृअंश
अधिक असतो जधिं वाढतोचि वंश.
काय पितयाची मूर्त्ति वामनाची !
असे त्याचा का दिव्य पुत्र हाची !" १५०.

**साक्या.**

उजव्या डाव्या पिळपेंचांतें मारुनि उभय नरांनीं,
परस्परांतें जर्जर केलें, लढतां आली ग्लानी.
झाले विव्हळ ते | स्वमनीं ह्मणती का घडतें. १५१.

इतुक्यामाजी चंद्रकेतुला वीरभद्र पिळ मारी.
फेंकुन देई धरातळवरीं बाहू-अस्थि विदारी.
पडला वीर रणीं | घातें थरथरली धरणी. १५२.

हर्ष जाहला स्त्रीमंडळिं तैं, गर्जे जयजयकार
धरणीवरती नृपसुत पडला मेळविलें यश थोर;
ह्मणती जिंकीलें | खासें शासन अजि झालें. १५३.

सत्यध्वज निजपुत्रा पाहुनि, धरणीवर पडलेला,
कंपित होवुनि समरंगणिं तो सरसावुनियां गेला
वदनीं "हाय" ह्मणे ! "आतां जगतीं काय जिणें! १५४.

पुत्र रणामधिं पडला, वैभव आतां सारें गेलें,
चंद्रकेतु कुलदीपक गेला, कृष्णवदन मम झालें !
आतां कैंचि स्नुषा | प्रभु हे झाली काय दशा! १५५.

काय करूं अजि राज्यपदाला, धिग धिग मम जिवितालाः.
बाळा ! पुत्रा ! कशालागीं हा संगर दुर्धर केला !
आतां कोण वरी | बहु इच्छित ही तव नवरी?"१५६.

श्लोक.

येतां भूमीठायिं तद्दिव्य अंग
आली मूर्च्छा कीं घडे मृत्युसंग;
राहीयेलें भान नाहीं जगाचें
गेलें वाटे श्रेय साऱ्या श्रमांचें. १५७.

पांचवा सर्ग समाप्त.

# सख्य नामक सर्ग साहवा.

श्लोक.

सत्यध्वजें पाहुन पुत्रकाया
मूर्च्छावलेली रणभूमिठायां
वांकोन न्याळी परि भान नाहीं
चांपीत जैसा नयनान्ध राही ! १.

पितयाचिये ना मुखिं जीव जीवीं
सुतनासिकाग्रीं निजहस्त ठेवी.
कमलापरी जो विकसीत होता
पडलाअसे तो गलितांग आतां ! २.

म्हणेः–" पुत्रा ऐशी कधिं कुणी अरे काय करिती
वधूची संप्राप्ती? सुगम नगमे ही मज रिती.
वधूच्या प्राप्त्यर्थ प्रखर तुज संग्राम घडला;
सुवर्णाच्या अद्रीसम तव तथें देह पडला ३.

पडावें या तूझ्या विकल तनुपाशीं मनिं असे;
स्वहत्ये जाणूनी दुरित परि मी आचरुं कसें?
न साहे त्वद्‌मृत्यू परि बहु असें भीत दुरिता.
बहू गेलें आयू; करि मज अतां देव धरिता. ४.

कमलजा मग ये सरसावुनी
नृपतिच्या तनुकंपित मागुनी,
सुतनुजा निज अर्भक मंजुळा
परत मेळविण्या अपुल्या कुळा. ५.

मंदिरामधुनियां सकळा परी,
इंदिरा बघुन हर्षलि अंतरीं;
लग्नवाद अजि ना मुळिं राहिले
पारिपत्य कुंवराप्रति जाहलें. ६.

## दिंडी.

कडे घेउनियां, कमलजा-सुतेला
स्थानिं राहे उभि उच्च चाहशीला
काढियेला ध्वनि जो कीं गगनपंथीं
भेदि अंबर, वसुधरा, कर्णग्रंथी. ७.

पद. (गडेहो कृष्ण गडी—या चालीवर.)

"रिपुचा नाश भला झाला। स्वयें तो देहिं निमाला॥ध्रु०॥
पेरियलें स्त्रीमुक्ति-बिजाला अंकुर त्या आला ॥
रिपु तन्नाशा अवतरला घाली निष्ठुर वरि घाला ॥
अंतीं देहिं निमाला ॥ रिपुचा नाश भला झाला ॥ १ ॥ ८.
मुक्ति-वृक्ष हा स्त्रिया उभारिती जाती जमवीनी ॥
इतुक्यामाजी नर येती वृक्षा छेदुं पहाती
परि रिपु देहिं निमाला ॥ रिपुचा नाश० ॥ २ ॥ ९.

## श्लोक.

'स्त्रीरूपी हा तरु उपटुनी पाहिजे तेथ नेवूं;
भेदोनी त्या' पुरुष वदले, 'आपुल्याकामिं लावूं;
'जाळूं त्याचे करुनि तुकडे सर्पणालागिं कांहीं,
नौका होड्या गलबत बरें, बांधूं कैक त्यांहीं.' १०.

परी यत्न गेले फुका ते नरांचे
नरांच्या न आलें मुळीं कांहिं हातें,

करायास येतांच स्त्रीवृक्षघात
नरें मोडुनी घेतलासे स्वहात. ११.

असे मोडलें शस्त्रही हातिं त्यांच्या.
वसे अंगिं शक्ती अशी त्या स्त्रियांच्या.
अहो वृक्ष वाढेल हा थोर आतां.
चढू योग्यते उन्नतीकाल येतां. १२.

सुरंगें सुशोभा जशी ये वसंतीं.
स्थिती स्त्रीजगीं तेविं होईल अंतीं.
प्रभूची दया थोर; शत्रू निमाले.
हरायास आले स्वयें हारि गेले. १३.

जे युद्धीं अमले स्त्रियां सुखविण्या आले महा शूर ते,
ज्यांहीं संगरिं या मृता नगरिला केलें पुनः हो जितें,
या गुंफूं फुलहार रम्य सतिनों, घालू तयांच्या गळीं,
या होऊं पुजुनी तयां मनभरें, वीरांघ्रिंच्या हो धुळी.१४.

झालीसे अवघी कृती अपुलि ही आतां चिरायू खरी.
युद्धीं गौरविलें तिला; उपरि या ती कोण हो संहरी !
या आतां उचला, सुबंधु मम हे घायाळ जे जाहले;
नेवूं मंदिरिं या, तिथें निजवुं त्यां, जे संगरीं भागले. १५.

ज्यांहीं रक्षण आपुल्या नगरिचें केलें तयां गौरवूं.
दावूं पूर्ण कृतज्ञता निजकरें; त्यां लौकिका पोंचवूं.
न्हावूं या धुवुं चोळुं खाववुं तयां, स्त्रीसाठिं जे शीणले;
विश्वाच्या मुखिं रक्षक स्त्रिजनिंचे जातील हे गाइले."१६.

## साकी.

बोलुन ऐसें सती इंदिरा मंदिर सोडुन आली,
घेउन निजकरिं मंजुळि बाळा चाले ती गजचाली;
पाठीं येति स्त्रिया । शतशा पतितां उचलाया. १७.

कोणी उघडया, कोणी शाली पांघरलेल्या आल्या,
अनवाणी कुणि, जोडे पायीं, अस्ताव्यस्त निघाल्या;
"योध्यां उचलाया" । आपसां ह्मणती "हो! याया." १८.

चालति नारी कुरणांतुनि तें, नाजुक तत्पद रम्य
कुरण चारिवरि दिसती सुंदर, कृति ईशाचि अगम्य.
योद्धे उचलाया । शतशा निघती त्या बाया. १९.

## आर्या

हरिणांच्या कळपामधिं, हरिण शिरोमणि जसा उभा राहे.
शिरिंच्या शृंग-सुशोभे गगना दावित, दिगंतरा पाहे. २०

तैशी ही मृगनयना मृगसमुदायांत इंदिरा दिव्या,
शोभे प्रमुख विशाळा, येतां साह्या स्वबंधुच्या सेव्या. २१

कटिवरि मंजुळिबाळा घेउन बंधूसमीप उभि राहे.
प्रेक्षी बंधुमुखाला, घर्माचा लोट ज्या शिरीं वाहे. २२.

जिंकियलें वीरांला, भगिनीच्या शत्रुंला रणीं युद्धीं;
झाला विगलित परि तो, निजदेहाची नसे तया शुद्धी. २३

तुंबळ युद्ध महा हें, झालें दारुण, बहू असें विरळा;
हरला सत्यध्वजसुत, परि दावियलें तयें स्वबाहुबळा. २४

शशिवदनें कमलाक्षें निजसामोऱ्यां स्वबाहुदंडांचें,
दावियलें सामर्थ्य, प्राबल्य किती असेचि स्नायूंचें. २५,

जरि पडले थकुनि ते, चिरले चुरले, मनींहि चुरचुरले,
परि सामोऱ्यां जर्जर केलें कीं देहभान त्यां नुरलें. २६.

दिंडी.

तिघां ऐशां बंधूंस पाहुनी ती,
हस्त कुरवाळी तयांचे स्वहातीं;
वदलिः—"यांतें या मंदिरांत नेवूं;
धुवूं, चोळूं, घायांस तैल लावूं! २७.

श्लोक.

हे भ्राते अति दिव्य वीर सकळां मुक्तिप्रदाते स्त्रियां,
यांचे येथ पडूं कसे ? निजपुरीं त्यांतें चला नेवुंया !"
ऐसें बोलुन चालली सति, जिथें तो चंद्रकेतू पडे,
वृद्धचां तेथुन गोलि कीं कळतना, हें दैवयोगें घडे. २८.

सत्यध्वजें प्रेक्षुन इंदिरेला
पुत्राप्रियेसन्निध मौन डेला,
मुद्रा दिसे पुत्रमृतें उदास
कीं केसरी प्रेक्षि मृतार्भकास. २९.

पाहोनी गलितां विदारित भुजां तैं चंद्रकेतूचिया,
रक्तें माखियल्या मुखा, सुहृदयीं आली सतीच्या दया,
सुस्कारा तयिं टाकुनी सकरुणा रायाप्रती न्याहळी;
प्रेक्षूनी नृपतीस त्या गहिंवरे, होऊनि काळीनिळी. ३०

नृपतिची अशी पांडुरी स्थिती,
शरम पावली इंदिरा सती
वदलि,:—" रक्षिलें मज्जिवा जयें
अनुजहस्तिं का मृत्यु त्यास ये?" ३१.

## साक्या.

इतकें वदली याउपरी तो नृप निजसुतकंठींची,
नृपतनयेची प्रतिमा काढी, राखिलि बहु दिवसांची.
दावी नृपतनये । तें स्मृति निज मातेची ये. ३२.

स्मरण जाहलें बाळपणाचें आला हृदयीं उमाळा.
पाहुन नृपसुत पांडुरवदना गहिंवरली ती बाळा;
वाटे तिजलागीं । दिसते निजकृति विकलांगी ३३.

## श्लोक.

पश्चात्ताप तिच्या हृदीं उपजला का कर्म आरंभिलें
केलें काय मनीं किती अवतिलें, अंतीं कसें जाहलें,
येवोनी मनिं हे विचार तिचिया बैसे सुताच्या कुशीं
शोभे भास्करअस्तिं तो उगवतां शुभ्रांशु शोभे तशी. ३४

ठेवी अंगुलि राजपुत्रभृकुटीं न्याहाळि तन्नासिका;
बोले, "प्राण असे अहो, तनुमधीं राया भिऊं हो नका.
त्यांसंगतिं नेवुंया नृपवरा पुत्रास मन्मंदिरा!
हे मानुन पूर्ण या अवसरीं सेवील ही इंदिरा." ३५.

ला प्राण सुताचिये तनुमधीं हें ऐकुनी राजया,
जीव जिवीं, पुनः सकल तच्चिंता हि गेली लया.
लो स्तब्ध तटस्थ तीं उभयतां रोखून न्याहाळिती;
दोघें शोभति जेविं दीनरजनी सम्मेलनीं शोभती. ३६.

उषःसमयिं जेविं ती रजनि भानुला शोभवी,
तशीच तिनसांजची जशि रविप्रभा लोपवी.

स्वर्थे दिसुनि सुंदरा, तशि दिसे सती इंदिरा;
नकाहिं वदली मुखें अखिल कुंडलीं तद्गिरा.३७.

साक्या.

इतुक्यामाजी कमलजा सति, निजबाळेच्यापाशीं,
हळुहळु येउनि सस्मित जाई, धरण्या पुत्रि उराशीं.
धरणीं पडलेली | नभिंहुनि चांदणि जणुं आली.३८.

माते पाहुनि हात पाय ती प्रेमें नाचवि बाळा;
काढियला ध्वनि प्रेमळ बाळें; परिसुनि येइ उमाळा.
माता कळवळली; | घ्याया निजबाळी वळली.३९.

पाहुनि कृति ही सती इंदिरा हस्त तिचा झिडकारी.
बोलेः—"बाळी, तुझी नव्हे ती, माझिच दिव्य कुमारी.
देई मजला ती | नेदीं मी ही तवहातीं." ४०.

बाळक राहे उगें ऐकुनी, ध्वनि हा; कंपित झालें;
भा पसरूनी, माय ह्मणे मनिं, का संकट हें आलें!
लागे हाय जिवा | कैसा विरह हा साहवा! ४१.

श्लोक.

आली ग्लानि मुखास, घर्म अवघ्या अंगाप्रती तो सुटे;
देखोनी निज अर्भका जननिला पान्हा दुधाचा फुटे.
"देई गे!" वदली सती, "ममसुता, दे इंदिरे मंजुळा!"
एकोनी परि इंदिरा द्रवतना, वाणी अशी कोमळा.४२.

पद. ( सुधन्व्या मोह कसा पडला—या चालीवर. )
"अतिचतुरे तूं थोर उदारे, कैशी ना ह्मणशी ||ध्रु०|| नुतन कलिका माझी बाळी || नमिळे मजला पडुन कु-

पाळीं ॥ प्रसवल्यें अशि कोण्याकाळीं॥आपुली ह्मणवीं-
शी ॥ १ ॥ अतिचतुरे० ॥

पाडस माझें षण्मासांचें ॥ वळकावीशी द्रव्य कुणाचें? ॥
निर्दय होउन माय मुलीचें ॥ अंतर पाडीशी ॥२॥ अति
चतुरे तूं ॥

त्यागुनि आलें, बहु मी चुकलें ॥ ह्मणुनि काय मम र-
त्ना मुकलें? ॥ दुग्ध उरींचें नाहीं सुकलें ॥ तान्हलि दे
मजशीं ॥ ३ ॥ अति चतुरे०

असेल बाळा झालि भुकेली ॥ कैशी माझी बुद्धी गेली!॥
व्यर्थ अर्भका शिक्षा झाली ॥ पडलें हाय! फशीं ॥४॥
अतिचतुरे तूं०"॥ ४३.

### श्लोक.

ऐकुनी तिचें वचन प्रेमळ
इंदिरा स्वयें परमकोमळ,
पाहि रोखुनी कमलजेकडे
न्याळि मंजुळे धरणिं जी पडे. ४४.

स्तब्ध जाहली नशब्द बोलली;
चंद्रकेतुच्या जवळि ठाकली,
एकवार त्या बघितलें तिणें,
वेंचि जो तिच्याप्रति असें जिणें ४५.

### साकी.

इतुक्यामाजी शरीर ज्याचें होतें व्याकुळ झालें
शशिवदनानें इंदिरेचिया पायांतें धरियेलें,
जाई रांगत तो । विनयें तिजला विनवीतो. ४६.

### श्लोक.

पाहुनी तया गहिंवरे सती,
धाय लागले बघुन त्यांप्रती;
रूप ओळखी जवळि येत ती,
गीतगानिं जैं बिघडिली कृती. ४७.

### दिंडी.

तिला आठवला तदा तो प्रसंग,
जधिं गेला बिघडोन सर्व रंग.
मुखा अवलोकित उभी नार राहे.
शब्द वदला शशिवदन तैं तिला हे:-४८.

### पद. राग धनाश्री ताल त्रिवट.

( क्षणभंगुर संसार याचालीवर )

“ अंतर कां निष्ठुर करिशी । कां निष्ठुर करिशी ॥ध्रु०॥
प्रबल प्रतापी सुंदर वनिता,। विशाल जी दिसशी ॥ १ ॥
अंतर०
माता-ममता बलवत्तर हें । केवीं नाठविशी ॥२॥ अंतर.
समरीं आह्मां जिंकुनी अजि तूं विजयी गे होशी ॥ ३ ॥
अंतर०
त्वदंघ्रि गेलों दडपुनि आतां, व्हावें काय तुशीं ? ॥ ४॥
अंतर० ४९.

### पद. राग धनाश्री, ताल त्रिवट.

( क्षणभंगुर संसार या चालीवर. )

द्यावें बालक जननीला ॥ दयाळे ॥ ध्रु० ॥
कैशी होशिल धन्य ठेवुनी, अन्याची बाला? ॥१॥ द्यावें०

अंता आलें नाटक अमुचें, मित्र रणीं पडला॥२॥ यावें०
आतां पुनरपि चालिव अपुली स्त्रीवैभवलीला ॥ ३ ॥
यावें० ॥ ५० ॥

## श्लोक.

ऐकें भाकिन मी अजी करितसें, जाणून सान्या जगा,
स्त्रीलोकीं जन येउनी तवकरीं होऊ तयांची निगा,
स्त्रीप्रेमा तुझिया कृतीवरि जडे, वाटे मनीं पूर्ण या
अंती एकदिनीं तुला नकळतां जाईल सारें लया. ५१.

अन्यांयें जगतात तुच्छ करिशी, तें काय ना सूड घे ?
कालेंही कलहास मूळ कधिंना कांहीं इथें गे निघे.
झाला आपसिं एकदा कलह या स्त्री-मंडळामीतरीं,
होई सर्व जगीं पुरें हंसवणें ही सत्य गे वैखरी. ५२.

गेला मित्र रणीं पडोन हरला, झाला मृतप्राय तो !
भूशायीं पडला, न हें कळत कीं मेला असे वा जितो!
स्त्रीप्राप्त्यर्थ उपाय याउपरि ना होणार आतां सनी !
त्वद्भ्रातें हरिलें अज्ञांस, तरली तेणेंच तूझी कृती. ५३.

जी तूं लग्न करावयास नसशी राजी, तया तूजला,
बाळें गे खुटलीं कशा? करिशि का तूं घेउनी त्यांजला?
इच्छीशी मुलिं व्हावि ना तुज मुलें, कां घेशि अन्यांचिया?
कोठें तूं शिकलीस गे, पढविलें कोणी तुला या नया?५४.

नाहीं तुझें जें, वळकाविशी कां ?
कां त्रास देशी उगि दीन लोकां ?
कां नाडशी गांजशि गांजल्यांतें?
कां मेलियां मारिशि दुष्ट घातें? ५५.

जरी अंगीं आहे, हृदयिं तुझिया नाहित दया,
असे अंश स्त्रीचा तव तनुमधीं गे तरिच या–
प्रसंगीं देई तूं नलिनिकलि बाला कमलजे;
कशा टेवीशी तें, जननिपरि तद्वालक सजे. ५६.

तुझी माता जाता, तुजशिं निजपुत्रीसम जिगें,
असे रक्षीयेलें निजशिरिं न हें योग्य करणें.
तरी देई कन्या निजशिं तिचि आतां गुणवते!
तुला लज्जा वाटे तरि मजशिं दे, देइन तितें." ५७.

असें ऐकुनी शब्द धिःकारयुक्त
चढे राजपुत्री-मुखीं नेत्रिं रक्त;
परी कोप तीचा क्षणांतीं निमाला
उदेतांचि कीं सूर्य अस्तास गेला. ५८.

मुखा पाहुनी मंजुळेच्या सती ती
द्रवे चित्तिं, त्या वत्सले घेई हातीं;
ह्मणे:–"बाल माझें जरी बोलवीलें
तरी आजि त्या त्यागणें भाग आलें! ५९.

जाशी तूं जननी-करीं, शुभ असो, गे राजसे तूजला!
जाशी या नगरास टाकुन जरी लावोनि माया मला,
होवो माय तुला तुझी सुखकरी, तुझ्या पडो भाजणी
जी माझी नाचि जाहली, फसविलें संपूर्ण सत्कारणीं! ६०

रक्षो ईश तुला सदा, सकळिकां जो सौख्य दे मानवां,
बाधा होवु तुला न त्या नरकरीं, जे नाडती स्त्रीभवा.
जा, वत्सा, जिवडया, प्रिया, चिमकुल्या! दीर्घायु जा होइंगे!
चित्तीं ठेविन मी तुझें स्वरुप गे, जों प्राण माझा जगे. ६१

शशिवदनि वेल्हाळे, बाळे, कशी तुज अंतरें!
" नलिनिकलिके आतां, जातां, कसें मज गे सरे !
गुरुभगिनि या नामें प्रेमें, तुला अजि पाळिलें;
पडशि आजि तूं, मातेहातें; फुका तुज रक्षिलें!" ६२

साकी.

गहिंवरुनी मुख मंजुळिचें मग नृपतनया कुरवाळी;
"जा" वदली, "सुखि होई वत्से!" "द्या देनें ही बाळी !"
"देवा रक्षावें । हिजवरि कृपा कवच घालावें"!६३.

श्लोक.

असें बोलोनी ती, शशिकरिं तदा देइ कुमरी;
तयें ठेवियेली, करिं शशिकलेच्या तदुपरी.
धरी माता हातीं, शशिवदन वीरा प्रणत ती;
मिळाली कन्या जी, परममता, न्याहाळि सती. ६४

बहु कळवळली ती अश्रु सानंद आले;
वळवळ पुरि झाली, इष्ट तें प्राप्त झालें.
हरणुलि हरिणीला सांडलेली मिळाली.
कवळुनि उरिं धेली, नान्हली चुंबियेली. ६५.

चुंबुनी स्मित अशा अधरा, मुखा,
पावली कमलजा अतुला सुखा.
खेळवून कुमरी अशिये रितीं
इंदिरेप्रति वदे मग नम्र तीः—६६.

"होतों मैत्रिणि गे; अतां परतुनी जातें स्वधामाप्रती;
नाहीं या वदना तुला पुनरपी मी दावण्या इच्छिती.

नाहीं योग्य तुझ्या कुटीस अशि कीं, त्वन्मंदिरीं मी वसें;
माझ्यास्थानिं दुजीस योजुन, करीं भावे तुला गे तसें. ६७

जातें गे; गतगोष्टिला विसरुनी मातें क्षमा तूं करीं
बोलें गोड सुशब्द एक, तुजला आहे ग मातिपरी.
रक्षीलें तुजला बहुत वरुषें, ज्ञानामृता पाजिलें,
आधीं या अतिउत्तमा पथिं, तुझ्या वृत्तीस म्यां योजिलें." ६८

इंदिरा तिला "हूं" न बोलली,
मंजुळेकडे दृष्टि लाविली.
वीरभद्र तें क्रुद्ध जाहला;
सिंहनादिं तो शूर बोलला:—६९.

"कठिणहृदया होशी कैशी स्वजातिशिं इंदिरे!
बहुत पुरुषां देशी दोष स्वजातिसमुद्धरे!
करुनि भगिनी! ऐशी शोभा नको कुल लाजवूं.
विनवि, निववीं क्षोभा साऱ्या नको जन गांजवूं! ७०

येवो, गे! करुणा तुला परिसुनी सप्रेम बंधूवचें.
शोभे जाड्य न हें तुझ्या सुहृदया, साजे वराहत्वचे.
ये, हातीं कर घे शिवा, भगिनि! या सप्रेम चुंबीं मुखा.
बाल्यापासुन वाढवोन तुजला जें पाववीलें सुखा. ७१.

नयनिं बघ तिच्या हे अश्रु येती अपार
सलत हृदय माझें पाहुनी दुःख थोर.
भगिनि! विनवि तूझा बंधु, योद्धा तुला गे
बघवत करुणा ना ही मुलीं कोमलांगे!" ७२.

परि न इंदिरा शब्द बोलली
क्षिति न्यहाळिती स्तब्ध राहिली.

बहु पित्यास ये कोप तें तिच्या
वदतसे तिला क्रुद्ध या वचाः—७३.

"आहें मी, मज वाटतें, परिसलें रक्तीं असे लोड तें;
वाणी भासत सत्य ही; प्रतिति मत्कन्या स्वयें दावितें;
नाहीं शब्द नकार एकहि मुखीं! कोठून काठिण्य हें
येई गे, हृदयांत पुत्रि तुझिया? कैसें तुला हें सहे? ७४.

पिंडापासुनि या तुला नजडली प्रवृत्ति ही दारुण.
वा नाहीं तव आइच्या तनुतुनी हा लाधला दुर्गुण.
साध्वी सज्जन ती दयामय पुरी, संतांमधीं आगळी,
बोले नित्य, दया तुझ्यांत वसते, जैशी असे स्वत्कुळीं. ७५.

परी सांगे नित्य, प्रकृति तुझि तीव्रा दिसत ती;
असावी कोणाची वरचस तरी तूजवरती.
असें बोलियेली, तव जननि ती अंतसमयीं;
कळों आलें साचें तवगुण अजी येत उदयीं. ७६.

जननि अंतरतां तुजला दिलें
शशिकलाकरिं; साध्विस योजिलें
निवडुनी तिजला सति योग्यशी;
विघडशी तिजपायिं मुली, अशी! ७७,

काय बोलत एक न शब्द का!
बोललों अजि का इतुकें फुका?
कारणीं वध तुझ्या पडले किती!
वीर व्याकुळ मूर्च्छित हे क्षितीं. ७८.

अशासाठीं का गे, तुज नगरि आरंभि दिधली?
सुखाची होती त्यां जिथ घडिपळें घालवियलीं;

जिथें आनंदानें रमुन, रमवोनी निजजनां,
सदा संतोषीलें कारिशि तिथ का निष्ठुर मना? ७९.

दिंडी.

बोल तिजशीं तूं बोल सांगतों गे
ड्र्यें बाळपणीं खेळलीत संगें;
जित्राकंटाची प्रिया काळजाची,
कशी अव्हेरिशि? हृदय का न जाची? ८०.

शोभतें का तुज, कीं तुझ्या कुळाला?
किती माजविशी आपल्या खुळाला?
काय वैभव शोभेल कृतीनें या?
प्रसवली गे, तुज व्यर्थ माझि जाया? ८१.

श्लोक.

धिःकार पाषाणहृदे! तुला गे
अद्यापि उन्माद शिरांत जागे!
ये शब्द ना एक मुखीं तुझ्या तो
माझा किती हा अपमान होतो!"८२.

परि न शब्द मुखांतुनि इंदिरा
मुळिंच काढि, न देतहि उत्तरा.
बहुत लाज तिला मनिं वाटली;
वदलि ना परि अंतरिं दाटली. ८३.

साकी.

सत्यध्वज तिज बोलेः—"साध्वी जाणुन कोमल तूतें,
रुकार दिधला न्यावें पुत्रा उपचारा तत्रहातें.
वाटे परि चुकलों | असतों पुत्रातें मुकलों! ८४.

## दिंडी.

जरि न अपुल्या तूं जातिच्या जिवाला
बघुन कळवळशी, दुःखि मैत्रिणीला
काय अन्याला ठाव गृहीं देशी ?
शिरीं वैऱ्याचा भार काय घेशी? ८५.

बघुन विपरीता सर्व या कृतीला
भीति वाटे बहु माझिया जिवाला,
औषधाचें तूं करोनियां मीष
पोटिं पुत्राच्या घालशील वीष. ८६.

नको नेऊं गे तुझ्या मंदिरातें!
घुविन चोळिन मम सुता मीच हातें;
करिन उपचारां यथाशक्ति पुत्रा
शिथिलता ह्या जरि असे आलि गात्रां. ८७.

## श्लोक.

परिसुनि अशि वाणी राय सत्यध्वजाची,
मृदु मनिं गहिंवरली इंदिरा पूर्ण साची;
द्रवुन हृदय गेलें, ऐशिया वाग्शरानीं;
उपजलि मनिं लज्जा, गांजली ती निदानीं. ८८.

वदलि कमलजेला:-"ये अगे सत्वरी तूं,
कवळुनि उरिं मातें गे धरीं; प्राणतंतू
तुटुन अजुन गेला नाहिं तों भेटुं ये गा
विकलित मम या गे लाव ये अंग अंगा. ८९.

बहुत मजसि वाटे लाज माझ्या कृतीची
विसरुन गत गोष्टी शांतता मन्मनाची

प्रियकरि करिं गे तूं, मागतें त्वत्क्षमा मी.
वसुं इथ उपरी या संगतीं जीर्ण धामीं. ९०.

साकी.

अपराध तुझा नाहीं; झाला प्रारंभीं माझाची;
स्त्रिया येउं कां दिलें जयांची सलगी होति नरांची
झाली दोघांना। शिक्षा, अंतरलें माना! ९१.

होतों तैशा मैत्रिणि होऊं,-झालों,-ये मन्माये!
झालें गेलें त्याची वार्त्ता पुनरपि मनिं या ना ये.
देवा! साक्षी तूं। रक्षीं निजमनिचा हेतू!" ९२.

श्लोक.

सत्यध्वजातें अनुलक्षुनी ती,
बोले, "महाराज! असे विनंती.
द्या पुत्र नेतें निजमंदिरातें
धुवोनि चोळीन तया स्वहातें. ९३.

पद (मणिबंधाच्या चालीवर)

नाशियलें मत्कार्याला। मत्तनुरक्षक परि झाला॥
हरिलें स्त्रीच्या मुक्तीला। परि तो वीर रणीं ठरला॥
व्याकुळ घायें बहु झाला। रक्षुं त्याच्या प्राणाला॥
प्राण न गेला लढतनां! देवें दिधलें दान जनां॥९४॥

## श्लोक.

आयुष्मन्! अपुल्या चिरंजिव सुतें हा प्राण संरक्षिला.
झाले हे उपकार तैं बुडवुनी टाकीयलें हो मला.
बोलूं याउपरी नको पुनरपी कीं मी कृतघ्ना असें;
साक्षी अंतरिं तो प्रदीप्त वसतो, बाह्यात् कशी ही दिसें.९५
या, हो या! नगरा तुह्मी अमुचिया; या इष्टमित्रांसवें;
नारी जातिल सर्व त्या निजगृहीं; त्यांहीं कशा राहवें?
मत्कृत्या तडी न्यावया अजि मुळीं संधी नसे योग्य ही
नित्याचा क्रम तोचि इष्ट दिसतो—स्त्रीनें स्वपात्रें गृहीं.९६
प्रार्थीं भूपति! मी तुझांस, वचना हो माझिया आयका;
ताता! हे मम बंधुनों, तुह्मि तरी या आळवा नायका.
कीं येवोनि तयाप्रती द्रव, मला देतलि नेऊं सुता.
साधा हो, मम कार्य कीं मजशिं तैं भिक्षा मिळे ईप्सिता."

नेत्रीं तिच्या अश्रु भरोन आले,
सत्यध्वजें उत्तर नाहिं केलें;
राहे उभा स्तब्ध अधोमुखी तो,
चित्तीं परी हर्षित थोर होतो. ९८

तदा शशि विनम्र तो कमलजेस बोलेः—"सती!
तुझा अनुज सुंदरी वसुधरे पडे, त्याप्रती
अगे सकळिकांसवें इथुनि न्यावया मंदिरा
दयार्द्र नृपकन्यका, विनवि तूं स्वयें इंदिरा. ९९.
तयाप्रतिहि लागले बहुत घाय या संगरीं;
तयांस उपचार गे कवण तूजवीणें करी?"
तदा वदलि इंदिराः—"कमलजे! तुझा बंधुही
चला नगरिं नेउं या, तुज कशास चिंता ग ही? १००

वीर संगरीं लढुन भागले
घाय ज्यांचिया तनुंस लागले
त्यांस मंदिरीं इथुन न्यावया
पातलें; चला सकल नेऊं या!" १०१.

परिसुनी अशिया वचनाप्रती
शशिकला करुनी मुख वक्र ती,
वदलिः—" का करिशी अजि इंदिरे!
स्वकृतिचें तुज भान कसें नुरे? १०२.

पद. जिल्हा झिंजोटी. ताल त्रिवट.

(सूर्यवंशीं चंद्रकेतू—या चालीवर.)

नियम करुनी तूंच कैशी, निजवचनातें मोडिशी!
बहुत वर्षें पढविलें जें, क्षणिं कसें तें विसरशी?
पुरुषजाती ओळखीतें, ह्मणुनी पथ हा तूजशीं,
दाविला त्यां परि गे कैशी अंतीं पडशी तूं फशीं." १०३

श्लोक.

धिक्कारवाणी परिसोन ऐशी
तें इंदिरा उत्तर दे न तीशीं.
गर्जोन बोले परि सिंहनादें
कीं अंतरिक्षीं घन शब्द कोंदेः—१०४.

जो जो मूर्च्छित येथ युद्धिं पडला, वा शत्रु वा मित्र हो
न्या सर्वां निजमंदिरा स्थिर मनें, मानूं नका भीति हो.
देई दोष मला जरी शशिकला, त्यागी मला ये घडी,
चिंता काय?-उठा चला, सकळिकां, न्या मंदिरा तातडी.

### साकी.

"जाकुनि जाई शशिकला अजि! एकटि वाहिन भार;
पुत्रेंकिं नेइन कार्य तडीला, नुरला जरि आधार.
परि हो नच आजी | घडि या यश ये स्त्रीकार्जी." १०६

### श्लोक.

संतप्त झाली बहु राजबाळी
आला झणी ताम्र सुरंग भाळीं
बंधू, पिता, शांतवि तो तियेला
सत्यध्वजें यत्न तदर्थ केला. १०७.

उचलुनि पडलेले सर्व घायाळ नेले;
जतन करुनि साऱ्यां मंदिरीं रक्षियेलें;
मिसळति नरनारी, भेद ना अंतरंगीं;
नगरि गजबजोनी गेलि ऐशा प्रसंगीं. १०८.

### दिंडी.

राजपुत्रा विस्तीर्ण खोलिमाजी
ठेवुनीयां इंदिरा तया पाजी
दिव्य औषधि जो भागला सुयुद्धीं,
रणीं पडल्याची ज्यास नसे शुद्धी. १०९.

सर्व घायाळां औषधोपचार
योग्यरीतीनें जाहला प्रकार.
तयें श्रमलेल्यां सौख्य फार झालें
इंदिरेला सत्कार्यश्रेय आलें. ११०.

साकी.

किनिक युवतिंचे सैन्यामाजी भाते आले होते;
एकमेकीं वळखुनि अपगा, चालति सुखि सांगातें
सौख्या पार नसे। भगिनी-प्रेम असेंचि असे! १११.

पद. जिल्हा झिंझोटी. ताल त्रिवट.

( सूर्यवंशीं चंद्रकेतू—या चालीवर. )

किनिक भगिनी बंधुसंगें, उपवनिं क्रिडे चालल्या,
बहुत दिवशीं भेट झाली, कडकडोनी भेटल्या
किनिक नारी आपुलाल्या गृहमार्गीतें लागल्या.
कांचनपुरिच्या ऐशा अंतीं चार वाटा जाहल्या ! ११२

सख्य नामक सर्ग सहावा समाप्त.

# संलग्न नामक सर्ग सातवा.

पद. राग सोहनी, ताल त्रिवट.

(ब्रह्मपुरें सुखरूप—या चालीवर.)

नगरीचा विध्वंस, | झाला नगरीचा विध्वंस ॥ ध्रु०॥
भगिनि-कृतीच्या नाशालागीं | शिरले जणुं नर-कंस ॥१॥
झाला नगरीचा !
प्रवेश आलें कांचनपुरिला | रङ्ग तरङ्ग अवतंस॥ २ ॥
झाला नगरीचा!
मनिं नर म्हणती योग्य अंत हा | होतें कार्य नृशंस॥३॥
झाला० ॥ १ ॥

## दिंडी.

रूप पालटलें सर्व मंदिराचें;
होइ पालन तेथ योग्य त्या नरांचें,
नारि सेविति सप्रेम आवडीनें
सौख्य घायाळां होतसे तयानें. १.

पूर्व उन्मादा अंत पूर्ण आला;
पुरुषनारींना संधि दिव्य झाला;
जेथ पुरुषांनीं नांव नाशियेलें
तयांलागीं उपचार तेथ झाले. २.

## श्लोक.

घायाळांच्यापाशिं बैसोन कोणी
गीतें गाती, पाजिती पेजपाणी;

शब्दें, बोलें, नम्रता सर्व नारी
दात्तोनीयां तोषवीती विहारीं. ४.

दिंडी.

चित्तिं झाली परि इंदिरा उदास.
कार्य गेलें समुळीं तिचें लयास.
बहुत लज्जित मनिं झालि फार खंती,
कृती आरंभिलि, घालविलि अंतीं. ५.

श्लोक.

आली ग्लानी; ना कुणासंगतीं ती
कांहीं बोले, ना करी काम हातीं.
बैसे जेथें, ऊर्ध्वदृष्टी करोनी,
तासांचे ती तास काढी बसोनी. ६.

दिंडी.

कधीं जाई उद्यानिं ती फिराया,
उषःकालीं, वा तीनसांजडायां.
तिचें अंतर परि रमेना विहारीं
वदे:—" पडलें मी, हाय कोणें हारीं! ७.

अंजनी गीत ( राग माढ—ताल एका )

झाली मत्कार्याची माती,
गेलें सारें पुरुषांहातीं;
पुनरपि होती तैशी स्थिती,
जाहली नारींची! ८.

जेथें विद्यालय स्थापीलें,
घायाळां तें स्थान जहालें;

आतां वैभव सारें गेलें,
बुडलों आम्हि नारि ! ९.

होवो होइल तें उत्कर्ष;
स्त्रीवृंदाचा परामर्श
घेतां, झाला पुरुषस्पर्श;
बुडलों आम्हि नारी ! १०.

पद. जिल्हा काफी ताल त्रिवट.

( जन हो तारक श्रीजगदीश्वर जाणुनी या चालीवर. )

अवघें स्त्रीजन-तारक कृत्य कसें हें। निमिषांत गेलें लया! ॥ ध्रु.॥
नरगण मिळुनी, स्त्रीराज्य छळुनी, विध्वंसियेलें तया!१॥
अवघें स्त्रीजन-तारक.
आयुष्यभर हा स्त्रीजन-देहो, दासत्विं वेंची वया ॥ २॥
अवघें स्त्रीजन-तारक०
कावाड वाही संसारडोहीं, परि ये न पुरुषा दया ॥३॥
अवघें स्त्रीजन-तारक०
उन्नती-मार्गाप्रत या स्त्रीवर्गा, आशा नुरे न्यावया ॥४॥
अवघें स्त्रीजन-तारक ११.

पद. जिल्हा झिंजोटी.

( अभाग्याच्या घरीं बाबा कामधेनु आली—या चालीवर. )

काय महा मम हातुनि ऐसें पातक तें घडलें
इच्छा मानिंची पूर्ण न झाली, सुकृत अंतरलें! ॥ ध्रु०
बीज पेरिलें म्यां फळ-वेळा जवळी ती येतां,
कीड लागली तेणें त्याचें पुष्पाचि ना फुललें;

लागुन जातां लतेस वाटे रम्य कळे कवळे,
झंझामारुत सुटोन सगळे तैसेची गळले! ॥ १ ॥
काय मला मम हातुनि ऐसें० ॥१२॥
ज्ञानपान जिथ व्हावें तेथें घायाळ आले,
विध्वंसुनि या नगरीलागीं मत्त वीर पडले!
झाला सारा घोटाळा हा, कार्य लया गेलें;
ऐशी फसलें समुळ, आतां कांहिं नसे उरलें! ॥ २ ॥
काय मला मम हातुनि ऐसें०॥ १३ ॥

पद. ( बहुत छळियलें नाथा—या गर्भाच्या चालीवर.)
एक मीं अवनिलें । दैवें अन्य घडविलें ॥ ध्रु०॥
स्थापियलें मुक्तीमार्गा म्यां । बिघडीलें दैवें
कार्या अबलासौख्या, समुळीं बुडतीला ॥
रे! कैसें निष्ठुर दैवा, वैभव स्त्रीचें नाशियलें ! ॥१॥
एक मीं अवनिलें १४.

पद ( अरसिक किति हा शेला—या चालीवर )
विपरीत समय हा आला ! । या मंदिरीं पुरुषप्रवेश
जहाला ॥ ध्रु०॥
ऐशा कर्म गतीला । काय ह्मणावें स्त्रीहीनतेला!
जो पथ मीं काढीयेला,। ज्याचीये वृद्ध्यर्थ बहुयत्न केला
निजग्राम मीं ज्यासाठीं त्यजिला, । दुर्लौकिक जगीं जर्यि
मिळवीला.
पुरुषां, जो ना रुचला । हरहर! कैसा तो अंतीं बुडला.
॥ १ ॥ विपरीत समय हा आला !" १५.

श्लोक.

ऐसा हा घडला प्रकार अवचा त्या मंदिराभीतरीं.
गेला काळ बहू मुळीं न उठला तो चंद्रकेतू परी.
रात्रंदीस पडे निचेष्ट; अमिता नारी उभया भोंवत्या
बाहू अस्थिविदारणें नृपसुता झाले बहू क्लेश त्या. १६.

साक्या.

कमलाक्षाला भगिनि कमलजा पाजी औषध पाणी
मधुकरि येउन निजसांगातें बोले मधुरा वाणी;
मंजुळ वचनांनीं । तोषवि प्रेमळशा गानीं. १७.

जिला पाहुनी सुख नेत्रांतें होइ सदा मनुजांच्या,
विशेष सुखवी सन्निध येतां समयीं ती दुःखाच्या;
साक्षात् संजिवनी । तत्पर वीरांच्या अवनीं. १८.

दिंडी.

तयासन्निध बैसोन मधुकरी ती,
रमवि कमलाक्षा बहुत गोड रीतीं;
कथा सांगे त्या पुराणांतरींच्या
तयें रूपा ती दावि स्वांतरांच्या. १९.

श्लोक.

असे नवल काय तें, वसुन एकटें तें हृय,
घडोघडि परस्परें वळखिती स्वचित्ताशय ?
समक्ष कमलाक्ष तो पडुनि क्लेश-शय्येवरी
स्वरूप वळखी तिचें, निज अपेक्षितो स्वांतरीं. २०.

### श्लोक.

मधुकरी-कर येपरि रक्षितो
परम कोमलसा कमलाक्ष तो;
विकृति-मुक्त झगी जधिं जाहला
त्यजिलि शेज हिंडूं फिरूं लागला. २१.

### साकया

ज्याकाळीं त्या शैलपायथ्यापाशीं अधिं घोटाळा
होउन नारि, तिरडुन गेल्या अवध्या त्या वेल्हाळा
शशिकला वदली | वाणी मिथ्या ती ठरली. ॥२२॥

भाकित केलें तिणें असें तें—येइल घडुनी साचें
लग्न तये निशिं शशिकलेशीं मार्गी शशिवदनाचें,
मिथ्या तें ठरलें | भाकित घडुनी ना आलें. २३.

मंजुळि माळा मिळवुन दिधली कमलजा मातेला
परि शशिवदना तिनें न वरिलें, वश झाली ना त्याला;
मिथ्या वच ठरलें | भाकित घडुनी ना आलें २४.

शशिवदना जरि कमलजेवा लागुन गेला ध्यास,
कमलजेला उमजुनि आलें परि लभली ना त्यास.
अंतरिं आवडला | परि तो नाहीं स्वीकरिला. २५.

तिला वाटलें स्वीकारितां त्या, पुनरपि लग्नाविधीचा
प्रसंग येउनि, कोप निश्चयें खवळे नृपतनयेचा;
ह्मणुनी शशिवदना | कमलजा झाली ती वश ना. २६

एके दिवशीं बसलि सती जैं सन्निध शशिवदनाच्या
औषधपाणी पाजुन सांगे गोष्टी रम्य परीच्या
बोले तो तिजला, | "साध्वी वरिं गे तूं मजला." २७

## दिंडी.

इंदिरेनें हे शब्द आयकीले;
आड होनी, कुणिं, तिज न पाहियेलें
कमलजेचें मुख इंदिरा न्यहाळी;
शब्द वदलीना, स्तब्ध परत गेली. २८.

कमलजेनें हा पाहिला प्रकार;
ह्मणें अंतरिं कीं चुके एक घोर;
हिची वृत्ती वळली दिसे त्रिवाहीं
नसे लग्ना उरला निषेध कांहीं. २९.

## श्लोक.

राग कालिंगडा ताल त्रिवट (धिमा)

इंदिरेप्रती पुनरपी अतां
चंद्रकेतुचा विनवितो पिता,
वीरभद्र तो अनुज ही दुजे,
तात ही तसा वदत आत्मजे:— ३०.

" कन्यके अगे समज तूं धरीं,
योग्य संधि ही, होई नोवरी;
योग्य वीर जो, पुत्र सद्गुणी
योग्य त्यापरी होइ तो धणी. ३१.

## साकी.

ऐशा सुंदर पुरुषाचा तूं कां करिशी अव्हेर ?
ना ह्मणशी गे उगा कासया, त्यागिशि कां संसार ?
चित्तीं मनन करीं । अझुनहि नृपपुत्रास वरीं." ३२.

ऐसें ह्मणतां निशिदिनिं तिजला, तिचिया चित्तिं विचार
लग्नाचे हळुहळू शिरुनि हृदिं झ.ला तत्संचार.
अंतर पालटलें । लग्नालागीं वश झालें. ३३.

पद. जिल्हा झिंजोटी ताल त्रिवट.

( सूर्यवंशी चंद्रकेतू—या चालीवर. )

इंदिरेच्या प्रेम अतीं, उद्भवलें अंतरीं;
चंद्रकेतूसन्निध बैसे, आवडीनें सुंदरी.
कुरवाळोनी हस्त त्याचे, गोंवी त्यां निजकरीं;
मंजुळ गाई प्रेमगीतिं; राजपुत्रा मोहरी. ३४.

साकी.

नृपतनयाला जरी परोपरि कुमरीनें रमवीलें,
चैन पडेना जिवा तयाच्या, क्लेशें त्या ग्रासीलें.
कासाविस होई । जगुंका प्राण घडित जाई ३५.

पद. राग धनाश्री, ताल एका.

( विश्वेश्वर प्रभु पतितोद्धरणा—या चालीवर.)

भग्नअस्थिवेदना भोगिल्या दुर्दैवें असतिल ज्यानें,
त्यासचि उमजुन येइल आजि किति, भोगियलें नृप-
तनयानें ॥ ध्रु०॥
तत्सान्निध नृपतनया बैसे कुरवाळित निजहस्तानें
भिरकावुन दे हस्त तियेचा, क्षणिं अपुल्या तो हृद-
या ने ॥ १ ॥ भग्नअ०
भान तयाला नुरलें कांहीं, विगलित झाला अंगानें
नयन असुनि तो अंध जहाला, ध्वनि ऐकेना कर्णानें॥२॥
भग्नअस्थिवेदना० ३६.

## श्लोक.

घडिमधिं तिजला तो "इंदिरे!" हांक मारी
"सुखकर! तरुणी गे!" ऐशिये तो प्रकारीं
वदुनि मुखिं जणूं कीं प्रेम दावी मनाचें
परि उमजुन ये कीं भान हें नाहिं साचें. ३७.

ह्मणे तिजशीं, "मत्प्रिये! हृदयरंजने राजसे!"
धरी स्वकरिं तत्करा परि न भान त्यातें असे.
करीं धरुनि अंगुली नृपकुमारिची प्रेक्षि तो
जशीं रमति बालकें रमत तेथ तो लोळतो. ३८.

ह्मणे कधिंकधीं तिला, "कठिण गे तुझें इंदिरे
असे हृदय तें किती! द्रवुन अद्रिही पाझरे
परी न तव मानसीं किमपि ही दया उद्भवे
कितीहि तुज आळवीं परि न चित्त तूझें द्रवे! ३९.

## पद. रागिणी बागेसरी, धिमा तिताल.

( प्रीति लागो तुझींच दृढतर पायीं—या चालीवर. )

काय ऐसा शुभांगे! धरिशी ग हेका ? ॥ध्रु०॥
नको नको ह्मणशी। कशा फुका त्यागिशी गृहींचें
सौख्य तूं. ॥१॥ काय ऐसा शुभांगे" ॥ ४०.

## श्लोक.

वाटे राजसुते, स्थितीस बघुनी, त्या चंद्रकेतूचिया,
कीं बुद्धिभ्रम होउनी सुकुळिचा पावेल भानु लया;
चित्तेमाजि अशा सती बसतसे, शय्येचियासंनिध,
रात्रीं ती अपरात्रिं ही भज करी, सप्रेम नानाविध. ४१.

अग्नीसन्निध ठेवितां वितळुनी जाई जसें तें घृत
शशायावसतां तशी सतत ती सत्यध्वजाच्या सुत
अंतीं ये द्रव तीजला, कळवळे पाषाणनह्रुद्गत,
पाहोनी तनयाचिया निशिदिनीं क्लेशांस शोकान्वित.४२

श्लोक.

राग मांढ, ताल त्रिवट.

सत्यध्वजाचें मुख पाहुनीयां,
चिंतातुराची उपजोन माया,
झाल्यां पित्याची उमजोन वृत्ती.
केला तिणें अल्प विचार चित्तीं:—४३.

"हे सांगती सर्व सभोंवतालीं,
तें सत्य भासे, शुभ सर्वकालीं;
पांचां मुखीं ईश्वर नित्य नांदे
ज्ञाना सदा उक्तिस कान या दे."४४.

बोले मनीं:—"हे जुगतात जोडे
क्रीडोन संगें, नरनारि कोडें
मोडूनियां प्राणि परस्परातें,
संपादिनीं इष्ट जगीं सुखातें." ४५.

साकी.

विवक्र ऐसा करुन इंदिरा गहिंवरली प्रेमानें.
म्हणे —"त्यजलें काय तयाला रक्षियलें जळिं ज्यानें?
अमरा मजसाठीं । सांवरीलें मज निजपाठीं!" ४६.

सोडुन ग्रामा मजलागीं जो धुंडत वरण्या आला,

लढला मत्प्राप्त्यर्थ वीर-नर, जर्जर रणिं तो झाला,
त्यातें अव्हेरूं। कोठें सौख्या मग पावूं! ४७.

पद. जिल्हा मांझ, ताल त्रिवट.

(छांयं मधुबनमें—या चालीवर.)

त्यानें झणवीन मी आपुला, प्रसंगीं जेणें रक्षीलें। त्यातें झणवीन मी. ॥ ध्रु० ॥
सरितालहरीमाजि पडोनियां। होतें बुडत जयीं। तेणें नज काढीलें ॥ त्यातें झणवीन मी ॥ १ ॥
कैशी आजवरी, माझिये अंतरीं। त्याची स्मृति भासली। कुतघ्न जहालें ॥ त्यातें झणवीन मी" ॥ २ ॥ ४८.

श्लोक.

इंदिरे मनीं ऐशिये परी,
खेद उद्भवे; निश्चया करी—
राजपुत्र कीं योग्य तो वर
देइं मी तया आपुला कर. ४९.

ज्या कोठरीमाजि पडे बिछाना,
भिंतीवरी, तेथ विचित्र नाना
होतीं सुरंगी बहु रम्य चित्रें
पोथ्यापुराणांतिल नारि-पात्रें. ५०.

दिंडी.

एक त्यांमधिं भिल्लीण पार्वतीचें
चित्र होतें, निलकंठ शंकराचें;
सत्व पतिचें ती हरावया आली
रूप पालटुनी तैं हिमाद्रि-बाली. ५१

## श्लोक.

प्रमिलार्जुनाचें तिथ चित्र दूजें,
पडद्यावरी रेखित दिव्य साजे;
प्रमिला जिनें अर्जुन जिंकियेला
वसवोनि राज्यास प्रताप केला. ५२.

## साकी.

त्या चित्रातें सती इंदिरा प्रेमानें न्याहाळी,
बहु गहिंवरुनी नयनांतुन ती ढळढळ अश्रू ढाळी;
नृपसुत-हस्तातें । घेउनि कुरवाळी त्यातें. ५३.
गहिंवरला तो राजपुत्रही पाहुन नृपतनयेला,
न्याहाळुनि तन्मुखा घडीभर, विव्हळ मानें बहु झाला
मानवि हृदयाचा । ऐसा चमत्कार साचा .५४.

जेविं पारिजातक उफलुनियां सुंदर सायंकाळीं,
चंद्रमुखाला अवलोकी तें बैसुनी आपुल्या ढाळीं,
अंगीं सुकुमार । शोभा दावी तें थोर. ५५.
तैसा नृपसुत निजशय्येवरि उफलत जणुं का पुष्प,
नृपतनया-मुखचंद्र न्याहळी, तेजोमय बहु रूप;
बोले नृपतनये । प्रेक्षुनि नृपसुत अति विनयें:—५६.

### पद. जिल्हा झिंजोटी, ताल त्रिवट.

( सूर्यवंशीं चंद्रकेतू—या चालीवर.)

" असशि साक्षात् सन्निध गे, का हे तूं मत्प्राणेश्वरी!
स्वप्नावस्था कीं ही आहे नकळे मजला सुंदरी !
होतिस जैशी पूर्वकालिं, तशि असशी तरि अंतरें
संसाराचें सौख्य मातें; प्राण जाई हा, नुरे. ५७.

## साकी.

कोमल परि तूं भाससि मजला पालटलें तव रूप
वरिलें ना, परि धरिलें करिं मज, रक्षियला तनुदीप
स्वप्नावस्था ही । केलिस कैशी ती पाहीं ! ५८.

स्वप्नावस्था पूर्ण करीं ही, तत्सुख मज भोगूं दे!
जीवनआशा नुरली आतां त्वत्करिं मरुं दे मोदें !
आला प्राण गळीं । देई चुंबन या वेळीं! " ५९.

## दिंडी.

वदत ऐसें सद्गदित कुंवर झाला;
कंठ दाटुन गहिंवरें पूर्ण गेला.
भान नुरलें, काळोखि नयनिं आली;
स्मृती नाहीं गति पुढें काय झाली. ६०.

एक राहीलें तयाचिये ध्यानीं,
वचन आटपतां इंदिरा उठोनी,
वांकुनीयां तन्मुखातें न्यहाळी,
चुंबि प्रेमभरें सती तया भाळीं ! ६१.

## पद. राग हमीर, ताल त्रिवट.

(कृष्ण गडी आपुला यमुना डोहिं बुडाला—या चालीवर.)

दोघांचा झाला । ऐसा संधी अजि झाला ॥ ध्रु०॥
गेला मनिंचा दुर्भाव सगळा, गर्व तिचा गळला॥
द्वेष नरांचा ऱ्हासुनि गेला, प्रेमा उद्भवला,
नृपतनयाला मित्र मानुनी । हृदयीं तो धरिला
स्त्रीकोमलता-प्रकाश पडला । नृपसुत वांचविला ॥१॥
ऐसा संधी अजि झाला. ६२

## साकी.

यापरी त्या नृपतनयाला गाढ सुनिद्रा लागे
बैसुन त्याच्या सन्निध सति ती नित्यापरि निथ जागे.
दोघां सुख झालें । अंतीं योग्य घडुनि आलें. ६३

एक रात्रिं जैं सुखनिद्रेंतुनि जागृत नृपसुत झाला
नेत्र उघडुनी पाहे तंव तो देखे निथ नृपबाला;
बसली सन्निध ती । होती पद्मावलि हातीं. ६४

कोमल शब्दें आपणासि ती पद्मावलितुनि गीतें
गात होति तीं परिसुनि झालें सुख बहु नृपतनयातें.
ऐका सति काई । गीतें मंजु स्वनिं गाईः—६५

पंजाबी ठुंबरी राग केसुरी, ताल त्रिवट
( गाहो जगपति—या चालीवर )

निद्रासुख घे अवघी अवनी;
तरुवल्लरि स्थिर आपुल्या स्थानीं. ॥ ध्रु० ॥
संतत चंचळ जलधितरंगीं
मीनि हि झांकिति नयन सुरंगी; ॥ १ ॥ निद्रासुख०
अशा प्रसंगीं खद्योतचि तो
तेज स्वरुपी जागृत राहतो ॥ २ ॥ निद्रासुख०
तद्वत् माझ्या रूप प्रियेचें
चमकत शोभे रम्य प्रतिचें ॥ ३ ॥ निद्रासुख० ६६

पद जिल्हा झिंजोटी, ताल त्रिवट.
( सुर्यवंशीं चंद्रकेतू—या चालीवर )

"गगनिं शोभे सायंकाळीं रम्य तारा-मंडळ,
तशि उदित तूं तारा माझी, बहु अंतरीं प्रेमळ.

उल्का पातीं जशि नभपंथीं निजमार्गातें दाखवी
मनन तैसें सुंदरि तूझें मच्चित्ताला दीपवी! ॥ ६७

साक्या.

"सायंसमयीं मावळताहे नलिनीकमल तडागीं
खद्योतांचे थवे जमुनियां चमकति जागोजागीं
ऐशा तूं काळीं । राहे जागृत वेल्हाळी ! ६८.

निद्रासुख हें घ्याया प्राणी निजगृहिं सारे जाती
परि गे राहें जागृत प्रियकरी ! तूं माझी सुखदाती !
मजला रमवाया, । बैसें सन्निध ये ठायां! ६९.

श्लोक.

"दिनकर बघ अस्तालागिं तो दिव्य जाई,
सुचिर कुमद डोहीं पाहिं तें धांव घेई;
ममहृदयसरोजीं तेविं येईं प्रिये गे !
कमलमुखि शुभांगे, कोमले, कोमलांगे! ७०.

नगशिरावरुनी सरिता जशी
उतरते, सखि तूं उतरें तशी
करित नृत्य कड्यां गडग्यांवरी !
तुझिच वाट बघीं इथ सुंदरी. ७१.

साकी

"पर्वतशिखरावरि राहुन तूं काय करिशि सुखशाली ?
ये गुंफेच्याठायिं विहारा, वासंतिक सुखकालीं !
अद्री सोडुनियां । येईं गे धरणीठायां ! ७२

हिम नगशिखरावरी नांदतें, शिथिल करी हृदयाला,
अन्य रीति परि धरणीवर; ती जागृत करि प्रेमाला;
प्रेमा नगशिखरीं । न कधीं नांदत अंतरीं. ७३.

अद्रीशिखरावरुनी येई विद्युत्चपला पायीं,
ऐकुन तूझें वर्णन जगतीं, आलों मी याठायीं,
येई ! तुजसंगें, । क्षणभरि चित्त तरी रंगे. ७४.

परस्परें तीं संगें रमल्या हृदयें जडुनी जाती;
अंतीं प्रेमा उद्भवुनीयां एकचित्त जन होती.
घडतां संधि असा । येई बल त्या प्रेमरसा. ७५

यास्तव येई, नांदें सन्निध; नांदुं दे तवसंगें !
सुखविन तुजला, आळवीन मी, भुलविन नानारंगें;
अंतीं जिंकिन मी । वरुनी नेइन निजधामीं ! ७६

श्लोक.

" सहस्र जेथें सरिता वहाती,
धरेंत्रि मंजु स्वनिं गाजवीती,
असे ध्वनी ये सति ऐकण्याला
नगाचिया सोडुनियां शिखाला. ७७.

पंजाबी ठुंबरी, राग केसुरी, ताल त्रिवट.

" शतशा लहरी नाचति जेथें
तुषारमय पय फेंकिति पंथें ॥ ध्रु० ॥
मंजुल कोकिलरव जिथ नांदे
ऐशा स्थळिं ये; सन्निध रमुं दे ॥१॥ शतशा". ७८.

श्लोक.

असें गाइलें गीत त्या इंदिरेनें;
हृदा होइ संतोष, मंजुस्वरानें;
तदा राजपुत्र स्वनेत्राप्रती तो
हंळु ऊघडोनी सती न्याहळीतो. ७९.

सनिमुख तथि त्याला वाटलें म्लानसें तें;
बहु गहिंवरली ! ना हाललीं नेत्रपातें.
वसुमति, अति लज्जा पावुनी, न्याहळी ती.
मनन करि असें कीं वागलें कोण रीती. ८०.

पद. जिल्हा झिंजोटी, ताल त्रिवट.

(सूर्यवंशीं चंद्रकेतू—या चालीवर.)

घडिमाजी चिंतेनें ती कोमल काया कोमली;
विगलितांगी लज्जाळूच्या वल्लरिसम ती जाहली.
पाहुनि ऐसें वदन तीचें, बहु अंतरिं जी गांजली,
विव्हळ झाला चंद्रकेतू, तन्मनिं करुणा चेतली. ८१.

साक्या.

पांडुरता सतिवदना आली कंपित झाले हस्त;
चमके नेत्रीं सौजन्य तिचें, जरि ती चिंताग्रस्त.
बोले अपणाशीं । "चुकलें, चुकलें, हाय कशी !८२.

गेला गेला लीनपणा मम अंगींचा तो सारा !
लीनपणाविण मत्कार्याचा, होता केविं पसारा?
आरंभीं ऐशी । चुकलें, चुकलें हाय कशी! ८३.

सुवर्णखाण खणाया गेलें, विकल अशा शस्त्रानें,

जलधिपयातें शोषायाला गेलें कीं वस्त्रानें;
आरंभीं ऐशी। चुकलें, चुकलें हाय कशी! ८४.

पद. रागिणी भैरवी, ता त्रिवट.

संतपदाची जोड—या चालीवर

आतां मी कर्माला। लावूं दोष कशाला ॥ ध्रु० ॥
घडुनी आलें हातिंच माझ्या। त्यागिलें
जिनयाला ॥ १ ॥ आतां मी कर्माला ॥ ८५ ॥

पद. राग परज ताल त्रिवट.

(तो नर गति चुकला—या चालीवर.)

परि मी काय करूं काय करूं।बा तुजला कैशि वरूं?॥ध्रु.
विचार केला खोटा। अंतीं फसलें झाला तोटा ॥ १ ॥
परि मी काय०
दिसशी शूर वीर मोठा। जाणें तव मनिंची उत्कंठा
॥ २ ॥ परि मी काय० ८६

श्लोक.

कशी रे या अर्पूं सकल मम देहास तुजला?
कशी जीवा देवूं, नरकिं रे सांग मजला?
असे जाती ज्यांची प्रतिकुल सदा स्त्रीजनसुखीं
घडे संधी त्यांशीं कवणपरि सांगें निजमुखीं? ८७.

पद. जिल्हा झिंझोटी, ताल त्रिवट.

( सुर्यवंशीं चंद्रकेतू—या चालीवर )

पुरुष किति हे दुष्ट रीती वागविताती स्त्रीजना!
एकपक्षी नियम त्यांचे, निर्दय असती भावना.

शौर्यधैर्यादिक गुण सारे समरांगणिं ते दाविती,
संसारींच्या मैत्रिणीला परि नानारितिं जाचिती! ८८

पद राागिणी भैरवी, ताल दिपचंदी.

शाकुंतलेशीं काश्यप सांगे
ऐशिये रीतीं सासरीं वागेः—
'पतिकोपीं नम्र असावें
सवतीशीं प्रेम धरावें.' *
परि तो न सांगे कां सवत असावी
पतिकोपवृष्टी कां तरी व्हावी!
कां न पतीनें विवेक करावा,
कां न स्त्री देखत कोप निवावा!
कोमल शीतल सुखदा सदा जी
देखोन कां जीव व्हावा न राजी!
एक-पत्नी-व्रत कां नाचरावें?
सोडून कां एक दुजिला धरावें?
पुरुषास कुणि हा अधिकार दिधला
कीं तो जगाचा धणि हा बनला?
दोन स्त्रियांशीं समप्रीतिनें तें
आचरण कैसें सम कधिं होतें?
आवडनावड दुःखद शिरती,
गृहिं सुखकंद तेणेंचि नुरती.
पुरुषांची ऐशी दुःसह करणी
वरण्याहुनी त्यां, पडावें मरणीं! ८९.

---

* किर्लोसकररून संगीत शाकुंतल पृष्ठ ७२ प्रथमावृत्ति.

पद त्याच चालीवर.

संसार स्त्री-सुख टाकून देती;
साधु असें कुणी ह्मणवून घेती!
साधुत्व काय स्त्रीसंगें मिळेना ?
गृहिं काय मन तें प्रभुशीं वळेना?
अंगाशीं भस्म लावून बसती,
गिरिगव्हरीं कुणि दिनरात वसती.
जाणतना परि गृहिं त्या स्त्रीयेचें,
होतसे भस्म, विरह न सोचे !
परि काय बोलेल बापडी जाया ?
सर्वस्वी आधिन सति पतिराया !
पतिराय ऐसें नाम अशांला
शोभे न कधिं तें; घ्यावें कशाला ? ९०

श्लोक.

न माझ्या हातें हें सकल युवतीकार्य घडलें,
जया आरंभीलें उपजत जरी तेंचि पडलें
नको जाणूं कीं जें युवति ह्मणती सर्व खुळ तें;
स्त्रियांची पाहोनी स्थिति मम बहू चित्त सलतें."९१.

ऐशी ती सति इंदिरा वदलि तें वाणी खरी शब्दशा.
स्त्रीलोकीं करिती, कुन्याय रचुनी मन्वादि ही दुर्दशा.
ज्ञानार्थी धरिली खरी; कुमरिनें शाळाहि संस्थापिली
उन्मादा वरिलें परी स्वकृति तें नाशाप्रती वाहिली.९२.

नरां न वरणें असा करि किमर्थ खोटा पण ?
पहा वरुन दुर्मदा निजमनाप्रती आपण

गुलाम करुनी ह्मणे मानिं ' स्वतंत्र आहें स्वयें. '
स्वतंत्र अशिये रिती कांधिं स्त्रियांस होतां नये. ९३

मानोनी नर पूर्ण दुष्ट अवघे तत्संगती सोडिली;
' संहारा पुरुषांचिया उपजली ' संज्ञा अशी जोडिली,
त्रुद्धीनें दुसऱ्यांचिया फसलि ती; झाली परां आधिन;
घोटाळ्यामधिं तें स्वयें पडुनियां पाडीयलें स्त्रीजन. ९४.

दिंडी.

परी आहे ती मानवचि प्राणी.
किती ही ती मानिं दुर्विचार आणी,
प्रेम हृदयीं तें मानावांविशींचें,
राहि जागृत, जें मूळ सत्सुखाचें. ९५.

साकी

अनुभव याचा पूर्ण पहा तो कैसा घडुनी आला
केला द्वेष जरी पुरुषांचा तरि वळली नृपबाला
दावी तत्परता । नृपसुत-भजनीं राजसुता. ९६.

जात्या कोमल अंतर होतें निःसंशय बाळीचें
परि चुकली ती शिकुनी लक्षण नाशक तें अन्यांचें
अंतीं वळली ती । काळें पालटली कुमती. ९७

समजहि नव्हता त्या बाळेला, केवळ तरुणवयी ती;
वाढत वुद्धीवर्द्धन झालें विचार उठले चित्तीं !
टावें निज झालें । भोळ्या भावें फसवीलें. ९८

अष्टौप्रहर तिथ बैसुन सेवानिं सन्निध नृपतनयाच्या,

सृष्टिचमत्कृति तिणें पाहिली; रूपातें जगताच्या;
बोले ' अजि कळलें । भोळ्या भावें मीं फसलें. ९९

करुनि घेतलें हास्य जगामधिं कधिं ऐसें ना झालें;
मज ऐशी स्त्री होणें नाहीं. सृष्टी जोंवरि चाले
धुंडल्या पृथिवीला । न मिळे कधिंही जोड मला.१००

पिपिलिका ती शोषिल सागर, होइल रविची रक्षा
अन्नपाणि जन टाकुन, घेतिल वडवाग्नी निजभक्षा
परि हो दुजि अबला । नुपजे कधिं ही जोड मला.

श्लोक.

ऐसें जें वदली तटस्थ भरले डोळे तिचे अश्रुंनीं
मुद्रा म्लान दिसे पडे निसटुनी पद्मावली हातुनी
गेली रात्र, तमास सूर्य लपवी तेजोमयी रश्मिनीं
पक्ष्यांच्या मधुगायनें वसुमती जाई भरोनी स्वनीं.१०२

उडुनि जावया तयिं सती निघे,
कर तिचा तदा निजकरांत घे;
फिरवुनी मुखा तिजकडे वदेः—
" कृति तुझी अहा किती ग ताप दे ! १०३.

नको आपणा तूं सती दोष देवूं;
नरातें हि तेवीं नको शब्द लावूं;
नसे कांहिं अन्याय गे त्या नराचा,
नसे तो नियंता न कर्ता जगाचा. १०४.

जगाच्या क्रमाला बहू काल झाला;
उपस्थीत झाला तसा होत आला;

स्वयें सृष्टि जैशा क्रमें नित्य चाले
तया न्यायमार्गेंच हें सर्व झालें. १०५.

जरी साध्वी तूं याउपरि मम होशील सुहृदा
महा निष्ठेनें त्वत्कुलिस अवश्या रक्षिन सदा
अगे संतोषें मी सकल युवत्युत्कर्ष-भवनीं
प्रतिज्ञेनें सांगें, श्रम करिन, संगें निशिदिनीं. १०६.

असे कार्य जें इंदिरे त्या नरांचें
नसे काय तें कार्य त्याही स्त्रियांचें ?
जसा पावतो तो पदा नीचउच्चा
तसा पालटी तो पदातें स्त्रियेच्या. १०७.

पद. (मणिबंधाच्या चालीवर.)

कशास ह्मणशी 'मीं न वरीं ?'
होई माझी गे नवरी. ॥ ध्रु०॥
निष्ठा ठेविन तुजवरती
घेईन कार्य तुझें हातीं ! ॥१॥ कशास.
स्त्रीकार्याला साधिन मी
स्त्री-पार्थिंच ये सुख धामीं. ॥२॥ कशास.
उत्कार्षातें जगताच्या
कारण असति स्त्रिया साच्या ॥३॥ कशास. १०८.

श्लोक.

नरांच्या गे नारी जगतिं असती मैत्रिणि सती !
नरांनारींलागीं अखिल भुवनीं एकचि गती.
असातें सांगातें दिनरजनिं त्यांहीं समसमा
अगे या देहाचा मज दिसतसे हाचि महिमा. १०९

स्त्रिया न जरि चांगल्या सकल होति साऱ्या स्त्रयें,
मुलें कशिं ग चांगलीं, उपजतील कोण्या नयें ?
असे ग जशि खाण ती, तशिच पोटिं माती वसे;
असे जननि सद्गुणी तरिहि बाल तैसें असे. ११०

जरी न जननी गुणी तशिच उच्च देहीं, मनीं,
कशीं सुगुणि लेंकुरें जनन पावती कोठुनी ?
जया कुळिं, घरीं मुलें उपजती, अधीं तेथुनी
गुणावगुण-अंकुर प्रगटती मुळापासुनी. १११

म्हणोनी स्त्रीतें,–जी अखिल मनुजां भावि जननी–
सुधारावें यत्नें सकल गुणिं तैशी तनिंमनीं
तरी होती बालें जननिसरशीं भूषण कुला.
नसे मातेअंगीं सुगुण तरी ये कोठुन मुला ! १११.

जशी ती असे तेवि होईल बाळ;–
सवें तें तिच्या घालवी सर्व काळ;
तिच्यापाशिं रांगे तिच्याहातिं खेळे
पडोनी कुशी तें तिच्या नित्य लोळे. ११२.

तिचें बोलणें चालणें बाल पाही,
जयीं माय खांदे कटीं त्यास वाही;
न दे शिक्षणाती तरी ही शिके तें
घडे जें बरें वा बुरें मायहातें. ११३.

असावी यासाठीं सकलगुणसंपन्न जननी,
मुलांच्या जी होई परमकुशला योग्य अवनीं.
कशी होई योग्य,–प्रतिकुल जरी सांप्रत रिती
असे स्त्रीस्वातंत्र्या ! सकल बुडल्या दास्यिं युवती.११४

अगे साध्वी ऐकें तुजशि वदुनी मुक्त करिन
तुझ्या स्वातंत्र्यातें कधिंहि न विरहीं बुडविन
नरांची गे बाधा तुज न कधिं होईल अणु ती
अजे स्त्री गांजाया कवण नर ! येईन झडती ! ११५

स्त्रियांच्या दास्याचें करिन निजयत्नांनिं हरण;
तुझ्या गे आनंदें करिन कृतिचें मी प्रसरण;
तुझ्यासांगातें मी झटुन अवघ्या योग्य पुरुषां
तुझ्या सत्कार्यार्थं भ्रमविन सहाय्या दशदिशां. ११६

नको एकाकी तूं श्रम परि करूं या दृढ पणें
जगाच्या हालांचा तिळहि तुज ना स्पर्श घडणें
तुझ्या सौख्यालागीं जगिं जंव जगें, लाविन मन
तुझ्या साह्या सारें करिन तुझिया आधिन धन. ११७

साकी.

दोघांठायीं असे योग्यता; आपण थोर कुळींचीं
दोघें संगतिं स्त्रीची सुधरूं स्थिति; दे तव कर याचीं
चढवूं उच्च पदा | जगता असती ज्या सुखदा. ११८

दिंडी.

कशासाठीं स्त्री नरा ऐशि व्हावी ?
तिणें कां गे नरकृती आचरावी ?
पुरुषसाम्यार्थी कां मनीं वहावी ?
नरांची गे कृति नरांनीं करावी ! ११९.

पुरुषनारी हीं आपुलिया देहीं,
तनमनाच्या घटनेंत भिन्न पाहीं

पिंड पुरुषांचा असे निर्मियेला
शौर्यधैर्याला, बळा दाविण्याला. १२०.

स्त्रियेनें गे परि गृहीं राहुनीयां
सिद्ध व्हावें गृहकार्य तें कराया.
प्रेम जागवुनी नरां सौख्य द्यावें;
नरां, ना तरि गे कुठें सौख्य व्हावें! १२१.

दादरा ठुंबरी. राग पिलू, ताल एका.

मोल्या मेरा जान रे—या चालीवर.

कोठें सौख्यालागीं गे त्याणें जावें सांगें गे
स्थान एकचि त्याला गे ॥ ध्रु० ॥
गृहींचें सुख तें ॥ वधू पायीं जागे
जो भोगी तो जाणे गे ॥ १ ॥ कोठें सौख्यालागीं गे

पद. राग काफि, ताल त्रिवट.

(संया करे चतुराई रे—या चालीवर.)

सुख नुरे मनुजास गे । सुख नुरे, तनु झुरे
अंतरे स्त्री-प्रेमा ज्यास ॥ ध्रु० ॥
काय नरतनुनें, जननिं मरणिं पडावें । फुकट
भवजाळीं! । स्त्रीविण गृह उदास ॥ १ ॥ सुख नुरे १२३.

श्लोक.

परस्पर जयीं द्वयें निजसमागमें स्त्रीनर
बघोन गुणदोष तीं करितिल स्वरूपांतर—
स्त्रिया प्रबल अंशतः, नर मनीं तसे कोमल
तयेंच समयीं जगीं सफल आयु तें होइल. १२४.

## आर्या

विद्या संपादावी परि गृहकृत्याप्रती न त्यागावें;
संसारीं निजभर्त्र्या सुख संतत होइ तेंवि वागावें १२५.
वाढवुनी निजबालां, बालांसम शुद्धचित्त राहावें
ऐसा परमेशाचा आहे संकेत पूर्ण समजावें. १२६.

## श्लोक.

प्रसंग मग येइ कीं पुरुष सर्व नैशा स्त्रिया,
मनें करुनि मोकळीं सुख परस्परां द्यावया
प्रयत्न करितील, जयीं विषमता नुरे लेशही.
स्वतंत्र, परि ऐक्य तीं करुनि, शोभवीतील मही. १२७.

## दिंडी.

होइ जगताचा तयीं समुत्कर्ष;
दुभावाचा होणार नाहिं स्पर्श.
अंति भुवनीं उपजेल योग्य काळीं
मनुज जाती संपूर्ण भाग्यशाली." १२८.

## साकी.

नृपतनयाचे शब्द ऐकुनी सुस्कारा सति टाकी
बोलेः—"तैसें घडणें दिसतें अशक्य या भूलोकीं."
नृपसुत उत्तर दे । ऐका तिजला काय वदेः—१२९.

## श्लोक. (अश्वधाटी.)

"नारीनरांमाधिं असारी नको दुफळि, हारीं पडाल जगतीं; ॥ ग्रीवा मनीं सकल देवा, नका करुं दुभावा, वदे निजमती! ॥ नाहीं सुखी पुरुष गेहीं स्त्रियेविण कदाही; पती सुखावि, ती. ॥ सदाहि कोमल हृदा दावुनी, पूज्यपादांस सेविति, सती. १३०

## पद. जिल्हा झिंझोटी. ताल त्रिवट.

( सूर्यवंशीं चंद्रकेतू—या चालीवर. )

व्यर्थ आहे नरनारींचें जीवन एकटिं राहतां
नरनारींनें साम्य असावें इष्ट हेंचि विवाहितां !
पुरुषां अंगीं उणिव ज्याची, स्त्री निवारी पूर्ण ती
स्त्रियांअंगीं कमतरता जी पुरुष हरी ती तिजप्रती! १३१

## साकी.

ऐसें झाल्या होइ सफल तो लग्नाचा उद्देश;
पूर्ण असे तो विवाह जेथें भेद नुरे लवलेश.
दोघां हृदयांचा | झाला संधी तिथ साचा. १३२

बळें लाविल्या गांठी ह्मणुनी का अंतर जुगतें तें
विधिनें गांठी बांधियल्या हें वचन नये कामातें.
लग्नीं हृदयांचा | व्हावा संधि सदा साचा. " १३३.

## श्लोक.

" अशा हो भ्रमामाजि," तें राजबाळी
वदे, " राहिलें व्यर्थ मी एककाळीं;
स्त्रियेपासुनी कोणच्या भाग्यशाली
तुह्मां ज्ञान हें, वृत्ति ही, प्राप्त झाली !" १३४.

## श्लोक.

कुमारानें तीतें बहुत विनयें उत्तर दिलें:—
" स्वयें स्त्रीज्ञानातें विविधपरि म्यां मेळवियलें
स्त्रियांच्या मैत्रीचा परम भइ भोक्ता सति असें !
स्त्रियांवीणें ना गे गति पुरुषजातीप्रति दिसे. १३५.

नभा शशिविणें जशी कधिं न येइ शोभा पुरी
स्त्रियेविण तशी न ये सुजनता गृहाभीतरीं;
अमोलिक बहू असें मजशिं ज्ञान हें लाभलें;
सुमायकरिं वाढतां, अधि तिच्या मुखें ऐकिलें १३६.

मन्माता सकळांपती सति बहू होती सुवंद्या प्रिया
भूलोकीं वसुनी दिसे सकळिकां भूलोकिंची कीं न या
आहे देवसुता, कुणी उतरली स्वर्गांतली ईश्वरी
प्राणी या भुवनांत ती उपजली दुःखा पुरी संहरी. १३७

दिंडी.

धन्य जन्मे जो अशा मायपोटीं
असे थोडकियां भाग्य हें ललाटीं !
तोचि ओळखितो पुरा स्त्रीस्वभावा;
नरा मैत्रिण ती, अशा धरी भावा." १३८.

सती बोले तयिं तया इंदिरा ती:—
"अशा मातें जो वाढला सुहातीं
काय मज ऐशा वरुनि, पामरीं तो
प्रेम ठेविल? निज पुरवुं शके हेतो ? १३९.

श्लोक.

वाटे मला क्षुद्र असें वहू मी;
नाहीं जगाच्या मुळिं कांहिं कामीं.
माझ्यावरी ठेवुन काय प्रेमा,
संसारिं पावेल कुणी विरामा." १४०.

बोले तदा तो निज राजपुत्रः—
"प्रीतीस माझ्या असशी सुपात्र !

मी बाल होतों तंवपासुनीयां,
देहास गे वाहियलें तुला या. १४१.

हो तूंच माझी सुखदा सुजाया;
गे लाविली त्वां मजलागिं माया!
त्वां रक्षिला प्राण दयाळु हातें
संसारसौख्या तरि देइं मातें. १४२.

होती जिवाच्यावरि धाड आली,
पाजोनियां औषध दूर केली;
त्वां अन्नपाणी मुखिं घालियेलें
तें देहतंतुप्रति लांबवीलें. १४३.

जरी व्यंग कांहीं तुझ्या अंगिं नांदे
तरीही मला सुंदरी तूं वरूंदे;
तुझ्या अंगिं जें व्यंग तें माणसीं, गे
बहू थोडकें सर्व वृत्तींत जागे. १४४.

जशी आहेशी तूं, तशि मज पुरी भाविशि भली;
पहाया स्त्री जातां सकलरिति पूर्णा कुलकुलीं,
प्रतापें यत्नें ही जगत धुंडल्या, नाहिं मिळणें;
तुझ्याऐशी स्त्री गे कधिं वरिलिसे काय करणें?१४५.

साकी.

तृप्ती होईनाच मनाची जों पाहीं मुखचंद्रा!
इंद्रभुवनिं का अधिक याहुनी सौख्य होतसे इंद्रा?
नाहीं जोड तुला!। सखये, वरनी सुखवि मला!१४६

### श्लोक.

वर बघिं सखये तूं पाहिं गे या मुखाला !
नयन उघडिं, मातें पाहवीं सत्सुखाला !
उगवुन उदयीं तो जेविं भानू जगातें,
सुखकर बहु होई, होइं तूं तेविं मातें ! १४७

श्रम अजिवरि केले सार्थक प्राप्त झालें
समरिं हरुन गेलों, तें तुला जाणियेलें
तवकरिं पयपाणी अन्न म्यां सेवियेलें
सबळ पुनरपी तें जाहलों जिंकियेलें ! १४८.

पद (मणिबंधाच्या चालीवर)

आतां होई गे नवरी
नको ह्मणूं कीं 'नर न वरीं.' ॥ ध्रु० ॥
संसाराचें सुख दावी
प्रेमा तुझियामधिं तेविं ॥ १ ॥ आतां.
कितीक हें मी सांगुं तुला
कंठ वदत हें, गे, सुकला ! ॥ २॥ आतां. १४९

पद. राग भूप, ताल त्रिवट.

(ललचावत या चालीवर.)

वर गे वर सुंदरी मातें ! आलों लोभा
धरुनी, हृदयीं बहु प्रेम तुझें मी ॥ ध्रु० ॥
पुरविं ममेच्छा हात मला दे, घे तुझ्या
पदरीं मला; उभयतां होऊं सुखी प्रिये ॥ वर गे
वर ॥ १ ॥ १५०.

## पद.

( सुंदरमुख तुंदिलतनु— या चालीवर. )

सखि ! तव सुखदायक मुखकमल विमलसें
आलिसम सललित लक्षुनि तृप्त होतसें ॥ ध्रु० ॥
सरळ नाक कुरळ केश निवळ दंत ते
नयन विनयभरित बघुन हरिणि लाजते
चंचलता जणुं विद्युत्पदिं विराजते.
ये गे! वेगें, संगें हृद्रमणी ! चिद्धरणी! सुखतरणी विल-
सु दे सर्वें ॥ १ ॥ सखि तव
धी प्रचंड पंडितजनमान खंडिते
आचरण प्रेमळ बहु कुजन दंडितें
मधुर वचन वाद कधिं न करि वितंड ते
तोषी ऐशी राशी सुगुणांची, सुमनाची, कर याचीं,
'वरिन' वद मुखें ! ॥ २ ॥ सखि तव.
ललना अशि भाग्यशालि नर असेल जो
त्यासि सुलभ; दिव्य ज्योति तो तुला पुजो !
प्रेमलता हृदयिं तुझ्या मजप्रती रुजो !
आहा ! देहा कां हा उदयकाळ, ये न जवळ, परि
निवळ "न वरिं" हें वदे ! ॥ ३ ॥ सखि तव०" १५१.

## साकी

आतां उठला बहुतां दिवशीं अंतीं तो नृपपुत्र;
होता तैसा पुनरपि झाला सुंदरतनु दृढगात्र
चिंता क्लेश नुरे । नृपतनयेची वृत्ति फिरे. १५२

श्लोक.

प्रभाकराला शशि घालवीतो
हिमांशु कीं जात रवी उदेतो
ह्मणा कसेंही स्थिति अंतिं एक,
जयीं निशा ये सुखि होति लोक. १५३

तसें ह्मणा कीं नृपकन्यकेला
हरी, वराया सुत सत्सुशीला;
तया कुमारा अथवा हरी तीः
घडेल युग्माप्रति सौख्य अंतीं; १५४

सुयुग्म ऐसें सुगुणावतारी,
परस्परां होइल सौख्यकारी,
जरी स्त्रियां दाविल मार्ग योग्य
तरी तयाचें उघडेल भाग्य. १५५

अंजनीगीत.

नृपतनया ती अंतीं बोलेः—
"आजवरी जें घडुनी आलें
त्वद्रुप तेणें ओळखियेलें
म्यां हो पूर्णपणें. १५६

भराल माझ्या कार्या हातीं
कराल सिद्धी जाणें निश्चिती
मुळिंच मजला कांहीं भीती
नुरली हो आतां. १५७.

पद. (चहुत छलियलें—या गम्यांचे चालीवर.)

तरिन तुझांप्रती । नाहीं स्त्रीला अन्य गती ॥ ध्रु० ॥
याउपरी राहूं ऐक्यें या । नृपपुत्रा ! प्रेमें स्नेहें
सौख्यें अवघ्या जन्मीं विलसुं या ॥ हो भारी
तुझी अमलां यशस्वि जाहलां अंतीं ॥ १॥ तरिन १५८.

श्लोक.

बोले राजकुमार तें हरखुनी :—अंतीं तुला भावलों;
झालों मी कृत्यकृत्य हो अजि अहा जें इच्छिलें पावलों;
जाया मेळविली गुणी परम ती; इच्छा नुरे या मना.
ठेवोनी तिजलागिं चित्त तिजला सेवीन सर्वात्मना!१५९

पद. रागिणी भैरवी, ताल त्रिवट, पंजाबी.

(अब मोरी छांडदे—या चालीवर.)

इच्छिलें तें लाभलें ॥ विचारें आणिलें तडी । झाला
संधी शेवटिं हा ॥ ध्रु० ॥
जरि कवणा कांहीं । इच्छित व्हावें ॥
दम धरुनी, श्रम केल्या, । होई सुफलित आशा ॥१॥
इच्छिलें तें लाभलें !" १६०

---

मंलय नामक सातवा सर्ग समाप्त.

इंदिरा समाप्त.

# डाक्तर कीर्तिकर

## यांनीं प्रसिद्ध केलेले ग्रंथ.

भक्तिसुधा.— } नरवृत्ति [illegible] नाटकें [illegible]
विलापलहरी.— } [illegible] विक्रीस

मसुरिका अथवा देवी [illegible] यां
संबंधीं सूचना. (मराठींत) कि. ३ पै.
(गुजराथींत) ,, ,,

Two Addresses on the Theistic Movement in [illegible] India. [illegible]

---

[illegible]

[illegible] पुस्तकें [illegible] विकत मिळतील [illegible]
नेटिव्ह ओपिनियन छापखाना, [illegible]
निर्णयसागर छापखाना, काळबादेवी रोड.
आत्माराम सगुण कंपनी, ,,
कुपर कंपनी, मेडोस्ट्रीट कोटांत.